असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापतीस्थानी माननीय सभापती

पृ.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

मु.शी.: राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा.

(प्रस्ताव पुन: प्रस्तुत झाला.)

सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत अजून दोन, तीन सन्माननीय सदस्यांना बोलावयाचे आहे. प्रत्येक सन्माननीय सदस्यांनी पाच मिनिटात आपले भाषण पूर्ण करावे. माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना या चर्चेवरील उत्तर देण्यासाठी किमान 35 मिनिटे तरी वेळ दिला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी आपल्या भाषणस सुरुवात करावी.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, सन्माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावर या सभागृहात गेल्या दोन दिवसापासून चर्चा सुरु आहे. या अभिभाषणावर माझे मनोगत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. सभापती महोदय, राज्य शासनाची जी काही ध्येय धोरणे, राज्य शासनाचा जो काही कार्यक्रम आहे त्यासंबंधी माहिती माननीय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणतून पहावयास मिळते. या चर्चेच्या माध्यमातून शासनाचे उद्दिष्टे, घ्येय धोरणे त्याच बरोबर विरोधी पक्षाच्या बाकावरील सदस्यांकडून राज्य शासनाच्या कामासंदर्भातील काही त्रुटी यासंदर्भात संर्वंकश चर्चा या सभागृहात होत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये मुद्दा क्रमांक 7 मध्ये शहीदांच्या वारसांना मदत देण्याची बाब नमूद करण्यात आली आहे. त्यासंदर्भात सभागृहात खूप चर्चा झाली आहे. अनेक सन्माननीय सदस्यांनी आपापली मते याबाबतीत मांडलेली आहेत. राज्य शासनाने शहीदांच्या कुटुंबियांना मदत करण्याची जी कमिटमेंट केली आहे, मग ती घर देण्यासंदर्भातील असेल, आर्थिक मदत देण्याच्या संदर्भातील असेल, त्यांच्या मुलांना शिक्षण देण्याच्या संदर्भातील असेल, या कमिटमेंट माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणात नमूद केलेल्या आहेत. परंतु या कमिटमेंट पूर्ण करण्यासाठी तरतूद

श्री. रामनाथ मोते...

करण्याची आवश्यकता आहे. काल अनेक सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केल्या की, शहीदांच्या मुलांना मोफत शिक्षण देण्याचे मान्य करुनही नंतर शासनाकडून जी.आर.काढला गेला आहे की, त्यांच्या मुलांना फक्त इयत्ता 12 वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाईल. सदरचा जी.आर.रद्द करुन यासंदर्भात पूर्वी जी कमिटमेंट केली आहे, त्यांची अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, माननीय राज्यपाल महोदयांच्या भाषणामध्ये या वेगवेगळया विषयांच्या संदर्भात, राज्य शासनाच्या वेगवेगळया ध्येय धोरणाच्या संदर्भात त्यांनी आपले विचार मांडलेले आहेत. परंतु शिक्षणाच्या बाबतीत मात्र शासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केलेले आहे असे मला या ठिकाणी खेदाने म्हणावेसे वाटते. माननीय राज्यपालाच्या अभिभाषणामध्ये शिक्षणाला कोणत्याही प्रकारचा स्पर्श करण्यात आलेला नाही. सभापती महोदय, आज राज्यातील शैक्षणिक धोरण विचारात घेतले तर त्यात मोठया प्रमाणात बदल करण्याची आवश्यकता आहे असे माझे मत आहे. शाळांची गुणवत्ता वाढविण्याची आवश्यकता आहे. आज राज्यात मराठी शाळांचा दर्जा घसरतो की काय, मराठी शाळा बंद पडतात की काय अशी भीती वाटू लागली आहे. मराठी शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत चालली आहे. आज या स्पर्धेमध्ये आमच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा टिकून राहतील की नाही अशी देखील मोठी भीती निर्माण झालेली आहे. शिक्षण क्षेत्रात एका मोठी स्पर्धा निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने आपले शैक्षणिक धोरण बदलण्याची आवश्यकता आहे आणि त्याचा या अभिभाषणात कुठे तरी उल्लेख असणे आवश्यक होते. आज व्यवसायीक शिक्षणाची गरज आहे. ज्या विद्यार्थ्यांची आर्थिक क्षमता बरोबर नसेल, त्यांच्यात गुणवत्ता नसेल वा अन्य कारणासाठी इयत्ता 10 वी इयत्ता 12 वी मधील विद्यार्थी उच्च शिक्षण घेऊ शकत नाही अशा विद्यार्थ्यांना काही व्यवसायिक शिक्षण देता येईल काय ? त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल काय ? या दृष्टीकोनातून काही वेगळी योजना शासनाने हाती घेणे आवश्यक आहे. त्यासंबंधीचे कोणतेही नियोजन वा त्यासंबंधीचा कोणताही विचार या अभिभाषणात केलेला दिसून येत नाही.

सभापती महोदय, आदिवासी विकास विभागाच्या संदर्भात माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात अनेक विचार मांडलेले आहेत.

यानंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते.....

आज सर्वात जास्त दुरावस्था कोणाची असेल तर ती आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या आश्रमशाळा आहेत त्यांची झालेली आहे. मी अनेक आश्रमशाळांना भेटी दिल्या आहत. कोट्यवधी रुपयांचा निधी या आश्रमशाळांसाठी दिला जातो. एका शाळेमध्ये 300 ते 400 विद्यार्थी शिकत आहेत. मुले आहेत, मुली आहेत. त्यांच्या व्यवस्थेची योग्य स्थिती नाही. शौचालयांची, स्वच्छतागृहांची, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. एका एका शाळेमध्ये 100 ते 150 मुली आहेत. 12 वीपर्यंत शिक्षण घेणाऱ्या मुलींना साधी स्नानगृहाची सोय नाही इतकी दुरवस्था आहे. त्यांना दिले जाणारे साहित्य, त्यामध्ये कपडे, तेल, साबण याकरिता करोडो रुपये खर्च केला जातो. ते साहित्य पाहिले तर त्यांना दिले जाणारे दंतमंजन, जे जे आऊटडेटेड आहे ते साहित्य दिले जाते. 2006 सालातील खोबरेल तेल आज दिले जाते. कोणत्याही प्रकारची पावडर दंतमंजन म्हणून दिली जाते. चांगल्या कंपनीचे, ब्रॅण्डेड कंपनीचे साहित्य असेल, तेल असेल, साबण असेल, गणवेश असेल या पध्दतीमध्ये मोठया प्रमाणावर बदल करण्याची, दर्जा सुधारण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, कायम विनाअनुदानित शाळांची संख्या अनुदानित शाळांच्या संख्येइतकीच आहे. शासनाला या संदर्भातील धोरण बदलावे लागणार आहे. यापुढे शासन कोणत्या पध्दतीने मान्यता देणार आहे, कोणत्या प्रकारचे धोरण या शाळांना मान्यता देण्याच्या संदर्भात अवलंबिणार आहे याचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. मोठया प्रमाणात कायम विनाअनुदानित शाळांमध्ये आंदोलने सुरु आहेत. हजारो शिक्षक पगारापासून वंचित आहेत. या संदर्भात धोरण बदलण्याची, नव्याने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, उच्च शिक्षणाबाबत शासनाला वेगळा विचार करण्याची गरज निर्माण झाली आहे. मागील 5 वर्षाची आकडेवारी पाहिली तर लक्षात येईल की, 2004 मध्ये मेडिकलला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या 80 हजार होती ती यावर्षी 25 हजारावर आली. इंजिनिअरिंगला जाणाऱ्यांची संख्या 50 हजार होती ती 90 हजारापर्यंत वाढली आहे. ट्रेंड बदलत आहे. याची कारणे शोधावी लागतील. मेडिकलला जाणाऱ्या विद्यार्थ्यांवर होणारा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. या संदर्भात रिलिफ देता येईल का? खर्च वाढत असल्यामुळे विद्यार्थ्यांचा मेडिकल क्षेत्राकडील कल कमी होत आहे. या संदर्भात शासनाला धोरण बदलण्याची आवश्यकता आहे एवढे बोलून वेळेअभावी माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

--- (नंतर हिंदी भाषण श्री.शर्मा.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद जामा (महाराष्ट्र विधान सभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण पर बोलते हुए जिन मुद्दों के बारे में अन्य माननीय सदस्यों ने विचार प्रकट किए हैं, उन मुद्दों पर मैं नहीं बोलूंगा. मैं केवल लेबर डिपार्टमेंट से संबंधित, इन्डस्ट्री डिपार्टमेंट से संबंधित और अल्पसंख्यकों से संबंधित विषयों के बारे में अपने विचार आपके सामने रखूंगा. मैं विरोधी पक्ष के माननीय सदस्यों को बताना चाहता हूँ कि पूरी दुनिया में मंदी होने के बावजूद हमारी महाराष्ट्र सरकार और केन्द्रीय सरकार ने बहुत अच्छा काम किया है और उसका डिवीडेंट हमारी पार्टी को लोकसभा के चुनाव में मिला है.

सभापति महोदय, लेबर डिपार्टमेंट के बारे में राज्यपाल महोदय ने कुछ अधिक नहीं कहा है. सिविल कोर्ट और क्रिमिनल कोर्ट में वेकेन्सी के बारे में यहां पर कहा गया, लेकिन महाराष्ट्र में हजारों की संख्या में कामगारों के डिस्प्यूट इन्डस्ट्रियल कोर्ट और लेबर कोर्ट में पेन्डिंग हैं. इसलिए हमें इन्डस्ट्रियल कोर्ट और लेबर कोर्ट की संख्या बढ़ानी चाहिए और कामगारों को टाइम बाउन्ड न्याय मिलना चाहिए. जिस प्रकार से दूसरे डिस्प्यूट के बारे में फास्ट ट्रॅक कोर्ट होते हैं, उसी तरह से कामगारों के डिस्प्यूट को हल करने के लिए फास्ट ट्रॅक कोर्ट बनाने चाहिए. आज हालत यह है कि कामगारों को 20 साल तक जजमेंट नहीं मिलता है, इसलिए फास्ट ट्रॅक कोर्ट कामगारों के लिए भी बनाने चाहिए. इससे कामगारों को जल्दी न्याय मिल सकेगा.

सभापति महोदय, महाराष्ट्र एक प्रगतिशील राज्य है और यहां पर एस.ई.जेड आ रहे हैं. मेरा कहना है कि एस.ई.जेड में लेबर कानून लागू होना चाहिए. पूर्व मुख्यमंत्री ने इस बारे में कहा है, लेकिन आदेश अभी तक नहीं निकले हैं. महाराष्ट्र में 41 एस.ई.जेड मंजूर किए है, वहां पर लेबर कानून लागू होना चाहिए. छठवां वेतन आयोग महाराष्ट्र सरकार ने कर्मचारियों के लिए लागू किया है, लेकिन मजदूरों के लिए मिनिमम वेजज एक्ट में सुधार नहीं हुआ है. इसलिए इस बारे में ध्यान देने की आवश्यकता है और सरकार को विभिन्न उद्योगों में काम करने वाले मजदूरों के मिनिमम वेजज में बढ़ोतरी करनी चाहिए.

सभापति महोदय, उद्योग के बारे में माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में विशेष उल्लेख नहीं है. महाराष्ट्र औद्योगिक प्रदेश है और यहां पर हजारों की संख्या में स्मॉल स्केल, मीडियम स्केल और लार्ज स्केल इन्डस्ट्री हैं. इनमें से बहुत सी इन्डस्ट्री आज कार्यरत नहीं है. इनको रिवाइव करने के बारे में किसी योजना का उल्लेख माननीय राज्यपाल महोदय के

. . . B 3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

. . . . श्री. सय्यद जामा

अभिभाषण में नहीं है. सरकार को इस बारे में ध्यान देना चाहिए. हमारे बहुत से उद्योग पड़ोसी राज्य छत्तीसगढ़ में जा रहे हैं. वहां पर पावर टॅरिफ बहुत कम है, जबकि हमारे राज्य में बिजली बहुत मंहगी है. मुंबई और ठाणे जिले के बहुत से उद्योग छत्तीसगढ़ में जा रहे हैं. इसलिए सरकार को इस बारे में विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, हमारे विदर्भ में मिनरल्स बहुत बड़ी मात्रा में पाए जाते हैं, लेकिन माननीय राज्यपाल महोदय के अभिभाषण में इस बात का जिक्र नहीं है. विदर्भ में कोल, आयरन-ओर और मॅगनीज-ओर की खानें है. इनका विकास करने के बारे में सरकार को ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, पिछले 2-3 बार से लगातार सभागृह में अल्पसंख्यकों के बारे में मैंने यह बात कही है कि माननीय प्रधान मंत्री के 15 सूत्री कार्यक्रम के अन्तर्गत एक कार्यक्रम यह है कि अल्पसंख्यकों के लिए बजट का एलोकेशन हॅड-वाइज होना चाहिए. महाराष्ट्र शासन ने इस बारे में अक्टूबर 2006 में जी.आर. भी निकाला है, लेकिन इस जी.आर पर अमल नहीं हो रहा है. यह जी.आर. निकलने के बाद नियमित बजट पेश हुआ और पिछली बार वोट ऑन एकाउन्ट भी मंजूर किया गया. सरकार ने 167 करोड़ रुपए का एलोकेशन किया था, लेकिन वह हॅड-वाइज नहीं था. आज आर्थिक वर्ष 2009-10 के लिए बजट पेश होने वाला है. मेरा अनुरोध है कि इसके बारे में शासन को विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र स्टेट हँडलूम कॉरपोरेशन बंद हो गया है और इस वजह से हजारों बुनकरों को काम मिलना बंद हो गया है, उनके लिए रोजगार नहीं है. बुनकरों को रोजगार देने के लिए सरकार को विशेष ध्यान देना चाहिए.

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार ने "बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम" लागू किया है और यह एक स्वागत योग्य कदम है. लेकिन कभी कभी हमें ऐसा लगता है कि कर्मचारियों के बारे में और आमदारों के बारे में यह "बजट डिस्ट्रीब्यूशन सिस्टम" बजट डिले सिस्टम हो गया है. कर्मचारियों को तीन-चार महीने के बाद सेलरी मिलती है, इसमें सुधार होना चाहिए.

. . . B 4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापति महोदय, महाराष्ट्र सरकार में एडमिनिस्ट्रेटिव रिफोर्म्स की बहुत गुंजाइश है. इनका परफोरमेंस और आउट-पुट बहुत कम है. इसके कार्य को सक्षम बनाने के लिए एक रिफोर्म कमीशन बनाना चाहिए ताकि हमारा खर्चा कम हो और काम जल्दी हो सके. इन्हीं शब्दों के साथ माननीय राज्यपाल महोदय का आभार मानते हुए मैं अपना भाषण समाप्त करता हूँ. धन्यवाद.

. . . . . .

. . . .भाषण पूर्ण, नंतर श्री जुन्नरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणासंबंधीच्या आभारप्रदर्शन ठरावाच्या निमित्ताने मी माझे मुद्दे मांडणार आहे.

महोदय, या अभिभाषणात एकूण 86 मुद्दे दिलेले आहेत आणि त्यातील चार मुद्दे प्रामुख्याने दहशतवादासंबंधी आहेत. दहशतवाद हा केवळ एक प्रांत किंवा देशापुरताच प्रश्न नाही तर तो जागतिक प्रश्न निर्माण झालेला आहे. यासंदर्भात राज्यशासनाने असा निर्णय घेतला होता की, राज्य सुरक्षा रक्षक दलाची स्थापना करण्यात येईल. मी माननीय उप मुख्यमंत्र्यांना या निमित्ताने अशी विनंती करणार आहे की, दि. 26 नोव्हेंबर, 2008 रोजी झालेल्या हल्ल्याच्या अनुषंगाने हा जो निर्णय घेतला होता व त्या अनुषंगाने जी कार्यवाही शासनाने केली असेल ती सदनाला अवगत करावी. कारण विकास तर महत्वाचा आहेच परंतु त्याहीपेक्षा संरक्षण, जीव हे अत्यंत महत्वाचे आहेत. त्यासंदर्भातील कार्यवाही या शासनाच्या माध्यमातून निश्चितपणे होत आहे आणि भविष्यातही होईलच तशी माहिती सभागृहाला द्यावी अशी माझी सूचना आहे.

महोदय, देशात आपले राज्य हे पहिल्या क्रमांकावर आहे. पुरोगामी असे राज्य, प्रगतीशील असे राज्य, सामाजिक न्याय देणारे असे राज्य, सर्वांना घेऊन जाणारे असे हे राज्य असून सन्माननीय सदस्यांनी येथे बोलत असताना काही घडना या राज्यात घडल्याचे सांगितले. त्यात कुणाची धिंड निघाली असेल, बलात्कार झाला असेल, अशा घटना घडतच असतात आणि त्याचे समर्थन करण्यासाठी मी उभा नाही. परंतु सर्वंकष विचार केला तर आज देखील या देशात महाराष्ट्र हे पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. आपली स्पर्धा केवळ या देशातील राज्यांसोबतच नाही तर परदेशातील जी इतर राज्ये आहेत, जे विकसनशील राज्ये आहेत त्यांच्यासोबत स्पर्धा करण्याच्या संदर्भात आपल्या देशाने उंच भरारी घ्यावी ही आमची मागणी आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

सभापती महोदय, वेळ कमी असल्यामुळे मी थोडक्यात काही मुद्यांचा परामर्श घेणार आहे. राज्यशासनाने ज्या प्रमाणे एसईझेड घोषित केलेले आहे त्याच प्रमाणे शासनाने एसएझेड निर्माण करावे. एसएझेड म्हणजे स्पेशल ॲग्रीकल्चरल झोन निर्माण करण्याची आवश्यकता आहे. ज्या प्रमाणे शासन उद्योगाला चालना देण्यासाठी पॅकेजेस देते, इनसेन्टीव्हज्, देते त्याच पध्दतीने कृषी क्षेत्राला, शेतक-यांना आर्थिक सहाय्य देण्यासाठी एसएझेडची स्थापना करणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्य कृषी अर्थव्यवस्थेमुळेच प्रगतीपथावर आहे. त्यामुळे एसएझेडच्या संदर्भात शासनाने निर्णय घेणे अत्यंत महत्वाचे आहे. हे राज्य औद्योगिक दृष्टया प्रगतीवर असतांना देखील कृषीच्या अर्थव्यवस्थेवरच आज महाराष्ट्र चालला आहे. त्यामुळे एसएझेडची निर्मिती अत्यंत महत्वाची आहे.

सभापती महोदय, या देशातील कोणत्याही राज्याने जे केले नाही ते काम महाराष्ट्र शासनाने करुन दाखविलेले आहे. महाराष्ट्र शासनाने 6208 कोटी रुपयांची कृषी कर्जे माफ केलेली आहे. संपूर्ण देशात कृषी कर्ज माफ करणारे एकमेव महाराष्ट्र राज्यच आहे. या शासनाने कपाशीला 2850 रुपये प्रती क्विंटल भाव दिला तसेच सोयाबीनला 2250 रुपये प्रती क्विंटल भाव दिलेला आहे. एवढया मोठया प्रमाणात संपूर्ण देशात कोणत्याही राज्याने हा भाव दिलेला नाही. महाराष्ट्रामध्ये कापसाचे किंवा सोयाबीनच उत्पादन इतर राज्यांपेक्षा कमी आहे. कापसाचे आणि सोयाबीनचे जेवढे उत्पादन वाढावयास पाहिजे होते तेवढे उत्पादन वाढले गेलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, कृषीचे क्षेत्राचे उत्पादन वाढविण्यासाठी आपली जी कृषी विद्यापीठे आहेत त्यांना जास्तीत जास्त प्रयोगशाळा करुन दिल्या पाहिजेत, जास्तीत जास्त संशोधन केंद्रे तयार केली पाहिजे आणि त्याच्या माध्यमातून शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

सभापती महोदय, शेतक-यांची आर्थिक परिस्थिती ऊचांवण्यासाठी शेतक-यांचे कर्ज माफ करणे हा कायमस्वरुपी तोडगा नाही त्यामुळे शेतक-यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्याच्या संदर्भात माझी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती राहीन.

सभापती महोदय, रोजगार हमी योजनेमध्ये गरीब शेतक-यांच्या शेतावर रोहयोच्या अंतर्गत कामे करण्याची योजना आपण आणा. रोहयोमध्ये फलोत्पादनाची योजना माननीय कृषी मंत्री

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरुण गुजराथी...

श्री. शरद पवार यांनी केलेला आहे. खाजगी शेतीवर फलोत्पादनाचा कार्यक्रम केला जातो. यासाठी जो काही खर्च येतो तो संपूर्ण खर्च शासन देत असते. एकीकडे शेती परवडत नाही व दुसरीकडे शेतावर काम करण्यासाठी मजूर उपलब्ध नाही या परिस्थितीत शेतक-यांसाठी चांगला निर्णय घ्यावा अशी पध्दतीची मी माननीय उपमुख्यमंत्री महोदयांना विनंती करतो. त्याच प्रमाणे कृषी संदर्भात मी सांगू इच्छितो की, शेतक-यांना बी-बियाणे तसेच खते उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाची असतांना आमच्या जळगाव जिल्हयातील पारोळा येथे 18 मे, 2009 रोजी शेतक-यांनी बी-बियायाण्यांची तसेच खताची मागणी केली असतांना त्यांच्यावर गोळीबार झाला. हा जो काही प्रकार झालेला आहे तो मुळीच चांगला नाही, या घटनेमध्ये शासनाची काही चूक आहे असेही मी म्हणत नाही. परंतु शेतक-यांना बि-बीयाणे तसेच खते योग्य भावात उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी शासनाची आहे. ही जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही. त्यामुळे शासनाने या प्रश्नाच्या संदर्भात लक्ष घालावे अशी माझी शासनाला विनंती आहे.

सभापती महोदय, आदिवासी विकासाच्या संदर्भात सन 2006 मध्ये केंद्रशासनाने कायदा केलेला आहे. आदिवासींच्या जमिनीवर अतिक्रमण झाले आहे त्या जमिनी आदिवासींना परत देण्याच्या संदर्भात आदिवासींच्या दृष्टीने चांगला कायदा झालेला आहे. आदिवासींना शक्ती देणारा हा कायदा आहे. परंतु आमच्या जळगाव जिल्हयामध्ये या निर्णयाची अंमलबजावणी होतांना दिसत नाही. त्यामुळे मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करतो की, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपल्या दालनात एक बैठक लावावी, या भागातील आदिवासींनी त्यामुळे निवडणूकीवर बहिष्कार टाकला होता त्यामुळे त्याचे प्रश्न सोडविण्याची जबाबदारी शासनाला टाळता येणार नाही. हा प्रश्न लवकर सोडविण्याच्या संदर्भात मी माननीय उपमुख्यमंत्र्यांना विनंती करीन की, यामध्ये आपण निश्चित प्रयत्न करावेत. तसेच सिंचन क्षमता वाढविण्याच्या संदर्भातही प्रयत्न करावा. केंद्रशासनाच्या व राज्य शासनाच्या प्रयत्नामुळे जगात मंदी असतांना सुध्दा त्याची झळ महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात दिसू दिली नाही एवढे उत्तम कार्य केंद्रशासनाच्या तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून झाले त्यामुळे राज्यशासनाचे अभिनंदन करुन मी माझे चार शब्द संपवितो.धन्यवाद.

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकात पाटील (पुणें विभाग शिक्षक) सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्याकरिता मी उभा आहे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणाच्या निमित्ताने केन्द्र सरकारने आणि राज्य सरकारने दिलेल्या शेतक-यांच्या कर्जमाफीच्या एकाच मुद्यावर पाठ थोपटून घेण्यात आलेली आहे. शेतक-यांनी केलेल्या आत्मत्येमुळे शासनाला कर्ज माफी जाहीर करावी लागली आहे. संपूर्ण देशामध्ये शेतक-यांच्या आत्महत्या झाल्या असून त्यापैकी महाराष्ट्रात जवळजवळ 5 हजार शेतक-यांनी आत्महत्या केल्या आहेत. त्यातील बहुतेक आत्महत्या विदर्भ आणि मराठवाडा विभागात झालेल्या आहेत. ज्या शेतक-यांची जमीन पाच एकरापेक्षा कमी आहे अशा शेतक-यांना कर्जमाफी जाहीर झाल्यामुळे पश्चिम महाराष्ट्रातील बहुताशी शेतक-यांना ही कर्जमाफी झालेली आहे. यासंदर्भात हिवाळी अधिवेशनामध्ये माननीय मंत्री श्री.हर्षवर्धन पाटील यांनी आकडेवारी सभागृहात दिली होती. त्यावरुन कोकण भागात ही कर्ज माफी फक्त दोन ते तीन टक्केच दिली गेली आहे. विदर्भ आणि मराठवाडयातील शेतक-यांना कर्ज माफीचा फायदा व्हावयास पाहिजे होता परंतु त्यांना हा फायदा न मिळाल्यामुळे अजूनही तेथील शेतक-यांच्या आत्महतया सुरुच आहेत. या कर्ज माफीच्या मुद्याच्या संदर्भात सरकर सतत पाठ थोपटून घेत आहे आणि कर्ज माफीमुळे शेतक-यांच्या आत्महत्या थांबलेल्या आहेत असे सांगत आहे. परतु प्रत्यक्षात मात्र तसे झालेले नाही असे मला या चर्चेच्या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय , यानंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. स्वातंत्र्या नंतरच्या गेल्या 62 वर्षातील कर्ज माफी नावाचा हा सर्वात मोठा आर्थिक घोटाळा आहे हे लक्षात घेतले पाहिजे आणि या संदर्भात सरकारने श्वेतपत्रिका जाहीर केली पाहिजे. ही कर्जमाफी खरोखर कोणाला मिळाली आहे हे सरकारने जाहीर केले पाहिजे. या अधिवेशनामध्ये मी तीन वेगवेगळया गावाच्या तीन लक्षवेधी सूचना दिलेल्या आहेत. त्यामध्ये मी सर्व आकडेवारी दिलेली आहे. कोल्हापूर जिल्हयातील कागल तालुक्यातील एका गावच्या विविध कार्यकारी सोसायटीमधील चेअरमन पासून ते संचालकापर्यंतच्या सर्व लोकांची कर्जमाफी झालेली आहे. जर हया लोकांकडे कर्ज थकित असतील तर ते सोसायटीचे संचालक कसे झाले ? ज्या वेळी ते निवडणुकीला उभे राहिले होते त्यावेळी त्यांनी असत्य माहिती दिली असेल आणि त्या असत्य माहितीच्या आधारावर त्यांनी निवडणुंक लढवली असेल. ती व्यक्ती जर थकबाकीदार असेल तर ती निवडणूक लढवू

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शकत नाही. तेव्हा मळगे नावाच्या एका गावामध्ये सोसायटीच्या पदाधिका-यांनी 42 लाख रुपयांची कर्ज माफी घेतली आहे. त्यामुळे थकबाकीदार असतांनासुध्दा ते सोसायटीचे संचालक झाले असतील किंवा नंतर ती थकबाकी एका अर्थाने क्रिएट केली गेली असेल. एका गावच्या विविध कार्यकारी सेवा सोसायटीमधील जर 42 लाख रुपयांची खोटी थकबाकी दाखवली जात असेल आणि कर्ज माफी घेतली जात असेल तर महाराष्ट्रात किती ठिकाणी असे प्रकार घडले असतील.हे सुध्दा पाहण्याची गरज आहे. सभापती महोदय, सांगली जिल्हयातील तासगाव तालुक्यात एका माजी मंत्र्यांच्या नातेवाईकांना 80 लाख रुपयांची कर्ज माफी झालेली आहे. 80 लाख रुपये कर्ज असणा-या शेतक-यांचे कर्ज माफ करण्यासाठी ही योजना होती की, 40 हजार वा 50 हजार रुपये कर्ज असलेल्या शेतक-यांवरील कर्ज माफीची योजना होती ? कर्ज माफीमुळे सर्व सामान्य शेतक-याना फायदा झाला की गावातील मोठया राजकीय नेत्यांना त्याचा फायदा झाला हे शोधून काढण्याची आवश्यकता आहे असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा एक मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे . काल सन्माननीय सदस्य डॉ.वसंत पवार यांनी असे सांगितले की, " 1984 साली कै. वसंत दादा पाटील यांनी विना अनुदान तत्वावर शाळा, महाविद्यालये सुरु करण्यास सुरुवात केली व त्यातून महाराष्ट्रातील पैसा महाराष्ट्रातच राहिला आहे. किंबहुना बाहेरचा पैसा महाराष्ट्रात यावयास लागला आहे." शिक्षण हा उद्योग आहे काय ? उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश या राज्यातील विद्यार्थी महाराष्ट्रात शिक्षण घेण्यासाठी येत असल्यामुळे राज्यात पैसा आला हे जरी खरे असले तरी स्थानिक विद्यार्थ्यांना शिक्षण मिळाले आहे काय हा महत्वाचा मुद्दा आहे. शिक्षण देणा-या संस्थाच्या मोठ मोठया व चांगल्या इमारती उभ्या राहिल्या परंतु स्थानिक विद्यार्थ्यांना शिक्षण मिळालेले नाही त्यामुळे राज्यात उत्तम कॉलेजेस उभी राहिली आणि राज्यात बाहेरुन पैसा येतो हा जो मुद्दा मांडण्यात येत आहे तो बरोबर नाही. मला असे विचारावयाचे आहे की, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्र ही वेगळी राष्ट्रे आहेत काय ? त्यामुळे आमचा इम्पोर्ट वाढला आणि एक्सपोर्ट थांबला असे आपण म्हणू शकतो काय ? महाराष्ट्रामध्ये विना अनुदान तत्वावर 1984साली शाळा महाविद्यालये सुरु करण्यात आली त्यातून स्थानिक विद्यार्थ्यांना मात्र काहीही फायदा झालेला नाही.

3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, यानंतर मला दुसरा मुद्दा या ठिकाणी मांडावयाचा आहे. बी.ओ.टी.तत्वावर काही प्रकल्प सुरु करण्यात येत आहेत . विना अनुदान तत्वावर काही कॉलेजेसना 1984 साली शासनाने परवानगी दिली होती . त्यांना मोफत भूखंड देण्यात आले होते. त्यातून उत्तम इनफ्रास्ट्रक्चर उभे करण्यात आले होते. 1984 ते 2009 या 25 वर्षाच्या काळात जी कॉलेजेस सुरु करण्यात आली होती त्यांनी खूप मलिदा कमविल्यानंतर आता ती कॉलेजेस सरकारकडे ट्रान्सफर करण्याची वेळ आलेली आहे. तसेच त्यांना आता टोल मुक्त करण्याची वेळ आलेली आहे. त्यांना आता यापुढे डोनेशन घेता येणार नाही . गेली 25 वर्षे आपण त्यांना डोनेशन नावाचा टोल जमा करण्यास परवानगी दिली होती परंतु आता बी.ओ.टी. तत्वावर ही सर्व मोठ मोठी कॉलेजेस सारकारकडे पुन्हा ट्रान्सफर केली पाहिजे. असे मला या निमित्ताने सांगावयाचे आहे.

सभापती महोदय,यानंतर मला दुसरा मुद्दा मांडावयाचा आहे. पिण्याच्या पाण्याच्या सदर्भात सन्माननीय सदस्या डॉ नीलम गो-हे यांनी परवा अर्धा तास चर्चा उपस्थित केली होती. कोल्हापूर जिल्हयातील पचगंगा नदीतील दूषित पाण्याच्या सदर्भात असा रिपोर्ट आलेला आहे की जगातील पहिल्या दहा दूषित नद्यांमध्ये पंचगंगा नदी आहे. सांगली जिल्हयातील कृष्णा नदीचे आणि कोल्हापूर जिल्हयातील पंचगंगा नदीचे पाणी प्यायलेली व्यक्ती जगामध्ये कोठेही गेली तरी त्याला आजार होणार नाही असे आम्ही ठामपणे म्हणू शकतो .अशा प्रकारचे अत्यंत दूषित पाणी आम्हाला प्यावयास मिळत नाही. स्वातंत्र्य मिळून 62 वर्षे् झालेली असतांना लोकांना शुध्द पाणी पिण्यास मिळत नसेल तर राज्याचा विकास होत आहे हे आम्ही कशाच्या आधारावर म्हणावयाचे ? आजच वर्तमानपत्रात जे शीर्षक प्रसिध्द झालेले आहे ते मी या ठिकाणी वाचून दाखवतो त्यावरुन आपण किती चुकीच्या मुद्यांवर आपली पाठ थोपटून घेत आहोत हे आपल्या लक्षांत येईल. आहे की, " औद्योगिक विकासाचा दर निम्यावर आला आहे. " अशा प्रकारे सकाळ वर्तमानपत्रातील एका बातमीला शीर्षक देण्यात आलेले आहे. असे असतांना महाराष्ट्रामध्ये अनेक उद्योग आणले असून मोठया प्रमाणावर रोजगार उपलब्ध करुन दिला आहे असे सांगण्यात येत आहे. त्या शीर्षकाच्या बाजूलाच "राज्याचा विकासाचा दर घटला ,आर्थिक पहाणी अहवालातील निष्कर्ष " असे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शीर्षकही छापण्यात आले आहे. ही आकडेवारी शासनाने दिलेली आहे व शासन असे सांगत आहे की "औद्योगिक विकास दर निम्यावर आला असून विकास दर धसरला आहे" अशी स्थिती एका बाजूला असतांना राज्यपालांच्या अभिभाषणात वेगळाच उल्लेख करुन लोकांच्या डोळयात धूळ फेकण्याचा प्रयत्न करीत आहे. या अभिभाषणात चुकीची आकडवारी व माहिती देण्यात आलेली आहे त्याचा शोध घेता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांचे अभिनंदन करण्या ऐवजी खेद व्यक्त करुन मी माझे भाषण संपवितो.

नंतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : आता यानंतर माननीय उपमुख्यमंत्री या चर्चेला उत्तर देतील. तत्पूर्वी मी त्यांना विचारू इच्छितो की, त्यांना यासाठी किती वेळ लागणार आहे ?

श्री. छगन भुजबळ : महोदय, मला यासाठी 15 ते 20 मिनिटांचा अवधी आवश्यक आहे.

सभापती : ठीक आहे. आता 10.25 वाजले आहेत. तेव्हा मी या चर्चेसाठीची वेळ 11.00 वाजेपर्यंत वाढवित आहे. तसेच सभागृहाची नियमित बैठक 11.20 वाजता सुरू होईल असे मी जाहीर करतो. तरी आता माननीय उपमुख्यमंत्र्यांनी आपले उत्तराचे भाषण सुरू करावे.

श्री. छगन भुजबळ (उपमुख्य मंत्री) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणा बद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव या सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री.जयप्रकाश छाजेड यांनी मांडला आहे आणि त्याला सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांनी अनुमोदन दिले आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील अभिनंदनपर ठरावावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य सर्वश्री.मधुकर चव्हाण, संजय केळकर, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती मधु जैन, श्रीमती दराडे, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री सुभाष चव्हाण, गुरूनाथ कुलकर्णी, केशवराव मानकर, अशोक मानकर, दिवाकर रावते, जयंत प्र.पाटील, परशुराम उपरकर, प्रकाश शेंडगे, रमेश शेंडगे, भगवानराव साळुंखे, जैनुद्दिन जव्हेरी, पाशा पटेल, रामनाथ मोते, सय्यद जामा, अरूण गुजराथी, चंद्रकांत पाटील आणि आणखी सन्माननीय सदस्यांनी या चर्चेत भाग घेतला. यातील काही सन्माननीय सदस्यांची भाषणे ही अतिशय विस्तृत आणि प्रत्येक परिच्छेदावर, प्रत्येक प्रश्नावर अतिशय सखोल अशी चर्चा करणारी झालेली आहेत. मी या सर्व चर्चेचे स्वागत करतो आणि त्यातून जी न्यूनता सदस्यांनी येथे दाखवून दिली आहे ती खरोखरी वास्तविकता असेल तर त्या संदर्भात ती तपासून निश्चितपणे सुधारणा करण्याचा मानस या शासनाचा आहे आणि त्या अर्थाने मी दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांच्या भाषणाचे, त्यांनी त्याद्वारे केलेल्या विश्लेषणाचे स्वागत करतो.

सभापती महोदय, हे जे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे हे दोन महत्त्वाच्या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर सुरू झालेले आहे. एक तर देशात जगातील सर्वात मोठ्या लोकशाहीचे सरकार आणण्यासाठी ज्या निवडणुका झाल्या त्यांची पार्श्वभूमी आहे. त्यात आपण पाहिले तर महाराष्ट्रातीलच नव्हे तर या देशातील सुजाण मतदारांनी आपला कौल आघाडी सरकारच्या बाजूने

..... एफ 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भुजबळ ...

निश्चितपणे दिलेला आहे. त्यामुळे भारत सरकारमध्ये माननीय श्री.मनमोहन सिंग यांच्या नेतृत्त्वाखाली काँग्रेस पक्षाचे सरकार पुन्हा स्थापन झाले. या देशातील मतदार जनता ही बरीचशी सुजाण झालेली आहे त्यामुळेच हे शक्य झाले. 60 वर्षांची आमची लोकशाही प्रगल्भ झाली आहे. त्यामुळे आम्ही कितीही भाषणे केली, बोललो तरी निश्चितपणे आम्ही काय कृती केली आणि ती योग्य होती की नव्हती याचीच पावती देशातील सुजाण मतदार देत असतात. त्यामुळेच देशात एकाच वेळी आंध्रतील माणूस जे करतो तेच केरळातील, पंजाब मधील, ओरिसातील माणसे करतात हे लक्षात येते. अर्थात त्यासाठी आपल्याकडील पॉवरफुल मिडिया जो निर्माण झालेला आहे मग तो दूरदर्शन माध्यमातील असो वा प्रिंट मिडिया असेल त्या सगळ्यातून सर्वसामान्य माणूस, मतदार आपले मत बनवित असतो. त्यामुळे जगातील सर्वात मोठ्या अशा या लोकशाहीतील निवडणुकांचे निकाल जे लागले आहेत ते अनेकांच्या अपेक्षा भंग करणारे असे लागले आणि ते तसे निश्चितपणे आहे असे मला वाटते. ...

(यानंतर श्री. सरफरे .... जी 1 ..

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ...

त्याचबरोबर लोकशाही प्रगल्भ होत चालली आहे याची साक्ष देणारे आहे. किंबहुना, माननीय पंतप्रधान श्री. मनमोहनसिंग स्वत: म्हणाले की, या मिळालेल्या यशामध्ये दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. यामध्ये शहरामधील लोकांच्या सोयीसाठी पहिल्यांदा केंद्र सरकारने मोठया प्रमाणात पैसा उपलब्ध करुन दिला. मी दोन वेळा मुंबई शहराचा महापौर होतो. त्यावेळी या मुंबई शहराला केंद्र सरकारने पैसे द्यावेत म्हणून सतत मागणी करीत होतो. टॅक्सच्या रुपाने मिळणाऱ्या रकमेच्या 80 टक्के, 60 टक्के रक्कम केंद्र सरकारला देत असतांना सुध्दा आम्हाला काहीही मिळत नव्हते. त्यानंतर 1985 मध्ये केंद्र सरकारचे अधिवेशन झाले त्यावेळी देखील मी महापौर होतो. त्यावेळी मी म्हणालो होतो की, या शहरामध्ये इतर राज्यांमधून लोकांचे लोंढे येत असतांना आपण या शहराला काहीही अनुदान देत नाही. त्यावेळी या शहरासाठी कै. श्री. राजीव गांधी यांनी 100 कोटी रुपये जाहीर केले. ते पैसे आपण धारावीच्या प्रकल्पासाठी वापरले. त्यानंतर सुध्दा आम्हाला पैसे द्या म्हणून आपले केंद्र सरकारबरोबर वाग्युध्द सुरु होते. ही शहरे संपूर्ण देश चालवितात, त्यामुळे शहरांना मरु देऊ नका. सभापती महोदय, आनंदाची गोष्ट अशी की, केंद्र सरकारने या सर्व गोष्टींचा विचार करुन मुंबई, दिल्ली, कलकत्ता इतकेच नव्हेतर नाशिक व पुणे या शहरांसाठी अक्षरश: हजारो कोटी रुपयांचे अनुदान मंजूर केले. किंबहुना, फार मोठया प्रमाणात अनुदान आले. त्याचा निश्चितपणे जनतेवर परिणाम झाला. त्याचबरोबर हे सुध्दा सांगितले पाहिजे की, या निर्णयाचा नागरी क्षेत्रावर जसा परिणाम झाला त्याप्रमाणे ग्रामीण भागातील कृषी क्षेत्रासाठी सुध्दा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा निर्णय घेण्यात आला. आपल्याला कल्पना आहे की, हा महत्वाचा निर्णय माननीय कृषी मंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या नेतृत्वाखाली घेण्यात आला. त्याचाही उपयोग ग्रामीण भागातील मतदारांना आकर्षित करण्यासाठी झाला. त्यामुळे या संदर्भातील माननीय पंतप्रधानांचे शब्द बोलके आहेत. केंद्र सरकारने सामान्य लोकांचा विश्वास संपादन केल्यामुळे देशामध्ये निवडणुका आल्यानंतर आपण केलेल्या योग्य कामाची पावती महाराष्ट्रातील व देशातील मतदारांनी दिली. अशाप्रकारचे अनेक प्रसंग याठिकाणी आपल्याला सांगता येतील. याठिकाणी दोन महत्वाचे विषय सांगितले. त्यानंतर आणखी एक महत्वाचा विषय म्हणजे यावर्षी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेला 50 वर्षे पूर्ण होत आहेत. या सुवर्ण महोत्सवी वर्षातील राज्य विधीमंडळाच्या विद्यमान सभागृहाचे शेवटचे अधिवेशन आहे. 105 हुतात्म्यांच्या बलिदानाने संयुक्त

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. छगन भुजबळ...

महाराष्ट्राची निर्मिती झाली. त्याचा इतिहास सर्व माननीय सदस्यांनी सांगितला. महाराष्ट्राने ज्या अनेक नेत्यांचा गौरव केला त्या नेत्यांनी या आंदोलनाचे नेतृत्व केले, ते न विसरता येण्यासारखे आहे. त्यामध्ये अनेक लोक सामील होते. त्यावेळी आम्ही लहान होतो. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला पाहिजे एवढी घोषणा लक्षात असायची. म्हणजे काय झाले पाहिजे हे कळत नव्हते. परंतु काहीतरी गडबड आहे, काहीतरी केले पाहिजे अशी एक प्रकारची ऊर्मी होती. संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेकरिता सर्व जाती धर्म विसरुन अतिशय प्रखर असा लढा द्यावा लागला. खरे म्हणजे तो लढा देण्याची गरज नव्हती. कारण प्रत्येक राज्यामध्ये भाषावार प्रांत रचना झालेली आहे. त्याप्रमाणे् महाराष्ट्राची सुध्दा प्रांत रचना झाली पाहिजे. त्यामध्ये मुंबई महाराष्ट्रात असल्यामुळे तिचा महाराष्ट्रामध्ये समावेश झाला पाहिजे ही आमची मागणी अजिबात चुकीची नव्हती. तरीसुध्दा म्हटले जाते की, महाराष्ट्राला सहज काही मिळत नाही. त्याप्रमाणे मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र सुध्दा सहज मिळालेला नाही. या आंदोलनामध्ये ज्याप्रमाणे 105 हुतात्म्यांनी बलिदान दिले त्याप्रमाणे आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, प्रबोधनकार ठाकरे, पेंडसे या नेत्यांनी व शाहीर अमरशेख, जंगम स्वामी, शहाजी पाटील यांनी सुध्दा भाग घेऊन संयुक्त महाराष्ट्र उभा केला होता.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

गवताच्या पात्याला जशी तलवारीची धार चढते, तसे झाल्याचे आपण त्यावेळी पाहिलेले आहे. त्यावेळी ही लढाई अतिशय जोरकसपणे लढली गेली आणि सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे कै.यशवंतराव चव्हाण यांनी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेचा मंगल कलश आणला. त्यानंतर कै.यशवंतराव चव्हाण यांनी हा महाराष्ट्र कोणत्या दिशेने जाणार आहे याबाबतीत पूर्णपणे आखणी केली, महाराष्ट्राचा फ्युचर प्लॅन तयार केला. शिक्षण क्षेत्रामध्ये, सामाजिक क्षेत्रामध्ये, उद्योग क्षेत्रामध्ये कोणत्या गोष्टी कराव्यात, हे राज्य कशा प्रकारे पुढे गेले पाहिजे या संबंधीचा प्लॅन या युग पुरुषाने तयार केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितले, ते खरे आहे. कै.यशवंतराव चव्हाण यांना त्यावेळी वारंवार असा प्रश्न विचारण्यात आला की, हे राज्य कोणाचे होणार आहे ? हे राज्य मराठ्यांचे होणार की मराठीचे होणार आहे ? तेव्हा एका क्षणाचा विलंब न लावता त्यांनी असे सांगितले की, हे मराठीचे राज्य होणार आहे. तेव्हा पासून या महाराष्ट्रामध्ये वेगवेगळी सरकारे सत्तेवर आली आणि प्रत्येक सरकारच्या माननीय मुख्यमंत्र्यांनी आपापल्या कुवती नुसार राज्य पुढे नेण्यासाठी प्रयत्न केला.

सभापती महोदय,कै.वसंतराव नाईक यांनी हरितक्रांतीची घोषणा केली. त्यावेळी महाराष्ट्रा-मध्ये प्रचंड प्रमाणात दुष्काळ पडला होता याची आपल्याला सर्वांना कल्पना आहे. तेव्हा कै.वसंतराव नाईक यांनी सांगितले होते की, मी या राज्यामध्ये पुन्हा दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ नये यासाठी शेतीमध्ये क्रांती घडवून आणली नाही तर मला फासावर द्यावे आणि खरोखरच कै.वसंतराव नाईक यांनी हायब्रिडच्या बाबतीत क्रांती करुन दाखविली.तसेच कै.वसंतदादा पाटील साहेबांसारखा अतिशय गुणसंपन्न आणि कार्यकर्त्यांची जाण असलेल्या,जमिनीच्या प्रश्नाची माहिती असलेल्या नेत्याने अनुदानित कॉलेजेस वगैरे,वगैरे.सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत पाटील यांनी सांगितले. परंतु आपल्याला याची कल्पना नाही.मी त्यावेळची परिस्थिती सांगत आहे. महाराष्ट्रातील मुलांना राज्यामध्ये मेडिकलला प्रवेश मिळाला नाही तर "मणिपाल" येथे जावे लागत होते किंवा आणखी दुसरीकडे जात असत. परंतु "मणिपाल" येथे नक्की जात होते हे मला नक्की माहिती आहे. आणि तेथील कॉलेजमध्ये जाऊन पैसे भरत असत. तेथे मोठमोठी कॉलेजेस सुरु होत होती आणि आपण काही करु शकत नव्हतो.शेवटी काही झाले तरी महाराष्ट्राकडे असलेला पैसा, साधनसामुग्री आणि मेडिकल कॉलेज, इंजिनिअरींग कॉलेज काढण्यासाठी पाहिजे असलेला पैसा आणि लोकांकडून होत

. . . .एच-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असलेली मागणी यातील तफावत राज्य शासनाला एकतर्फी भरुन काढणे शक्यच नव्हते. त्यामुळे ज्याप्रमाणे इतर ठिकाणी इंजिनिअरींग कॉलेज, मेडिकल कॉलेज खाजगीरित्या सुर करण्यात आली, तशा प्रकारे आपण देखील ही कॉलेजेस् खाजगीरित्या का सुरु करावयाची नाहीत असा विचार करुन, त्यावेळी कै.वसंतदादा पाटील यांनी याबाबतीत अतिशय धाडसी निर्णय घेतला आणि आज आपण पहात आहोत की,राज्यामध्ये अनेक खाजगी मेडिकल व इंजिनिअरींग कॉलेजेस सुरु झालेली आहेत.हे खरे आहे की,त्याठिकाणी परदेशातील आणि परप्रांतातील मुले शिक्षण घेण्यासाठी येत आहेत. पण त्याचबरोबर या राज्यातील मुलांना देखील याचा फार मोठया प्रमाणात फायदा होत आहे हे आपण विसरता कामा नये.जर आपण असा विचार केला नसता तर अजुबाजूच्या राज्यांमध्ये अशा प्रकारची कॉलेजेस सुरु झाली असती आणि आपल्या राज्यातील मुलांना तेथे शिक्षणासाठी जावे लागले असते. परंतु त्याऐवजी आपल्या राज्यामध्ये अशा प्रकारची कॉलेजेस सुरु झाल्यामुळे त्याचा फायदा आज आपल्या राज्यातील सर्व मुलांना होत आहे. अशा प्रकारे आपल्या राज्यामध्ये एकेक माननीय मुख्यमंत्री झाले, त्यांनी अनेक चांगल्या प्रकारचे निर्णय घेतले आणि त्या माध्यमातून हे राज्य समृध्द करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात आली.

सभापती महोदय, हे खरे आहे आणि वर्तमानपत्रामध्ये काही प्रश्न चर्चेला येत आहेत की, संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनामध्ये 105 हुतात्म्यांनी जे बलिदान दिले, त्यांच्या बाबतीत काय ? यासंदर्भात श्री.दत्ता घाडीगावकर यांची वर्तमानपत्रामध्ये पत्र येत आहेत. मला आठवते की, मी 1985 मध्ये मुंबईचा महापौर होतो. दि.26 जानेवारी 1985 मध्ये "बॉम्बे" चे "मुंबई" असे नामकरण करण्यात आले आणि त्याच वेळेला हुतात्मा स्मारक दीड महिन्याच्या आत सुशोभित करण्याचे काम देखील सुरु केले. मला आठवते की, त्यावेळी श्री.प्रवीण काटवे हे आर्कीटेक्ट आणि अतिरिक्त आयुक्त श्री.राममूर्ती होते. हे दोघेजण रात्री 2 वाजता देखील तेथे जाऊन पहाणी करीत होते आणि ते काम 28 दिवसामध्ये पूर्ण झाले आहे. परंतु हे हुतात्मा स्मारक वरुन दिसते, तेवढेच नाही तर या हुतात्मा स्मारकाच्या ठिकाणी दोन-तीन मजले होतील, इतके त्याचे फाऊंडेशन आहे. जेणेकरुन ते मजबूत राहील आणि त्याला कधी तडा जाणार नाही. हे सांगण्याचा उद्देश असा की, त्यावेळी काही सन्माननीय सदस्यांनी मागणी केली होती की, संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी जे 105 हुतात्म्यांनी बलिदान केले. त्या बाबतीत काय ?तसेच त्यावेळी बहुतेक श्री.सदाशिव तिनईकर

. . . .एच-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ . . . .

साहेब कमिशनर असावेत किंवा त्यानंतर या पदावर आले असावेत. त्यावेळी संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनातील 105 हुतात्म्यांच्या नातेवाईकांना पेन्शन देण्याच्या बाबतीत प्रश्न पुढे आला.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ .....

त्या नंतरच्या काळामध्ये त्यांनी ते रेकॉर्ड काढले त्यामध्ये असे होते की, महाराष्ट्राचे 105 लोक मारले गेले आहेत. त्याठिकाणी दंगल झाली. सभापती महोदय, त्या दंगलीच्या संदर्भात गुंड हा शब्द वापरण्यात आला होता की काय याची मला माहिती नाही. पण मारले गेले आहेत असा शब्द होता म्हणून ते म्हणाले दंगलीत मारले गेलेले लोक आहेत त्यांना आम्ही पैसे कशासाठी देणार. त्यामुळे तो एक मोठा विषय निर्माण झाला. सुदैवाने त्या वेळी जे कोणी मुख्यमंत्री होते त्यांनी प्रयत्न केले, आम्हीही प्रयत्न केले. त्यामुळे यासंबंधीचे रेकॉर्ड दुरुस्त करण्याचा प्रयत्न झाला. त्यानंतर या हुतात्म्यांच्या कुटुंबियांना बोलावून त्यांना मदत देण्याचा प्रयत्न झाला. परंतु आजही त्यामध्ये कन्फ्युजन आहे. संदिग्धता आहे. त्यावेळेला महानगरपालिकेने काही पैसे दिले याची मला कल्पना आहे. परंतु शासनातर्फे पेन्शन दिले जात आहे काय? किंवा अन्य काही व्यवस्था केलेली आहे काय? याचा तपास घेण्याची आणि यातून मार्ग काढण्याची आवश्यकता आहे. जर याबाबतीत काही झाले नसेल तर निदान या सुवर्णमहोत्सवी वर्षामध्ये तरी काही केले पाहिजे. त्याबाबतीत काही अडचणी असतील तर त्या दुरुस्त करण्याची आमची सगळयांची निश्चितपणे तयारी आहे. पण महाराष्ट्राची निर्मिती ही 105 हुतात्म्यांचे बलिदान देऊन झालेली आहे. हा जो जाज्वल्य इतिहास निर्माण झाला आहे, तो इतिहास परत एकदा आजच्या पिढीसमोर मांडण्याचे काम आपल्याला करावे लागेल. याबाबतीत काही बैठका झालेल्या आहेत. यासंदर्भात विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी देखील काही सूचना केलेल्या आहेत. या सुवर्णमहोत्सवाचे केवळ उत्सवी स्वरुप नसावे असे म्हटले आहे, ते बरोबर आहे. महाराष्ट्राला एक नवीन दिशा देणारे स्वरुप असावे. मग उद्योग असेल, शिक्षण असेल शेतीच्या बाबतीत काही तरी नवीन दिशा देणारे स्वरुप असावे. कलेच्याबाबतीत, क्रीडेच्या बाबतीत नवीन कार्यक्रम आखले जावेत. पण त्याचबरोबर मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाला म्हणजे झाले तरी काय, हे आजच्या इयत्ता 7 वी, 8वी, 9 वी व 10 वीच्या विद्यार्थ्यांना माहीत नाही. महाराष्ट्र आहे. गुजराथ आहे, हे बरोबर आहे. लढाई झाली ती कशी झाली.? सभापती महोदय, येथे जो जाज्वल्य संग्राम झाला त्याची पूर्ण माहिती तसेच तेथील सेनापतींची माहिती सुध्दा सातत्याने सगळयांच्या डोळयासमोर गेली पाहिजे. म्हणून याबाबतीत विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात धडे असावेत, आणि त्याना याबाबतचे शिक्षण द्यावे, अशा निरनिराळया चांगल्या सूचना करण्यात आलेल्या आहेत. या महाराष्ट्राच्या इतिहासाचे,संस्कृतीचे, शिक्षणाचे ग्रथालये

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

श्री. छगन भुजबळ....

असावे, म्युझियम असावे, प्रदर्शनी असावी अशा प्रकारच्या चांगल्या सूचना आलेल्या आहेत. अजूनही काही सूचना येतील त्या सूचनांनुसार काम करुन निश्चितपणे पुढच्या पिढीला सुध्दा संयुक्त महाराष्ट्राच्या लढयाची आठवण होईल अशा प्रकारचे काम करावे लागेल. त्याचबरोबर महाराष्ट्र राज्याच्या 50 व्या वर्षानंतर पुढील पंचवीस वर्षानंतरचा महाराष्ट्र कसा असेल याचे दिशा दर्शन या वर्षात करावे लागेल. हे करीत असताना या शासनाचे मन खुले आहे. त्याचे श्रेय फक्त या शासनाला घ्यावयाचे आहे, अशातला भाग नाही. आपल्यापैकी अनेक लोक आहेत. किंवा या सभागृहात जे नाहीत परंतु बाहेर आहेत त्यांना सुध्दा या महाराष्ट्राच्या बाबतीत प्रेम आहे. महाराष्ट्र कसा असावा यासंदर्भात त्यांच्या काही कल्पना आहेत. विचार आहेत. या सगळयांच्या सूचनांचा विचार करुन शासनाला निर्णय घेता येईल.

सभापती महोदय, काही दिवसानंतर खरीप हंगामाला सुरुवात होणार आहे त्यामुळे बी-बियाणांच्या बाबतीत सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी चिंता व्यक्त केलेली आहे. गेल्या महिन्यात दि. 13 मे ला मंत्रिमंडळाच्या बैठकीच्यावेळी बी-बियाणांच्या बाबतीत, खतांच्या बाबतीत पूर्ण आढावा घेण्यात आला आहे. या राज्यातील शेतकऱ्यांना पुरेसा खत मिळावा याचे नियोजन शासनाने केलेले आहे. कृषी आयुक्तालयात, मंत्रालयात आणि विभागीय स्तरावर खत पुरवठयाचे नियंत्रण करण्यासाठी एक कक्ष निर्माण करण्यात आलेला आहे. बियाणांचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच बियाणांची मागणी निश्चित करण्यात आलेली आहे. राज्याची एकूण बी-बियाणांची गरज 16.72 लाख क्विन्टल इतकी आहे परतु एकूण 18.24 क्विन्टल इतकी उलब्धता आहे. बी.टी. कापसाच्या बियाणाच्या किंमती सुध्दा नियंत्रित करण्यात आलेल्या आहेत. राज्यातून 35 लाख मेट्रीक टन खताच्या पुरवठयाचे नियोजन करण्यात आले असून केंद्र शासनाने खतांच्या मागणीला मंजुरी दिली आहे. युरिया आणि संयुक्त खताचा पुरवठा तुलनेने कमी आहे. तो वाढविण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. 2.80 लाख मेट्रीक टन डी.ए.पी.चा संरक्षित साठा केला असून वेळीच तो शेतकऱ्याना उपलब्ध करुन देण्यात येत आहे. राज्यात अधिक मिश्रखत उत्पादन करण्यासाठी मिश्रखत उत्पादकांना सुध्दा परवानगी दिलेली आहे. साधारणपणे साडेतीन लाख मेट्रीक टन इतका मिश्रखत खरीप हंगामासाठी उपलबध होत आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशासकीय सदस्य / शासकीयसाठी नाही

श्री. छगन भुजबळ.....

विक्रेत्यांपर्यंत, उत्पादकांपर्यंत खत उपलब्ध करण्यासाठी वाहतूक अनुदान सुध्दा देण्याचे ठरलेले आहे. त्यासाठी या वर्षी 20 कोटी रुपये निधी उपलब्ध केला आहे. राज्यात खरीप हंगामात एमआपीपेक्षा जास्त किंमतीने खते आणि बियाणे विकणाऱ्यांवर व साठेबाजी करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश सुध्दा देण्यात आलेले आहेत. हे राज्य, हे शासन शेतकऱ्यांचे आहे, श्रमिकांचे आहे असे आपण सगळे म्हणतो. किंबहुना आपण जे हुतात्मा स्मारक उभे केलेले आहे, त्या ठिकाणी जो पुतळा उभा केलेला आहे त्यामध्ये एका बाजूला शेतकरी आणि आणि दुसऱ्या बाजूला श्रमिक कामगार आहे. हे राज्य श्रमिकांचे आहे, शेतकऱ्यांचे आहे याची आपल्याला सतत आठवण करुन देणारे ते प्रतीक आहे. कापूस उत्पादक असो, पशुसंवर्धनावर उपजीविका करणारा शेतकरी असो, शासनाने एकूणच कृषी क्षेत्राच्या बाबतीत महत्वाची पावले उचललेली आहेत. विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्येच्या प्रमाणामध्ये लक्षणीय घट झालेली आहे. या भागात सिंचनाच्या चांगल्या सोयी उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न सुरु आहे आणि काही सोयी झालेल्या आहेत. पर्यायी उत्पन्नाची साधने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहेत.

सामूहिक विवाहासारख्या योजनेमध्ये सुमारे 17 ते 18 हजार सामूहिक विवाह झालेले आहेत. कर्ज घेऊन नंतर आत्महत्या होतात त्यामुळे हा सुध्दा एक उपाय आपल्याला कदाचित छोटा वाटेल पण त्याच्यामुळे निश्चितपणे फायदा होत आहे. विदर्भातील शेतकऱ्यांना शासनाचा दिलासा मिळत असल्याने विदर्भाने सुध्दा नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये चांगले यश सुध्दा दिलेले आहे. केंद्राने घोषित केलेल्या कर्जमाफीच्या योजनेची व्याप्ती वाढावी, त्यामध्ये आणखी काही लोकांचा समावेश व्हावा म्हणून राज्य सरकारने सुध्दा 6208 कोटीचे पॅकेज जाहीर केले. केंद्र आणि राज्याच्या एकत्रित पॅकेजमुळे 78 लाख शेतकऱ्यांचा फायदा झाला आणि त्यामुळे निश्चितपणे चांगला परिणाम झाला. अर्थात कोणीही जरी ठरविले तरी असलेले पैसे उपलब्ध करुन देत असताना आपण कर्जमाफी कशी करावी याबाबत जेव्हा एखादा फॉर्म्युला काढावयास जाऊ तेव्हा कधीही कोणाचे एकमत होणार नाही. कोणी ना कोणी त्याच्या बाहेर राहूनच जातो. कोणाची तरी अडचण निर्माण होणारच आहे. त्यामुळे कधीही देण्यात आली नव्हती अशी जास्तीत मदत, कर्ज फेडण्यासाठी असलेले पैसे केंद्र आणि राज्य शासनाने उपलब्ध करुन दिले. जेवढे शक्य आहे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MMP

श्री. छगन भुजबळ .....

त्यांना मिळाले आणि ती संख्या सुध्दा मोठी आहे. ज्यांना आवश्यकता आहे त्यांना मिळाले आहे, हे लक्षात घ्यावे. कधी कधी असे होते की, शेजाऱ्याला 50 लाख रुपये मिळाले आणि मला फक्त दोनच लाख रुपये मिळाले. आपण केस टू केस विचार करावयाचा म्हटला तर या खंडप्राय देशामध्ये आपण कधीही निर्णय घेऊ शकणार नाही. आपल्याला सामूहिकरित्या निर्णय घ्यावे लागतात. सन 2008-09 या एका वर्षासाठी सिंचन क्षेत्रातील अनुशेष दूर करण्यासाठी 6507 कोटी रुपयांची तरतूद आपण केली आणि महत्वाचे पाऊल टाकले. अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांना 100 टक्के अर्थसहाय्य दिले आणि त्यांना पॉवर टिलर देण्याचा निर्णय घेतला. शेतकऱ्यांच्या आर्थिक उत्पन्नामध्ये वाढ कशी होईल याचा विचार केला. कापूस उत्पादक शेतकऱ्यांना सुध्दा आपण किफायरशीर किंमत दिली. काही वेळा जे नुकसान आहे ते राज्य शासनाने भरण्याचा सुध्दा निर्णय घेतला. केंद्र शासनाने तर नुकसान सोसलेच पण राज्य शासनाने सुध्दा त्यासाठी नुकसान सोसले आहे. दर्जेदार दूध उत्पादनासाठी दूधसंघाचे बळकटीकरण करण्यास सुरुवात केलेली आहे. मच्छिमारांना अनुदान दिलेले आहे. मासेमारी करताना अपघात झाला तर विम्याचे संरक्षण दिलेले आहे. आतापर्यंत कोकणातील विशेषत: मच्छिमारांचे जे प्रश्न आहेत ते अनेक वर्षे मांडण्यात आले पण कदाचित त्याकडे लक्ष देण्यात आले नसावे. पण अलीकडच्या काळामध्ये आपण पाहिले तर त्यांच्या प्रश्नाकडे सुध्दा शासनाने फार मोठ्या प्रमाणामध्ये लक्ष दिलेले आहे.

सभापती महोदय, हे खरे आहे की, राज्यातील कायदा व सुव्यवस्था या विषयावर विरोधक फार अस्वस्थ आहेत आणि ते स्वाभाविक आहे. परंतु गेल्या सात ते आठ महिन्यामध्ये राज्यातील पोलीस दलाच्या सक्षमीकरणासाठी, त्यांना सुसज्ज करण्यासाठी राज्य शासनाने मनापासून पावले उचललेली आहेत. निवडणुकीच्या काळात कोठेही अनुचित प्रकार घडणार नाही याची पुरेपूर काळजी घेतलेली आहे. नक्षलग्रस्त भागामध्ये या काळात चांगले मतदान झाले आहे. दुर्दैवाने नंतर नक्षलवाद्यांनी छुपा हल्ला चढवून पोलिसांचे मनोधैर्य खच्ची करण्याचा प्रयत्न केला परंतु मी सांगू इच्छितो की नक्षलवादाशी खंबीरपणे मुकाबला करण्यासाठी सुध्दा शासन निश्चितपणे पावले टाकत आहे. नक्षलग्रस्त भागामध्ये नक्षलवाद जास्त वाढू नये, फोफावू नये म्हणून त्यांचे जे आर्थिक प्रश्न आहेत ते सोडविण्यासाठी 1386 कोटी रुपयांचा विशेष कृती कार्यक्रम राबविण्यास मंजुरी दिली.

यानंतर श्री. खंदारे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

हा कार्यक्रम 2009-10 ते 2011-12 पर्यंत म्हणजे 3 वर्षात राबविण्यात येईल. या कार्यक्रमासाठी संबंधित मंत्रालयाने निधी उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे. महाराष्ट्राबरोबर मुंबई शहर सुंदर होणे अत्यंत महत्वाचे आहे. या मुंबईसाठी शासनाकडून काय दिले जाते असा नेहमी प्रश्न विचारला जातो. देशाला अर्थपुरवठा करणारी ही रक्तवाहिनी आहे. त्यामुळे मुंबई सक्षमपणे उभी राहिली पाहिजे, जीवंत राहिली पाहिजे आणि हे देशाच्यादृष्टीने गरजेचे होते. म्हणून मागील 4-5 वर्षामध्ये या मुंबईकडे केंद्र व राज्य सरकाने अधिक लक्ष दिलेले आहे. वरळी-वांद्रे सागरी सेतूचे काम संपण्याच्या मार्गावर आहे. या कामाला उशीर झाला आहे या मताशी मी सहमत आहे. भर समुद्रामध्ये या सेतूचे काम होत असल्यामुळे ते एक आव्हानात्मक काम होते. कलकत्ता येथे हावडा ब्रिज आहे, परंतु तो ब्रिज नदीवर बांधण्यात आलेला आहे हे येथे लक्षात घेतले पाहिजे. पण हा ब्रिज भर समुद्रात बांधला जात असल्यामुळे मुंबईच्या दृष्टीने हा महत्वाचा पूल आहे. (अडथळा) पर्यावरण विभागाची अडचण येऊ नये म्हणून या पुलाच्या आराखडयामध्ये बदल करण्यात आला. (अडथळा) सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अनेक मुद्दे उपस्थित केलेले असल्यामुळे मी त्या मुद्यांना उत्तर देत आहे, परंतु माझ्या उत्तराला सन्माननीय सदस्य प्रत्युत्तर देऊ लागले तर मला माझे उत्तर पूर्ण करणे अवघड होईल. तेव्हा मला माझे भाषण पूर्ण करु द्यावे अशी मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो.

सभापती महोदय, मुंबईमध्ये मेट्रो रेल्वे टप्पा क्रमांक 1, वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मार्ग पुढील वर्षात कार्यान्वित होणार आहे. 1985 साली राज्यात युतीची सत्ता आली होती, त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेमध्ये शिवसेना सत्तेवर आली तेव्हापासून मुंबईत मेट्रो रेल्वे सुरु व्हावी, भुयारी रेल्वे सुरु व्हावी असे प्रयत्न सुरु होते. त्यावेळी हे काम झाले नाही. परंतु आता हे काम होत आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर हा मेट्रो रेल्वे मार्ग पुढील वर्षी कार्यान्वित होत आहे. त्याचप्रमाणे मोनोरेलचे काम सुरु झालेले आहे. हा प्रकल्प सुध्दा पुढील वर्षी सुरु होईल. मुंबईच्या दृष्टीने हा महत्वाकांक्षी प्रकल्प झालेला आहे. केंद्रामध्ये एनडीएची सत्ता होती, राज्यामध्ये सत्ता होती, त्यावेळी ही कामे झाली नाहीत, परंतु आता होत आहेत. त्यामुळे या कामांबाबत विरोधी पक्षाच्या

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ MMP/ KGS/

श्री.छगन भुजबळ...

सन्माननीय सदस्यांनी चांगले बोलले पाहिजे. सभापती महोदय, मिठी नदीचे काम एमएमआरडीए आणि मुंबई महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे. मुंबईतील आंतरराष्ट्रीय विमानतळामध्ये अत्याधुनिक सुधारणा केल्या जात आहेत. मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद येथील विमानतळांची कामे आंतरराष्ट्रीय दर्जाची होत आहेत. या कामासाठी टप्प्याटप्प्याने खर्च करुन ही सर्व विमानतळे सुंदर व आंतरराष्ट्रीय दर्जाची केली जात आहेत ते मान्य करावे लागेल. नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे विमानतळ होणार आहे. (अडथळा) सभापती महोदय, मुंबई-नाशिक-धुळे-मध्य प्रदेश राज्याच्या सीमेपर्यंत 3 हजार कोटींपेक्षा अधिक किंमतीचा प्रकल्प आखलेला आहे. जेव्हापासून मी या खात्याचा मंत्री म्हणून पदभार स्वीकारला तेव्हापासून केंद्र सरकारकडून या प्रकल्पासाठी मदत मिळण्याकरिता दिल्लीला माझ्या 60-70 फे-या झालेल्या आहेत. माननीय श्री.शरद पवार यांची मदत घेऊन केंद्र सरकारकडून जास्त मदत उपलब्ध करुन घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. भिवंडीपासून गोंदे पर्यंतच्या रस्त्याचे काम पूर्ण होत आहे. कित्येक वर्षापूर्वी ब्रिटिशांनी कसारा घाट बांधला होता. परंतु पहिल्यांदाच घाटाच्या ठिकाणी नवीन रस्ता निर्माण करण्यात आला आहे. पूर्वी एखादी गाडी बंद पडली तर घाटाचा रस्ता 10-10 तास बंद पडत होता. आता पूर्वी सारख्या 2-4 चाकांच्या गाडया या रस्त्यावरुन जात नाहीत तर 15, 20, 100 चाकांच्या इतक्या मोठमोठया गाडया या रस्त्यावरुन जातात. या रस्त्यावरील वर्दळ वाढलेली आहे. घाटाच्या ठिकाणचा रस्ता परवाच सुरु झाला आहे आणि बाकीचा रस्ता सुध्दा होत आहे ही आनंदाची गोष्ट आहे आणि मला वैयक्तिकरित्या सुध्दा त्याचा अभिमान वाटतो.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

नवी मुंबई आतंरराष्ट्रीय विमानतळाला देखील केन्द्र शासनाने मान्यता दिलेली आहे. सी.आर. झेड.चे नियम देखील विशेष बाब म्हणून शिथिल करण्यात आलेले आहेत. त्यामुळे अतिशय चांगले, उत्तम, आधुनिक अशा त-हेचे विमानतळ नवी मुंबईमध्ये , मुंबई, महाराष्ट्र अणि देशाच्या भल्यासाठी निर्माण होत आहे. मुंबईसाठी आपणास पाण्याची गरज आहे म्हणून मध्य वैतरणा पाणी पुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे.. ब्रिमस्टोवॅड प्रकल्पासाठी माननीय पंतप्रधानानी 500 कोटीचा पहिला हप्ता मुंबईच्या महापौरांना स्वहस्ते प्रधान केलेला आहे. ही आनंदनाची गोष्ट आहे. नाही तर आपल्याला कोण पैसे देत होते ? त्यांनी 500 कोटी रु. दिले. या योजनेला 1200 कोटी रुपयाचा खर्च अपेक्षित आहे. यंदा 600 कोटी रुपये केन्द्र शासना कडून मिळणार आहेत. 64 स्कायवॉक बांधण्याची योजना राबविण्यात येत आहे. 50 स्कायवॉक 2009 पर्यन्त तयार होतील. मेट्रो रेल टप्पा-2 चारकोप-बांद्रा-मानखुर्द या प्रकल्पाच्या कामाच्या निविदा अंतिम टप्प्यात आहेत. मुंबई शहर आंतरराष्ट्रीय विकास केन्द्र करण्यासाठी राज्य शासनाने केवळ मुंबईचाच नव्हे तर आजुबाजूच्या 4355 चौ. कि.मी. मुबई मेट्रोपोलिटन रिजनच्या विकासाची सर्व समावेशके योजना तयार केली आहे. विरार ते अलिबाग अशा 13 नगरपालिका, 7 महापालिकांचा यामध्ये समावेश असून त्यासाठी अंदाजित 1 लाख 35 हजार कोटी रुपये या विकासासाठी अपेक्षित आहेत. अशा त-हेने मुंबईच्या बाबतीत काम केलेले आहे. माझ्याकडे बोलण्यासाठी बरेच मुद्दे आहेत. वेळ कमी असल्यामुळे मी महत्वाचे मुद्दे येथे मांडणार आहे. पाणी टंचाईच्या आरखडच्या बाबतीतील मुद्दा आहे. महाराष्ट्रातील रेल्वे प्रश्न केन्द्राकडे आताच मांडलेले आहेत. पाणी टंचाईचा कृती आराखडा तयार करण्यात आलेला आहे. कोकणचा विकास कसा करावा यासाठी सन्माननीय मंत्री महोदय श्री. नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण केलेली आहे, खानदेशच्या विकासासाठी नेमलेल्या समितीचे मी स्वत: अध्यक्ष म्हणून काम पहात आहे. अल्पसंख्यांकासाठी कल्याणकारी योजना निर्माण केलेल्या आहेत. राज्य सरकारच्या माध्यमातून साडेआठ हजार कोटी रुपयाचा अडीच हजार कि.मी. लांब मार्गाच्या 39 फोरलेनच्या प्रकल्पांना आपण मान्यता दिलेली आहे. सप्तश्रृंगी गड आणि हाजीमलंग गड ज्याला आपण मलंग गड म्हणता याठिकाणी फिनीक्यूलर ट्रेनचे काम देशामध्ये पहिल्यांदा सुरु करीत आहोत. नाशिक मार्गाच्या चौपदरीकरणाचे काम सुरु

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. छगन भुजबळ....)

आहे. राज्यातील 40242 गावापैकी 39106 गावे बारमाही रस्त्याने जोडण्यात आलेली आहेत. पंतप्रधान ग्रामसडक योजनेची कामे देखील मोठ्या प्रमाणात केलेली आहेत. हे सर्व करीत असताना या सभागृहामध्ये अलिकडे मुंबईवर झालेल्या हल्ल्याच्या संदर्भात फार मोठी चर्चा झाली.

सभापती : सभागृहाच्या विशेष बैठकीचे कामकाज 11.00 वाजता संपेल असे आपण ठरविले होते. परंतु सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांचे उत्तर आणि हा प्रस्ताव पारित होई पर्यन्त सभागृहाची वेळ वाढविण्यात येत आहे.

श्री. छगन भुजबळ : सन्माननीय सदस्यांना उपप्रश्न विचारण्याची संधी मिळावी म्हणून मी माझे भाषण लवकर संपविणार आहे. मुंबईतील दहशतवादी हल्ल्यातील 22 मृत पोलीस आणि सुरक्षा अधिकारी यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी 25 लाख 15 हजार इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात आलेले आहे. 600 ते 1000 चौ.फुटाच्या सदनिका 22 मृत पोलीस आणि सुरक्षा अधिका-यांना वर्सोवा, अंधेरी, प्रतिक्षानगर,(सायन) या ठिकाणी वितरित करण्यात आलेल्या आहेत. मृतांच्या कुटुंबातील 2 मुलांना पदव्युत्तर स्तरापर्यन्त मोफत शिक्षण देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. छगन भुजबळ....

या ठिकाणी काही सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला की, शहीदांच्या मुलांना फक्त इयत्ता 12 वी पर्यंत मोफत शिक्षण दिले जाणार आहे. परंतु तशी वस्तुस्थिती नाही. विभागीय शिक्षण उप संचालक यांनी शहीदांच्या पाल्यांची माहिती प्राप्त करुन घेऊन 2008-09 या वर्षातील त्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्क अदा केलेले आहे. 2009-10 या वर्षापासून शहीदाच्या पाल्यांना नियमितपणे शैक्षणिक शुल्क अदा केले जाणार आहे. या पाल्यांसाठी उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणा-या सर्व अभ्यासक्रमाचे पदव्युत्तर,पदवी स्तरापर्यंतचे मोफत शिक्षण देण्याची योजना शैक्षणिक वर्ष 2009-10 पासून लागू करण्यात आली आहे. वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग अंतर्गत येणा-या सर्व अभ्यासक्रमांचे पदव्यूत्तर स्तरापर्यंत मोफत शिक्षण देण्याची योजना 2009-10 पासून लागू करण्याची कार्यवाही शासनाने सुरु केली आहे. पात्र कुटुंबातील एका व्यक्तीस त्याची शैक्षणिक पात्रता विचारात घेऊन "क" व "ड" प्रमाणेच शासन सेवेतील गट "ब" किंवा "अ" मधील सरळ सेवेच्या कोटयातील प्रथम टप्प्यावरील पदावरील नियुक्ती देण्यात येईल. पाच प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाकडून मार्गदर्शन मागविलेले आहे. सहा प्रकरणी पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई व एका प्रकरणी जिल्हाधिकारी,सातारा यांच्याकडून कार्यवाही करण्यात येत आहे. सध्या या विषयाच्या शासनाकडून पाऊले उचलण्यात आलेली आहेत. सभापती महोदय, खरबदारीच्या घेण्याच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, मिलेट्री, नेव्ही व यातील इतर काही तज्ज्ञ आहेत, राज्यात सुरक्षिततेच्या बाबतीत ताबडतोबीने काय करण्याची गरज आहे यासंबंधी त्या तज्ज्ञा समवेत बैठक घेण्यात आली आहे. त्या बैठकीत त्यांनी सूचना केल्याप्रमाणे सुरक्षिततेच्या दृष्टीने 127 कोटी रुपयांचे खरेदीचे प्रस्ताव मान्य करण्यात येऊन, घटना घडल्याच्या 15 दिवसांच्या आत आम्ही त्यांच्या सूचनाप्रमाणे कार्यवाही पूर्ण केलेली आहे. एन.एस.जी.धर्तीवर महाराष्ट्रात फोर्स-1 ची निर्मिती करण्यात आली आहे. त्यांचे प्रशिक्षण लवकरच सुरु होणार आहे. तो फोर्स प्रशिक्षित झाल्या नंतर त्यांचा उपयोग संपूर्ण राज्याला होणार आहे. पुणे येथील महाराष्ट्र इन्टेलिजन्ट ॲकॅडमीची वास्तू तयार आहे. गुप्तचर विभागातील कर्मचारी, अधिकारी यांच्यासाठी या प्रशिक्षण केंद्रात अत्याधुनिक विशेष प्राविण्य प्राप्त करुन देणारे प्रशिक्षण देण्यात येईल. राज्यात गुप्तवार्ता विभागातील सर्व रिक्त पदे भरुन काढण्यासाठी विशेष मोहिम हाती घेण्यात आली असून निवड

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.छगन भुजबळ...

प्रक्रिया पूर्ण करुन अंतिम निकाल घोषित करण्यात आला आहे. परीक्षेच्या माध्यमातून निवडलेल्या गुप्तचर विभागातील कर्मचा-यांना आणि अधिका-यांना पुण्याच्या महाराष्ट्र इन्टेलिजन्ट ॲकॅडमीमध्ये लवकरच प्रशिक्षण देण्यात येणार आहे. केंद्र शासनाने महाराष्ट्र राज्यासाठी एक एन.एस.जी.केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी आवश्यक असलेली जमीन राज्य शासनाने उपलब्ध करुन दिली आहे. ते सुध्दा काम लवकरच पूर्ण होत आहे. पोलीस दलाचे आधुनिकीकरण करण्यासाठी डिजिटल कॅमेरे, नाईट व्हीजन बायनाक्युलर्स, सॅटेलाईट फोन, बुलेटप्रुफ महिंद्रा स्कार्पिओ, स्पीड बोटस्, लाईट आर्म करिअर, स्टॉफर रायफल्स, बुलेट प्रुफ जॅकेटस्, हेल्मेटस् इत्यादी साहित्य उपलब्ध करुन देण्यासाठी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली आहे. त्यातील काही साहित्य आलेले आहे. काही साहित्यांच्या ऑर्डर दिलेल्या आहेत. परदेशातून काही साहित्य येणार असते, त्यामुळे ते साहित्य येण्यास थोडासा विलंब लागतो. हे सर्व साहित्य निश्चितपणे येईल अशी मी ग्वाही देतो. या राज्याचे आणि मुंबई शहराचे पूर्ण संरक्षण करण्यासाठी महाराष्ट्र पोलीस दलाच्या वतीने जी जी पाऊले उचलणे आवश्यक होती, ती पाऊले शासनाने उचललेली आहेत. कुठेही पैसे कमी पडणार नाहीत यासंबंधी शासनाने काळजी घेतलेली आहे. सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी म्हणाले की, आपण अगोदर विकास करु. परंतु त्या विकासाचे संरक्षणासाठी प्रचंड मोठी फळी निर्माण करणे गरजेचे आहे. ती फळी निर्माण करण्यासाठी ज्या ज्या तज्ज्ञांनी यासंबंधी जे काही सांगितले होते, त्यातील कोणतीही गोष्ट शासनाने धुडकाविली नाही. त्यासंदर्भात निर्णय घेतलेले आहेत. या गोष्टीचे आपल्याला निश्चितपणे चांगले परिणाम आपल्याला दिसून येतील. या सभागृहात अनेक सन्माननीय सदस्यांनी अतिशय चांगले मुद्दे मांडले आहेत. त्या मुद्यांची नोंद घेण्यात आली आहे. काही मुद्यांच्या बाबतीत या सभागृहात साधक बाधक चर्चाही झाली आहे. यासंदर्भात शासनाला जे जे काही करणे शक्य आहे ते निश्चितपणे केले जाईल...

यानंतर श्री. भोगले...

अशुद्धीत प्रत / शीघ्रलिपीची नाही

श्री.छगन भुजबळ....

आणि जिथे केलेले आहे त्या संदर्भातील माहिती वेळोवेळी चालणाऱ्या अधिवेशनामध्ये देता येईल. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये जे भाष्य केले आहे ते भाष्य खरोखर अतिशय वस्तुनिष्ठ मुद्यांवर अवलंबून असणारे भाषण होते, त्याबद्दल आपल्याला खेद वाटावा असे काहीही नाही असे मी प्रामाणिकपणे सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांनी मनातील जो खेद आहे तो दूर करावा. आपण सांगितलेल्या सूचना जर काही त्या निर्णयामध्ये अंतर्भूत झाल्या नसतील तर त्या सूचनांची अंमलबजावणी भविष्यकाळात निश्चित केली जाईल असे आश्वासन शासनाच्या वतीने आपल्याला सगळ्यांना देतो आणि माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव एकमुखाने संमत करावा अशी मी सभागृहाला आपल्या माध्यमातून विनंती करतो. धन्यवाद, जय हिंद, जय महाराष्ट्र!

सभापती : आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय उपमुख्यमंत्र्यांनी त्यांच्या भाषणामध्ये दुर्दशा स्वत:च्या तोंडून सांगितली. 50 व्या वर्षामध्ये पदार्पण करीत असताना ते कबूलकर्ते झाले की हुतात्मे कोण आहेत.

श्री.छगन भुजबळ : सभापती महोदय, मेहेरबानी करुन अशा सेन्सेटिव्ह विषयावर चुकीची माहिती माझ्या तोंडात घालू नका. मी मुंबईचा महापौर असताना काय काय केले ते सांगितले. वृत्तपत्रातून वाचायला मिळाले की, पेन्शन मिळाले नाही, हे मिळाले नाही, ते मिळाले नाही. याबाबत चौकशी करुन ज्या त्रुटी असतील त्या दूर करण्याचा प्रयत्न करु. ते गुंड आहेत हे रेकॉर्ड शासनाच्या वतीने काढून टाकण्यात आले. त्यानंतर मदत देण्यात आली. तरी सुध्दा काही तक्रारी आहेत, त्यामध्ये मी लक्ष घालेन. हुतात्म्यांची नावे छगन भुजबळ यांनी लिहिली आहेत. आपण कसे विसरता? माननीय बाळासाहेबांनी उद्घाटन केले होते.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक सकाळी 11.20 वाजता सुरु होईल असे मी जाहीर केले होते. परंतु सभागृहाची नियमित बैठक आता सकाळी 11.30 वाजता सुरु होईल.

(सभागृहाची बैठक सकाळी 11.07 ते 11.30 पर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**स्थगिती नंतर**)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सुधारित वेतनश्रेणी लागू करण्यासाठी केंद्रशासनाचे 80 टक्के अर्थसहाय्य मिळणेबाबत

(1) * 50153 प्रा. बी. टी. देशमुख , श्री. वसंतराव खोटरे , श्री.दिलीपराव सोनवणे : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) दिनांक 31 डिसेंबर, 2008 रोजी विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांच्या वेतनश्रेणीत सुधारणा करणारा शासन निर्णय केंद्र शासनाने निर्गमित केला व राज्याने ही वेतन सुधारणा लागू केल्यास जादा भाराच्या 80 टक्के अर्थसहाय्य केंद्रातर्फे दिले जाईल असे त्याच दिवशी किंवा त्या दरम्यान महाराष्ट्राच्या मुख्य सचिवांना केंद्र शासनाने कळविले, हे खरे आहे काय,

(2) केंद्र शासनाने हा निधी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे सोपविला असून विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक 28 फेब्रुवारी, 2009 रोजी किंवा त्यादरम्यान राज्याच्या शिक्षण सचिवांना पत्र पाठवून 31 डिसेंबर, 2008 च्या केंद्राच्या शासननिर्णयाप्रमाणे वेतनसुधारणा लागू केल्यास थकबाकी पोटी लागणारी 40 टक्के रक्कम 31 मार्च, 2009 च्या आत (या आर्थिक वर्षात) राज्य शासनाला द्यायला तयार आहोत असे कळविले हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, 29 डिसेंबर, 2008 रोजी शासनातर्फे उक्त विषयावर सभागृहात देण्यात आलेल्या अभिवचनांची अम्मलबजावणी न होण्याची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टापे : (1) होय.

(2) होय.

(3) सदर प्रकरणामध्ये वित्तीय बाब अंतर्भूत असल्यामुळे नियोजन व वित्त विभागाशी विचारविनिमय करून निर्णय घेण्यात येत आहे.

प्रा.बी.टी.देशमुख : महोदय, विचारलेल्या प्रश्नाला अत्यंत दुर्दैवी अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे. सबंध राज्यात सहाव्या वेतन आयोगासाठी एक रुपयाची मदत कोणाकडूनही मिळत नाही तर तो भार केवळ शासनाला स्वत:च्याच भरवशावर सहन करावा लागतो. हे एकच ठिकाण असे आहे की, जेथे 80 टक्के रक्कम केंद्रशासन देणार आहे. 31 डिसेंबर रोजी एक शासन निर्णय काढण्यात आला तो आपल्याला प्राप्त झाला काय असा प्रश्न विचारला असता त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. त्यांनी स्पष्टपणे कळविलेले आहे की, 80 टक्के रक्कम आम्ही देण्यास तयार आहोत. ही रक्कम जवळपास 2 ते 3 हजार कोटी एवढी आपल्या राज्यासाठी मिळणार आहे. त्यांनी असेही कळविले आहे की, 31 मार्च, 2009 च्या आत आपण थकबाकीची रक्कम अदा करावी व त्यासाठी आमच्याकडून पैसे घेऊन जावे या प्रश्नाला सुध्दा "होय" असे उत्तर दिले आहे. त्यांनी स्पष्टपणे कळविले आहे की, "In view of this, no separate order is required to

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

be issued to State Governments. Details of the Scheme are also available on the website." आणि याबाबत आपण अंमलबजावणी करा. माननीय मंत्री महोदयांनी सभागृहात एकदा सांगितले होते ते मी मुद्दाम वाचून दाखवितो. ते म्हणाले होते की, केंद्रशासनाच्या यासंबंधीच्या ऑर्डर्स आल्याबरोबर आम्ही त्याची अंमलबजावणी करु. आता दुर्दैव असे आहे की, थकबाकीसाठी किती रक्कम लागणार अथवा या लोकांना थकबाकीची रक्कम किती मिळणार आहे याचे हिशेब सुध्दा तयार नाहीत. वास्तविक ज्या आठवड्यात हकीम समितीची नियुक्ती करण्यात आली त्याच आठवड्यात हा जी.आर. केंद्राकडून प्राप्त झालेला आहे. परंतु हा मिळणारा निधी घेण्यास सुध्दा आपले शासन गेले नाही. यासंदर्भातील माहिती माननीय वित्तमंत्र्यांना नव्हती ते म्हणाले होते की, ते पत्र आपण द्यावे, जेणेकरुन आवश्यक ती कार्यवाही करता येईल. माझा प्रश्न असा आहे की, सभागृहात जी आश्वासने दिली त्या अनुषंगाने अद्याप कुठलीही कार्यवाही केली नाही ती कार्यवाही कधी करणार? यासंबंधीचा शासन निर्णय येत्या आठ-दहा-पंधरा दिवसात काढणार काय ? कारण तत्वत: हे मान्य केलेले आहे, ॲडव्हान्सही दिलेला आहे पण रिव्हीजन दिले नाही म्हणून हा एकमेव पर्याय आहे तो जी.आर. शासन कधीपर्यंत काढणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी दोन प्रश्न विचारले. त्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांनी जो राग व्यक्त केला तो योग्य आहे यात वादच नाही. शासनामध्ये काम करीत असताना नियोजन विभागाकडे काही क्वेरिज गेल्या त्यामुळे हे करण्यास उशिर झालेला आहे. आता उशिराची मर्यादा ओलांडली हेही खरे आहे. विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांचे जे संवर्ग आहेत यासंदर्भात सहावा वेतन आयोगासंबंधीचा निर्णय अद्याप घेतला गेला नाही. त्याबाबत मी सांगू इच्छितो की, ज्यांनी ज्यांनी उशिर केला असेल त्याची चौकशी करु. कारण असा उशिर कोणत्या कारणांनी झाला अथवा केवळ पेंडिंग ठेवण्याचा हेतू होता काय यासंबंधीची चौकशी करुन कारवाई करण्याचा विचार करण्यात येईल. त्याचबरोबर सन्माननीय सदस्यांनी विचारले की, केव्हा लागू करणार याबाबत मला सांगावयाचे आहे की, हा विषय शेवटी मंत्रिमंडळासमोर जाणे आवश्यक असते. परंतु माझी विनंती आहे की, जास्तीत जास्त एक महिन्याची सवलत यासाठी मी सभागृहाला मागत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशोधित प्रत / अशोधित प्रत

ता.प्र.क्र.:50153....

श्री.राजेश टोपे ....

हे सर्व काम करण्यासाठी मी एक महिन्याची सवलत मागत आहे. यामध्ये काही विचार पूर्वक चर्चा होण्याची आवश्यकता आहे. 1 जानेवारी, 2006 पासून ॲरिअर्स देण्याच्या संदर्भातील निर्णय लागू झालेला आहे. त्यामुळे सन 2006-07 व 2008 पर्यंतचे 80 टक्के ॲरिअर्स दिले जाणार आहेत. हा विषय आर्थिक बाबीच्या संदर्भात असल्यामुळे आम्ही उत्तरात तशा प्रकारचा उल्लेखही केलेला आहे. यामध्ये अगोदर राज्यशासनाला पैसे द्यावे लागणार आहेत व त्यानंतर राज्यशासनाला रिएम्बर्समेंट मिळणार आहेत. यासंदर्भात मी आपल्याला सांगू इच्छितो की, सर्वसाधारणत: 1500 कोटी रुपये थकबाकीच्या स्वरुपात द्यावे लागणार आहेत. त्यामुळे हे पैसे किती हप्त्यात द्यावयाचे, कसे द्यावयाचे राज्य कर्मचा-यांप्रमाणे द्यावयाचे की कसे द्यावयाचे या बाबतीत आपल्याला कॅबिनेटमध्ये चर्चा करुन निर्णय घ्यावा लागणार आहे. त्यामुळे या सर्व प्रकरणाला जास्तीत जास्त एक महिन्याची मुदत मागू इच्छितो.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात एक महिन्यात कार्यवाही पूर्ण केली जाईल असे माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या उत्तरात सांगितले आहे. हे लोक जागचे हलत नाहीत. ॲरिअर्सच्या संदर्भात माननीय मंत्रीमहोदयांना चुकीचे फिडींग झालेले आहे. या अटीच्या बाबतीत त्यांची जी काही योजना आहे ती स्पेसिफीक आहे. त्यांचे म्हणणे एवढेच आहे की, समग्र योजना म्हणून ही पध्दत अमंलात आणावी. यामध्ये तुम्हाला फक्त दोनच अटी बदलवता येतील. यासंदर्भात तुम्ही तारीख सुध्दा ठरवलेली आहे. दुसरी अट अशी आहे की, तुम्हाला हायर वेतनश्रेणी देता येईल, लोअर वेतनश्रेणी देता येणार नाही. आहे तेच मिळत नाही त्यामुळे हायर कोणी मागणार नाही. जीआर मधील मी फक्त एक दोन ओळी आपल्याला वाचून दाखवितो. त्यामुळे ॲरिअर्सच्या संदर्भातील विषय अधिका-यांच्या डोक्यातून निघून जाईल. Mr. Chairman, Sir, it reads as under: " Payment of Central assistance for implementing the Scheme is also subject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी.टी.देशमुख ...

by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a Composite Scheme without any modification." ही लहानशी स्कीम आहे त्यामध्ये फार काही मोठया गोष्टींचा समावेश नाही. यामध्ये राज्यशासनाला 20 टक्के रक्कम द्यावचे आहे. त्यांचे जे काही आहे ते त्यांना त्यांच्या पध्दतीने द्यावे लागेल. त्यामुळे वित्त विभाग व उच्च व तंत्रशिक्षण विभागाला या अटीचे काटेकोरपणे पालन करण्याच्या संदर्भात सक्त सूचना देण्यात येतील काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, केंद्रशासनाच्या जीआर नुसार युजीसीने या संदर्भात काही सूचना केलेल्या आहेत. यामध्ये राज्यसरकारला खूप काही बदल करण्याचे अधिकार नाहीत. परंतु हा विषय आर्थिक बाबीशी संबंधित आहे. आपल्याला ज्या ठिकाणी बदल करण्याचे अधिकार नाही त्या ठिकाणी आपल्याला बदलही करता येणार नाहीत. परंतु याबाबत कॅबिनेटमध्ये चर्चा होण्याची आवश्यकता आहे. एक महिन्याच्या आत कुठल्याही पध्दतीने सहावा वेतन आयोग युनिव्हर्सीटी टिचर्सना लागू होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तिवसा (जि.अमरावती) येथील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगासाठी मुलभूत सुविधा पुरविण्याबाबत

(२) * ५२०७७ श्री. जगदीश गुप्ता , श्री.सय्यद पाशा पटेल : सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तिवसा (जि.अमरावती) हे तालुक्याचे ठिकाण असून उद्योगासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रातील भुखंडाचे वाटप महामंडळाने केले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुखंडावर अनेक लघुउद्योजक उद्योग सुरु करणार असून, उक्त क्षेत्रात वीज, रस्ता तसेच पाणी या मुलभूत सोयी-सुविधांचा अभाव असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तिवसा तालुक्यातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात मुलभूत सुविधांचा अभाव असल्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १० जून, २००८ रोजी मा.उद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे केले, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, लघु उद्योजकांना मुलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करण्याबाबत शासनाने कोणती ठोस उपाययोजना वा कार्यवाही केली आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील, श्री.नारायण राणे यांच्या करिता,: १) होय, तिवसा लघु औद्योगिक क्षेत्रात १४ भूखंडाचे वाटप करण्यात आले आहे.

२) हे खरे नाही. सदर औद्योगिक क्षेत्रात पथदिवे वगळता वीज, रस्ता तसेच पाणी इत्यादी मुलभूत सुविधा उपलब्ध आहेत.

३) होय.

४) लघु उद्योजकांसाठी पाणीपुरवठ्याकरीता १०० मी. मी.व्यासाची विंधन विहीर व जलवाहीनी, ८० मी.मी. व्यासाची ४३० मीटरची जलवितरीका, ४६० मीटर खडीमुरमाचा अंतर्गत रस्ता व विद्युत पुरवठा या मुलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात आली आहे.

५) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. पाशा पटेल : सभापती महोदय, माननीय मंत्रीमहोदयांनी लेखी उत्तरात असे म्हटले आहे की, "सदर औद्योगिक क्षेत्रात पथदिवे वगळता वीज, रस्ता तसेच पाणी इत्यादी मूलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. याचा अर्थ पोपट आपले पंखही हलवत नाही आणि पायही हलवत नाही असे सांगावयाचे परंतु पोपट मेलेला आहे असे मात्र सांगावयाचा नाही अशा प्रकारचे उत्तर माननीय मंत्रीमहोदयांनी आपल्या लेखी उत्तरात दिलेले आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, तिवसा(जि.अमरावती) या तालुक्याच्या औद्योगिक क्षेत्रात पथदिवे कधी पर्यंत बसविले जाणार आहेत? तसेच या ठिकाणी भूखंडाचे किती वाटप झालेले आहे याची माहिती माननीय मंत्रीमंहोदय देतील काय?

यानंतर श्री. गायकवाड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52077..

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 1996 ते 2008 या कालावधीमध्ये 14 भूखंडाचे वाटप करण्यात आले होते त्या ठिकाणी एकूण 16 भूखंड आहेत त्यापेकी 14 भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे आणि 2 भूखंडाचे वाटप करण्यात आलेले नाही. त्या ठिकाणी अंतर्गत रस्ते झाले आहेत तसेच विजेचे कामही झाले असून तेथे पोल उभे करण्यात आलेले आहेत फक्त पथदिवे लावण्यात आलेले नाहीत. त्याचे कारण असे की, या क्षेत्रामध्ये अजून उद्योग आलेले नाहीत पक्त लोकांनी उद्योगासाठी प्लॉट घेऊन ठेवलेले आहेत मात्र बांधकाम केलेले नाही. तेथे फक्त एकच इमारत बांधण्यात आली असून गोडावून म्हणून त्या इमारतीचा वापर केला जात आहे. औद्योगिक दृटया त्या भागात उद्योग सुरु झालेले नाहीत. मागणी केल्यानंतर पथदिवेसुध्दा बसविण्यात येतील.

श्री.प्रकाश शेंडगे : सभापती महोदय, ज्यांना 14 भूखंडाचे वाटप करण्यात आलेले आहे त्यांनी ठराविक दिवसात प्रकल्प उभा केला पाहिजे जर त्यांनी त्या दिवसात प्रकल्प उभा केला नाही तर भूखंड परत घेण्यात येईल अशा प्रकारची अट घालण्यात आलेली आहे काय ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, तशा प्रकारची अट असतेच. परंतु मध्यंतरी त्यांना एक्सटेन्शन देण्यात आले होते. 16 पैकी 14 भूखंडाचे वाटप करण्यात आले असून त्यांना किती तारखेपर्यत एक्सटेन्शन दिले होते याची माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

बीड जिल्ह्यात विद्युत केंद्र व उपकेंद्र सुरु करण्याबाबत

(३) * ५०६६४ श्रीमती उषाताई दराडे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा, शिरुर आणि वडवणी येथे १३२ केव्ही विद्युत केंद्र पाटोदा येथे २२० केव्ही विद्युत केंद्र आणि वाघेबाभुळगाव, घाटवळी, पिंपळवाडी, तिंतरवणी आणि मानूर येथे ३३-केव्ही उपकेंद्र सुरु करण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी,२००९ मध्ये घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयानुसार आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

डॉ.सुनील देशमुख,श्री.सुनिल तटकरे यांच्याकरिता:- (१) बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे २२० के.व्ही.उपकेंद्र स्थापन करण्याच्या योजनेला महापारेषण कंपनीने मंजूरी दिली आहे. मांजरसुंबा, शिरुर व वडवणी येथे १३२ के.व्ही.उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमाच्या २००८-१३ या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट नाही. राज्य पारेषण उपक्रमाने योजनेत समाविष्ट केल्यावर पुढील कार्यवाही केली जाते.

बागपिंपळगांव, घाटसावळी आणि मानूर येथे ३३/११ के.व्ही उपकेंद्रे पायाभूत आराखडा योजनेंतर्गत समाविष्ट केलेली आहेत. पिंपळवाडी व तिंतरवणी ही उपकेंद्रे पायाभूत आराखडा योजनेअंतर्गत समाविष्ट केलेली आहेत. पिंपळवाडी व तिंतरवणी ही उपकेंद्रे पायाभूत आराखडा अंतर्गत प्रकल्पात समाविष्ट नाहीत. या उपकेंद्राबाबतचा प्रस्ताव अन्य प्रकल्पांतर्गत तयार करण्याबाबत कार्यवाही बीड मंडळामार्फत सुरु आहे.

(२) २२० के.व्ही.पाटोदा उपकेंद्राच्या उभारणीसाठीची जमीन एम.आय.डी.सी.कडून घेण्यात प्रयत्न चालू आहेत. तसेच निविदा मागविलेल्या असून जून, २००९ अखेरपर्यंत कामाचे आदेश देण्याचे प्रयोजन आहे. जून, २००९ अखेरपर्यंत उपकेंद्र उभारणीच्या कामाचे आदेश देण्यात येतील.

बागपिंपळगाव, घाटसावळी आणि मानूर येथे ३३/११ के.व्ही.उपकेंद्रे बीड विभागाच्या पायाभूत आराखड्यात समाविष्ट आहेत व या प्रकल्पास मा.वीज नियामक आयोगाने तत्वत: मंजूरी दिलेली असून सदर कामासाठी मे.पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने रु.१११.४४ कोटी इतका कर्जाऊ निधी उपलब्ध केलेला आहे. बीड विभागाकरिता मे.मायटास इन्फ्रा लि., हैद्राबाद यांना ऑर्डर देण्यात आलेली होती. परंतू सदर कंत्राटदाराने काम वेळेत चालू न केल्याने ही ऑर्डर दि.०४.०४.२००९ रोजी रद्द करण्यात आलेली आहे.

सदर कामे पायाभूत आराखडा प्रकल्पांतर्गत फेज-२ अे मध्ये समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्याबाबतची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, "बीड जिल्यातील पाटोदा येथे 220 के.व्ही. उप केद्र स्थापन करण्याच्या योजनेला महापारेषण कंपनीने मंजुरी दिली आहे. मांजरसुंबा, शिरुर व वडवणी येथे 132 के.व्ही. उपकेंद्र उभारण्याचा प्रस्ताव राज्य पारेषण उपक्रमाच्या 2008-2013 या पंचवार्षिक योजनेत समाविष्ट नाही राज्य पारेषण उपक्रमाने योजनेत समाविष्ट केल्यावर पुढील कार्य्रवाही केली जाते. " या उत्तरामुळे माझे समाधान झालेले नाही. मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, किती दिवसात हे उपकेन्द्र पंचवार्षिक योजनेत समाविष्ट केले जाईल आणि किती दिवसात हे उपकेन्द्र उभारण्याची कार्यवाही होईल ? त्याचबरोबर दुस-या उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "बाग पिंपळगाव, घाटसावळी आणि मानूर येथे 33/11 के.व्ही. उपकेन्द्रे बीड विभागाच्या पायाभूत आराखडयात समाविष्ट आहेत व या प्रकल्पास माननीय वीज नियामक आयोगाने तत्वत: मंजुरी दिलेली असून सदर कामासाठी मे. पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनने रु 111.44 कोटी इतक्या कर्जाऊ निधी उपलब्ध केलेला आहे. बीड विभागाकरता मे मायटास इन्फ्रा लि. हैद्राबाद यांना आूर्डर देण्यात आलेली होती परतु सदर कंत्राटदाराने काम वेळेत चालू न केलयाने ही ऑर्डर दिनांक 4.4.2009 रोजी रदद करण्यात आलेली आहे " मला माननीय मंत्री महोदयांना असा प्रश्न विचारावयाचा आहे की, या कामाचे पुन्हा रिटेन्डरीग होऊन किती दिवसात कामाची ऑर्डर देण्यात येईल आणि किती दिवसात हे काम केले जाईल.?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दोन प्रश्न विचारले असून बीड जिल्हयातील मांजरसुंबा, शिरुर आणि वडवणी येथे 132 के.व्ही.चे विद्युत केन्द्र उभारण्यास काय अडचणी आहेत असा सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न चिारला आहे त्याबाबतीत मी त्यांना सांगू इच्छितो की, अती उच्च दाब उपकेन्द्र उभारावयाचे असेल तर त्या भागातील महाराष्ट्र राज्य वीज वितरण विभागाकडून महाराष्ट्र राज्य वीज पारेष्ंण विभागाकडे प्रस्ताव येणे आवश्यक आहे. त्यानंतर महापारेष्ंण कंपनीच्या क्षेत्रीय कार्यालयाकडून त्या प्रस्तावाची प्राथमिक तपासणी करण्यात येते आणि आवश्ययकता वाटल्यास कंपनीच्या मुंबई येथील सांघिक कार्यालयाकडे तो प्रस्ताव पाठविला जातो .त्यानंतर सांघिक कार्यालयातील राज्य पारेषण उपक्रम हा विभाग सदर प्रस्तावाची

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50664 डॉ.सुनील देशमुख..

तपासणी करुन उपकेन्द्राची आवश्यकता आहे काय याची तपासणी करतो आणि आवश्यकता असल्यास सदर उपकेन्द्राचा पंचवार्षिक योजनेमध्ये समावेश केला जातो .त्यानंतर उपकेन्द्र उभारणीचा प्रस्ताव पारेषण प्रकल्प विभागाकडून महापारेषण कंपनीच्या संचालकाकडें मंजुरीसाठी पाठविला जातो . त्यांनी प्रस्तावाला मंजुरी दिल्यानंतर सदरहू प्रस्ताव महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोगाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठविला जातो. या सर्व प्रक्रिया जर आपणं् पूर्ण केल्या नाही तर पॉवर फायनान्स कॉर्पोरेशनकडून कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही. हा प्रस्ताव जेव्हा त्यांच्याकडे पाठविला होता तेव्हा पुढील पाच वर्षात या उपकेन्द्राची आवश्यकता नाही असा निर्णं्य त्यांनी घेतल्यामुळे 132 के.व्ही.चे उप केन्द्र त्या ठिकाणी होऊ शकत नाही. सन्माननीय सदस्यानी विचारलेल्या दुस-या प्रश्नाबाबत मी त्यांना सांगू इच्छितो की, बाग पिंपळगाव, घाटसावळी आणि मानूर येथे 33.11 के.व्ही. चे उपकेन्द्र बसविण्यासाठीचे कंत्राट मेटास कंपनीला देण्यात आले होते ते रद्द करण्यात आले असून दुसरे कॉन्ट्रक्ट देण्यासाठी टेन्डर सादर करण्याची शेवटची मुदत 6 जुलै 2009 असून बीड ओपनिंगची तारीख 6 जुलै 2009 आहे.

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / शीघ्रलेखनासाठी नाही

श्री. एम.एम.शेख : सभापती महोदय, या ठिकाणी उत्तरात पिंपळवाडी व तिंतरवणी ही उपकेंद्रे पायाभूत आराखडा अंतर्गत प्रकल्पात समाविष्ट आहेत असे नमूद केले होते पण नंतर त्यावर शाईने लाईन मारून ते खोडून टाकण्यात आले आहे. तर तिंतरवणी हे जे उपकेंद्र प्रस्तावित करण्यात आलेले आहे त्या अंतर्गत 14 गावे जी पूर्वी गेवराई तालुक्यात होती ती 14 गावे आता शिरूर तालुक्यात आल्यामुळे उपकेंद्र चकलांबा येथून या 14 गावांना जो वीज पुरवठा होतो आहे त्या ठिकाणी आता तिंतरवणीसाठी जे केंद्र प्रस्तावित केले होते त्याच्यावर लाईन मारून ते कट केलेले आहे तर तिंतरवणी येथे हे उपकेंद्र मंजूर करण्यात येणार आहे की नाही ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, पिंपळवाडी आणि तिंतरवणी ही दोन्ही उपकेंद्रे प्रणाली सुधार योजनेत समाविष्ट आहेत आणि या उपकेंद्रांना मंजुरी देण्याची कार्यवाही सुरू आहे ती मंजूर झाल्यानंतर त्याचे काम सुरू करण्यात येईल.

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, या दोन्ही उपकेंद्रांची सद्य:स्थिती काय आहे ?

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, तेथे जागा ताब्यात घेण्याची कार्यवाही सुरू आहे.

***

..... आर 2 .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उरण (जि.रायगड) येथील वीज निर्मिती केंद्राला गॅस पुरवठा करण्याबाबत

(4) * 52339 श्री. अरविंद सावंत , श्री.परशुराम उपरकर , डॉ. निलम गोऱ्हे : तारांकित प्रश्न क्रमांक 31980 ला दिनांक 31 जुलै,2007 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **ऊर्जा (अपारंपारिक ऊर्जा वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) रायगड जिल्ह्यातील उरण येथील गॅसवर वीजनिर्मिती करणाऱ्या वायुविद्युत केंद्राला केंद्र शासनाकडून गॅस पुरवठा होत नसल्याने सदर केंद्राची वीज निर्मिती बंद पडली आहे, हे खरे आहे काय,
(2) असल्यास, उरण बोकडवीरा वायुविद्युत केंद्राची वीज निर्मितीची क्षमता 852 मेगावॅट इतकी असून या केंद्रातील 9 संचापैकी वीज निर्मितीचे 4 संच गॅस अभावी बंद असून सध्या सुरु असलेल्या पाच संचानाही केंद्र शासनाकडून गॅस पुरवठा होत नाही, हे खरे आहे काय,
(3) असल्यास, सदर वीज निर्मिती प्रकल्पाला योग्य प्रमाणात गॅस पुरवठा करण्याबाबत राज्य शासनाने हा प्रश्न केंद्र शासनाकडे उपस्थित केला आहे काय,
(4) असल्यास, केंद्र शासनाचा काही प्रतिसाद मिळाला आहे काय ?

डॉ.सुनील देशमुख, श्री.सुनील तटकरे यांच्याकरिता : (1) हे खरे नाही. महाजनकोने उरण वायुविद्युत केंद्राला मे.गेल यांच्याशी 3.5 एम.एम.एस.सी.एम.डी.गॅस पुरवठ्यासाठी दिर्घकालीन करार (लॉंग टर्म) केला आहे. बॉम्बे हाय च्या कमी उत्पादनामुळे मे.गेल 2.5 एम.एम.एस.सी.एम.डी.येवढाच पुरवठा करीत आहे. महाजनकोने दि.21.04.2009 रोजी मे.रिलायन्स ईंडस्ट्रीज ली.सोबत 0.93 एम.एम.एस.सी.एम.डी.साठी गॅस पुरवठा करार दि.21.04.2014 पर्यंत केला आहे.
(2) 9 संचाना गॅस उपलब्ध होत नाही हे खरे नाही आजमितीस पुरेसा गॅस पुरवठा असूनही 9 संचापैकी 3 संच बरेच जुने असल्याने त्यातून विज निर्मिती होत नाही सदर संच मोडित काढण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे.
(3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, या राज्याची वीज निर्मितीच्या बाबतीत किती उदासिनता आहे हे आपल्याला या प्रश्नाच्या उत्तरातूनदेखील दिसून येते. सभापती महोदय, बोकडविरा येथे वायुविद्युत केंद्राची वीज निर्मितीची क्षमता 852 मे.वॅ. इतकी आहे, पण प्रत्यक्षात ती तेवढी आहे की नाही हे प्रथम माननीय मंत्री महोदयांनी सांगावे. त्यानंतर माझा पहिला प्रश्न आहे की, हे जे नऊ संच आपण उभे केले आहेत ते केव्हा उभे केले ? या नऊ संचातील प्रत्येक संचाची वीज निर्मितीची क्षमता किती ? त्यासाठी गॅस काय दराने आपण घेता आहात ? आणि प्रत्यक्ष ग्राहकाला आपण किती दराने ही वीज देणार आहात ? संच मोडीत काढण्याचा प्रस्ताव शासनाला केव्हा देण्यात आला आहे ?

..... आर 3 ...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, संच क्र.1, क्षमता 60 मे.वॅ., ते सुरू करण्याचा दिनांक 20.2.1982 आहे. संच क्र.2 - क्षमता 60 मे.वॅ., सुरू करण्याची तारीख 29.3.1982, संच क्र.3 - क्षमता 60 मेवॅ., सुरू करण्याची तारीख 7.5.1982., संच क्र.4 - क्षमता 60 मे.वॅ., सुरू करण्याची तारीख 21.7.19982., संच क्र.5 - क्षमता 108 मे.वॅ., सुरू करण्याची तारीख 10.10.1985., संच क्र.6 - क्षमता 108 मे.वॅ., सुरू करण्याची तारीख 2.8.1985., संच क्र.7 - क्षमता 108 मे.वॅ., सुरू करण्याची तारीख 15.1.1986 आणि वेस्ट विअर रिकवरी मधून जे प्रत्येकी 120 मे.वॅ.क्षमतेचे दोन संच आहेत त्याची सुरू करण्याची तारीख 21.3.1994 आणि 28.10.1994 अशी आहे. त्यातील संच क्र.1 आपण मोडीत काढला आहे. कारण या संचाचे वय हे साधारणपणे 15 ते 20 वर्षे असते त्यामुळे आपण संच क्र. 2, 3 आणि 4 हेही मोडीत काढण्याची प्रक्रियेमध्ये आहे. सध्या त्याच्यातून कोणत्याही प्रकारची वीज निर्मिती होत नाही.

श्री. अरविंद सावंत : मी आणखी एक प्रश्न विचारला होता की, आपण कोणत्या दराने गॅस घेत आहात आणि प्रत्यक्ष ग्राहकाला कोणत्या दराने वीज देणार आहात ?

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, आपण सध्या गेल कडून गॅस घेतो आहोत. आपण सर्व प्रथम याची निर्मिती केली होती तेव्हा सर्वप्रथम गेल कडून 3.5 एमएम सीएमडी गॅस म्हणजे मिलियन मेट्रिक स्टॅण्डर्ड क्युबिक मीटर पर डे हे त्याचे मेजरमेंट आहे. त्यांच्याकडून आपण हा गॅस घेतो. त्यानंतर आपण बीपीसीएल कडूनही गॅस घेतो तसेच रिलायन्स कडूनदेखील गॅस घेतो. सध्याच्या काळात आपण रिलायन्सकडून गॅस घेत आहोत. कारण जेव्हा आपण याची निर्मिती केली होती तेव्हा आपण 3.5 एमएम सीडीएम जे काही युनिट असेल तेवढ्या गॅसची आवश्यकता होती. त्यातच आता बॉम्बे गॅसचे उत्पादन कमी झाल्यामुळे तेथून आपल्याला 2.5 इतकाच गॅस मिळतो आहे. राहिलेला .93 एमएमसीएमडी गॅस हा आपण रिलायन्स कडून घेतो आणि त्यांच्या सोबत आपले जे कॉंट्रॅक्ट झालेले आहे ते 21.4.2014 पर्यंतचे झालेले आहे. तसेच रिलायन्स कडून हा जो गॅस आपण घेत आहोत तो 4.205 डॉलर पर एमएमबीटी या दराने घेतो आहोत. जेव्हा आपल्याला जास्त गरज होती, आपली अडचण होती, तेव्हा बीपीसीएल कडून थोड्या जास्त दराने म्हणजे 6.3 ते 6.8 डॉलर पर एमएमबीटी प्रमाणे आपण गॅस घेत होतो. ...

(यानंतर श्री.सरफरे ....एस 1 ..

अशुद्धीरहित प्रत / मुद्रितशोधनासाठी नाही

ता.प्र.क्र. 52339...

डॉ. सुनील देशमुख....

याबाबतीत गेलबरोबर कॉट्रॅक्ट केल्यामुळे अे.पी.एम. म्हणजे ॲडमिनिस्ट्रेटिव्ह प्राईस मेकॅनिझममध्ये स्वस्त दराने आपल्याला गॅस मिळतो. परंतु मुंबई हायचे उत्पादन मधल्या काळात कमी झाल्यामुळे त्याऐवजी रिलायन्सकडून 4.5 डॉलरने गॅस घेत आहोत, तो गॅस आपल्याला सन 2014 पर्यंत मिळणार आहे.

श्री. अरविंद सावंत (बसून बोलतात) : ही वीज कोणत्या दराने मिळणार आहे?

सभापती : माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत आपण अनेक वेळा प्रश्न विचारल्यानंतर पुन्हा बसून प्रश्न विचारता ही पध्दत बरोबर नाही.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, मी अगोदर प्रश्न विचारला होता. मंत्रिमहोदयांकडून त्या प्रश्नाचे उत्तर न मिळाल्यामुळे मी त्यांना आठवण करुन दिली.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी दिलेल्या उत्तरावरुन हा प्रकल्प आय.सी.यु.मध्ये असल्याचे चित्र स्पष्ट होते. आपण याठिकाणी 1985, 1986 व 1994 सालातील आकडेवारी व्यवस्थित मांडली. मूळ प्रश्न असा आहे की, या प्रकल्पामधून किती मेगावॅट वीज निर्माण होण्याची क्षमता होती, आणि गॅस पुरवठा कमी झाल्यामुळे, संच बिघडल्यामुळे किती वीज निर्मिती कमी झाली? आपण लांबलचक उत्तर देण्यापेक्षा मूळ प्रश्नाचे उत्तर द्यावे.

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी लांबलचक प्रश्न विचारला होता, त्यांनी प्रत्येक तारीख विचारली होती त्यामुळे सविस्तर उत्तर देणे क्रमप्राप्त होते. लांबलचक उत्तर दिले असे कसे म्हणता येईल? सद्या या प्रकल्पामधून 652 मेगावॅट वीज निर्मिती होत आहे. ज्यावेळी आठ अधिक दोन मिळून दहा संच पूर्ण क्षमतेने चालू होते त्यावेळी 912 मेगावॅट वीज निर्मिती होत होती. त्यामध्ये चार संच स्क्रॅपमध्ये गेले. त्याऐवजी आता 1200 मेगावॅटच्या नवीन विस्तारीकरणाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्यासाठी सिडकोकडून जमीन घेतली आहे. त्या प्रकल्पाची एस्टिमेट कॉस्ट 3520 कोटी आहे.

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आता उत्तर देतांना असे सांगितले की, 15 ते 20 वर्षानंतर हे संच मोडीत काढावे लागतात. माझा प्रश्न असा आहे की, हे संच प्रत्यक्षात किती वर्षे चालले? किती तास चालले? हे संच मोडीत काढतांना कोणते तत्व पाळले जाते?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/

ता.प्र.क्र. 52339...

डॉ. सुनील देशमुख : सभापती महोदय, ही माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, चार ते सहा महिन्यापासून गॅसचा पुरवठा कमी होत असल्यामुळे ऊरणच्या वीज निर्मिती प्रकल्पातून 330 मेगावॅट वीज निर्मिती होत होती. त्यानंतरच्या कालावधीत जानेवारी महिन्यामध्ये माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांबरोबर दिल्ली येथे बैठक घेतली, त्या बैठकीला पेट्रोलियम मंत्री माननीय श्री. मुरली देवरा साहेब सुध्दा उपस्थित होते. त्यावेळी आपल्यासाठी आवश्यक असलेला गॅसचा पुरवठा जानेवारीमध्ये मिळाला. तेव्हापासून आजपर्यंत या ऊरणच्या प्रकल्पामधून 670 मेगावॅट वीज उपलब्ध होत होती. माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितल्याप्रमाणे ऊरणच्या प्रकल्पाच्या विस्तारीकरणाची योजना आखण्यात आली असून त्यासाठी जागा उपलब्ध झाली आहे. त्यासाठी पर्यावरण विषयक सर्व दाखले आणि ना हरकत प्रमाणपत्र मिळाले आहे. आता केंद्रामध्ये नवीन सरकार सत्तेवर आले आहे. त्यामध्ये ग्रुप ऑफ मिनिस्टर गठीत होतील. ते झाल्यानंतर आपल्याला जस जसा गॅस लागेल तस तसा तो निश्चितपणे लवकरात लवकर मिळेल. 1200 मेगावॅटच्या नवीन वीज निर्मिती प्रकल्पाचे काम या वर्षी हाती घेण्यात येईल.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, किती संच बंद आहेत ? या प्रश्नाला आपण उत्तर देतांना 3 संच बंद असल्याचे सांगितले तर माननीय राज्यमंत्र्यानी 4 संच बंद असल्याचे सांगितले. तेव्हा प्रत्यक्षात 4 संच बंद आहेत कां? तसेच, ही वीज आपण कोणत्या दराने देणार आहात? हा प्रश्न मी चार वेळा विचारला आहे त्याचे उत्तर अपेक्षित आहे.

(यानंतर सौ. रणदिवे)

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.52339 . . . .

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, एम.ई.आर.सी.हे दर निश्चित करते. गॅस पासून, कोळशापासून आणि हायड्रो पासून निर्माण होणाऱ्या विजेचे दर वेगवेगळे असतात अशातला भाग नाही. आपण जी वीज निर्माण करतो, ती आपण मेन ग्रीड मध्ये टाकतो. आपले जे-जे ग्राहक असतील, त्या ग्राहकांसाठी वेगवेगळे दर आहेत. शेतीसाठी वेगळा दर आहे, इंडस्ट्रीसाठी वेगळा दर आहे आणि ते त्या-त्या ग्राहकांवर अवलंबून आहे.

. . . .टी-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनदृष्टया महत्वाच्या वेंगुर्ला बंदरातील अपुऱ्या सोयी सुविंधाबाबत

(५) * ५११३३ श्री.राजन तेली, श्री.संजय दत्त, श्री सुभाष चव्हाण, श्रीमती अलका देसाई,श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, श्री. चरणसिंग सप्रा : सन्माननीय **बंदरे मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पर्यटनदृष्टया महत्व असलेल्या वेंगुर्ला बंदरात अपुऱ्या सुविधा व बंदराची दुरावस्था झाली असल्याचे दिनांक ९ जानेवारी,२००९ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वेंगुर्ला बंदर विकासाबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर, श्री.नारायण राणे यांच्याकरिता : १) वेंगुर्ला बंदरात अपुऱ्या सुविधा असल्याचे वृत्त दैनिक लोकमत या वृत्तपत्रामध्ये दि. ९ जानेवारी २००९ रोजी प्रसिध्द झाले आहे.

२) वेंगुर्ला बंदराच्या सौंदर्यीकरणाकरिता महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने रु. १७४.०० लक्ष खर्चाचा प्रस्ताव तयार करुन छाननीसाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांचेकडे पाठविला आहे. सदर प्रस्तावामध्ये रेस्टॉरंट बांधणे, वॉटर स्कुटर /बोटी खरेदी करणे, जेट्टी व सभोवतालचे सौदंर्यीकरण करणे, पर्यटन स्थळाजवळ पाणी व प्रसाधन गृहाची सोय करणे, जेट्टीची दुरुस्ती व नुतनीकरण करणे इ.कामांचा समावेश आहे.

सदर प्रस्तावाची छाननी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडून करण्या येत आहे.

३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, मी जो प्रश्न उपस्थित केलेला आहे, त्याबाबतीत मला चांगले उत्तर मिळालेले आहे.फक्त माझा एकच प्रश्न आहे की, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळा कडून हा प्रस्ताव मेरीटाईम बोर्डाकडे गेलेला आहे.माझा पहिला प्रश्न असा आहे की, या प्रस्तावाची छाननी कधी पूर्ण होईल? तसेच तेथे जे.टी.ला संरक्षण कठडे नाहीत. तर त्याचे देखील काम हाती घेतले जाईल काय ? माझा तिसरा प्रश्न आहे की, त्याच बंदरावर या बंदरे विभागाची जुनी इमारत आहे. त्या इमारतीचे देखील नुतनीकरण होणार आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे वेंगुर्ला बंदराच्या सौंदर्यीकरणाच्या संबंधातील प्रस्ताव फेब्रुवारीमध्ये पाठविलेला आहे. परंतु त्यानंतर राज्यामध्ये आचारसंहिता लागू झाल्याने, याबाबत कारवाई झाली नाही. परंतु आता या प्रस्तावाची छाननी झाली असून 15 दिवसामध्ये मेरीटाईम बोर्ड याबाबत एन.ओ.सी.देणार आहे. तसेच जे.टी.च्या दुरुस्तीच्या संदर्भातील सर्व काम हे एम.टी.डी.सी.करणार असून हे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर :सभापती महोदय,महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने या बंदराच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कामासंबंधात आर्थिक वर्षामध्ये काही तरतूद केलेली आहे काय ? अशा प्रकारे सिंधुदूर्ग जिल्हयातील देवगड, विजयदूर्ग येथील जी बंदरे आहेत, त्यांचा विकास करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय, याबाबतीत मेरीटाईम बोर्ड निश्चितपणे लक्ष देईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये सन्माननीय मंत्री महोदयांनी .....

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, याबाबतीत . . . .

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय,मेरीटाईम बोर्डाच्या बजेटमधून हे काम घेता येईल.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. याठिकाणी प्रश्नामध्ये सिंधुदूर्ग जिल्हयातील वेंगुर्ला बंदराच्या सुशोभिकरणाच्या प्रस्तावाबाबत उल्लेख केलेला आहे. त्यासाठी जो निधी लागणार आहे, तो पर्यटन विकास महामंडळाने मेरीटाईम बोर्डाकडे दिलेला आहे. माननीय राज्यमंत्री डॉ.प्रितमकुमार शेगांवकर, आपल्याला हे माहिती नाही की, मेरीटाईम बोर्डाला रत्नागिरी येथील बंदर दुरुस्त करण्यासाठी उर्वरित महाराष्ट्र वैधानिक विकास महामंडळाकडून चार कोटी रुपये दिले होते. ते चार कोटी रुपये जवळजवळ दीड वर्षे तेथे पडून होते आणि नंतर असे पत्र आले की, आमच्याकडे अशी कोणतीही यंत्रणा नाही जेणेकरुन आम्ही हे पैसे खर्च करु शकतो. आता देखील तुम्ही मेरीटाईम बोर्डाकडून काम करणार असे सांगत आहात. पण या बोर्डाकडे काम करण्यासाठी यंत्रणा नाही, त्यांच्याकडे योजना नाही, त्यांच्याकडे पुरेसा स्टाफ नाही .....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी प्रश्न विचारावा.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मग ते काम कसे करणार आहेत ? याबाबत सांगावे.

श्री.नारायण राणे : सभापती महोदय, यापूर्वी असा प्रश्न विचारला होता की, यासाठी आर्थिक तरतूद केलेली आहे काय ? त्यालाही उत्तर देतो आणि नंतर सन्माननीय सदस्यांनी येथे

. . . .टी-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विचारलेल्या प्रश्नांनाही उत्तरे देतो. बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सागरी किनारा व सृष्टीपर्यटन विकास यासाठी पर्यटन विभागाने कृती आराखडा तयार केला व त्या अंतर्गत 2006-2007 ते 2009-2010 या चार वर्षाकरता 6 लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आणि त्यापैकी 3 लाख रुपयांचा निधी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने वितरीत केला असून त्या पैशातून वेंगुर्ला येथील कामासाठी 1 कोटी 74 लाख रुपयांची शिफारस करण्यात आली. मेरीटाईम बोर्डाकडे हा प्रस्ताव आलेला आहे. 11 जून मेरीटाईम बोर्डाची बैठक होणार असून, त्यामध्ये प्रस्ताव मंजूर होऊन काम सुरु होईल.

. . . .टी-5

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्य विद्युत मंडळाच्या पनवेल (जि.रायगड) कार्यालयातील कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी लाच स्विकारताना पकडल्याबाबत

(६) *५२२२५ ॲड. अनिल परब : सन्माननीय **गृह मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य विद्युत मंडळाच्या पनवेल (जि.रायगड) कार्यालयातील कर्मचाऱ्याला लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी दिनांक २० मार्च,२००९ रोजी वा त्या दरम्यान दोन हजार रुपयांची लाच स्विकारताना पकडले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अपेक्षेपेक्षा जास्त असलेल्या वीज देयकांची रक्कम कमी करण्याच्या बदल्यात उक्त लाचेच्या रक्कमेची मागणी केल्याच्या तक्रारीवरुन लाचलुचपत खात्याने उक्त कारवाई केली, हेही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, संगणकीकरण वीज देयकांवर मीटर रिडींगचा फोटो इत्यादी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होत असतांना मुळातच जास्त वीज आकारणी होण्याची नेमकी कारणे काय आहेत,

(५) यापुढे जास्त वीज अकारणी होऊ नये यास्तव काय उपाययोजना करण्यात आली वा येत आहे?

डॉ.नितीन राऊत, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : १) होय. राज्य विद्युत मंडळाच्या पनवेल, टपालनाका (जि.रायगड) कार्यालया-तील श्री.सुनील महादेव कोठारकर, कंत्राटी कामगार, तक्रार निवारण अधिकारी, एम.एस.ई.डी. पनवेल यांना दनिंक २० मार्च ०९ रोजी २,०००/- रुपयांची लाच स्विकरातना ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई यांनी पकडले.

२) होय, तक्रारदार श्री कपिल कमलाकर गोंघळी, खिडुकपाडा, पो.नावडे, ता.पनवेल यांनी श्री. यशवंत भोपी, यांचे कार्यालयाचे माहे फेब्रुवारी, २००९ ची जास्त आलेले वीजेचे बिल कमी करुन देण्यासाठी श्री.सुनिल महादेव कोठारकर, हे २,०००/- रुपये लाचेची मागणी करीत असलेले बाबतची तक्रार दिनांक १९ मार्च २००९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, नवी मुंबई येथे दिली सदर तक्ररीचे अनुषंगाने ब्युरोने श्री.सुनिल महादेव कोठारकर, कंत्राटी कामागार, तक्रार निवारण अधिकारी यांना २० मार्च २००९ रोजी रु. २०००/- लाच स्विकारतांना रंगेहात पकरण्यात आले असून ठाणे येथे गु.र.क्र. ४४/२००९ दि. २१ मार्च २००९ दाखलल केला आहे.

३) वीज वितरण कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने याबाबत चौकशी करुन अहवाल सादर केला आहे.

४) फोटो रिडींग श्री.भोपी या वीज ग्राहकाचे काही महिन्याचे फोटो रिडींग, फोटो देणाऱ्या एजन्सीने न घेतल्याने त्यांना सरासरी प्रमाणे देयक दिले होते. त्यामुळे त्यांना माहे डिसेंबर २००८ मध्ये वीज देयक जास्त आलेले होते. त्यानंतर अचूक मिटर रिडींग प्राप्त करुन वीज ग्राहकास सुधारीत देयक देण्यात आले व ते वीज ग्राहकाने भरणा केले आहे. फोटो रिडींग घेणाऱ्या एजन्सीने रिडींग न घेतल्याने महावितरण कंपनी तर्फे कंपनी तर्फे एजन्सीवर दंडात्मक कारवाई केलेली आहे.

५) फोटो रिडींग घेणाऱ्या एजन्सी कडून रिडींग प्राप्त न झालेल्या वीज ग्राहकांची स्वतंत्र यांदी काढून त्यांचे रिडींग प्राप्त झाल्यानंतरच वीज देयके तयार करण्यात येतात. त्यामुळे वीज ग्राहक फोटो रिडींग प्रमाणे अचुक वीज दिली जातात.

ॲड.अनिल परब : सभापती महोदय, हा प्रश्न दोन विभागांशी संबंधित आहे.त्यामुळे मला दोन्ही विभागांकडून उत्तर अपेक्षित आहे.एकतर हे हिमनगाचे एक टोक आहे.राज्य विद्युत मंडळा..

. . . .टी-6

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मध्ये भ्रष्टाचार होत आहे.त्याठिकाणी ग्राहकांना विजेची बिले जास्त आल्यानंतर,ती कमी करुन देण्यासाठी तेथील कर्मचारी मोठया प्रमाणात हप्ते मागत आहेत.यातील एका केसमध्ये संबंधितांना पकडल्यानंतर दुसऱ्या दिवशी जामिन मिळालेला आहे. परंतु फोटो रिडींगची सोय असून देखील अशा प्रकारे मोठया प्रमाणात तेथील कर्मचारी लोकांकडून पैसे मागत आहेत आणि बऱ्याच मोठया प्रमाणात विद्युत मंडळाचे नुकसान होत आहे. त्याठिकाणी अशा प्रकारे गैरप्रकार होणार नाहीत यासाठी विद्युत मंडळ खास अशी उपाययोजना करणार आहे काय ?

यानंतर कु.थोरात . . ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, याबाबतचे उत्तर विद्युत मंडळाला मागितलेले आहे. संबंधित खात्याशी चर्चा करुन याबाबतचे उत्तर देण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, यासंदर्भात वेगळा प्रश्न विचारण्यात आला तर त्याबाबतचे उत्तर देण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवण्यत यावा.

डॉ. नितीन राऊत : सभापती महोदय, सदर प्रश्न गृह विभागाशी संबंधित आहे. त्या ठिकाणी गुन्हा दखल झाला असून सध्या त्याची चौकशी सुरु आहे. आरोपीला अटक करण्यात आली आणि त्याच दिवशी दुपारी न्यायालयात त्याला जामीन देण्यात आला आहे. तपासाअंती आरोपीविरुध्द सक्षम अधिकाऱ्याकडून दोषारोपपत्र न्यायालयात दाखल करण्यात येणार आहे आणि ते केले जाईल.

श्री. मधुकर चव्हाण : सभापती महोदय,माझी अशी विनंती आहे की, सन्माननीय सदस्य श्री. अनिल परब यांनी या ठिकाणी प्रश्न विचारला तेव्हा माननीय मंत्रिमहोदय श्री. तटकरे साहेब म्हणाले की, हा वेगळा प्रश्न आहे. सभापती महोदय, तांत्रिकदृष्टया हा प्रश्न वेगळा असेल पण ग्रामीण भागात चुकिची बिले दिली जातात त्यासंबंधात माननीय ऊर्जा मंत्री उत्तर देऊ शकतात. माननीय मंत्रिमहोदयांच्या जिल्हयातील हा प्रश्न असून ते त्याठिकाणचे पालक मंत्री आहेत.

सभापती : हा प्रश्न गृहखात्याला विचारण्यात आलेला आहे आणि लाचलुचपत प्रकरणी एकाला पकडण्यात आले आहे अशा प्रकारचा रेफरन्स असला तरी त्यामध्ये नकळत विद्युत मंडळाचा सुध्दा संबंध आहे, असे मला वाटते म्हणून मी हा प्रश्न राखून ठेवीत आहे. ऊर्जा विभागाने आणि गृह विभागाने या प्रश्ना संबंधीचे योग्य उत्तर देण्याचा प्रयत्न करावा.

--x--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे बहिरीचापाडा (जि.रायगड) येथील संरक्षक बंधारा उद्ध्वस्त झाल्याबाबत

(7) * 50392 श्री. जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील : सन्माननीय **खार जमीन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अलिबाग तालुक्यातील (जि.रायगड) मौजे बहिरीचापाडा येथील गावा भोवतालच्या संरक्षक बंधाऱ्यास समुद्राच्या उधाणामुळे माहे जानेवारी, 2009 च्या दुसऱ्या आठवडयाच्या सुमारास मोठया प्रमाणात भेग पडल्याने समुद्राचे पाणी गावात शिरुन मोठया प्रमाणात ग्रामस्थांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(2) या घटनेनंतर ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी, रायगड यांची त्वरीत भेट घेऊन निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, शासनाने या प्रकरणी दखल घेऊन कोणती कार्यवाही केली आहे?

ॲड.प्रीतमकुमार शेगांवकर श्री.नारायण राणे यांच्या करिता : 1) होय.

2) होय. तथापि सदर घटनेपूर्वी दि.16 डिसेंबर 2008 रोजी व दि.5 जानेवारी 2009 रोजीच्या लोकशाहीदिनी ग्रामस्थ मंडळ बहिरीचापाडा यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी रायगड यांना सादर केलेला अर्ज कार्यवाहीसाठी खारभूमी सर्वेक्षण व अन्वेषण विभाग, पेण या कार्यालयास दि.5 जानेवारी 2009 रोजी प्राप्त झला आहे. त्यात बंधारा दुरुस्त करण्याबाबत विनंती केली होती.

3) ग्रामस्थ मंडळाच्या वरील निवेदनानंतर उप विभागीय अधिकारी, खारभूमी विकास उप विभाग, अलिबाग यांनी त्याबाबत दि.19 डिसेंबर 2008 रोजी क्षेत्रिय पहाणी करुन त्यांचा अहवाल दि. 15 जानेवारी 2009 रोजी जिल्हाधिकारी, रायगड यांना सादर केलेला आहे.

बहिरीचापाडा या गावास संरक्षण मिळावे म्हणून जिल्हा परिषदेकडून गावाच्या बाजूस 1530 मी. लांबीचा बांध बांधण्यात आला होता. सदर बांधाचे नुतणीकरणाचे काम खास बाब म्हणून जिल्हाधिकारी यांचे आदेशानुसार सन 2006-07 मध्ये रोजगार हमी योजनेतून खारभूमी विभागाने केलेले असून त्याचा पूर्णत्व अहवाल दि.2 जानेवारी, 2008 रोजी जिल्हाधिकारी यांना पाठविला आहे. हे काम गाव संरक्षक बंधाऱ्याचे असून ते खारभूमी विकास कामाच्या व्याप्तीतील नसल्याने सदर काम रोजगार हमी योजनेतून केलेले असल्याने सदर कामाची देखभाल व दुरुस्ती लाभधारकांनी करणे अभिप्रेत आहे ही बाब ग्रामस्थांच्या निदर्शनास दि. 31 जानेवारी 2009 रोजी आणण्यात आली. त्यानंतर ग्रामस्थांनी श्रमदानाने संरक्षक बांधाची दुरुस्ती केली आहे व त्यामुळे गावास संरक्षण प्राप्त झाले आहे=

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मौजे बहिरीचापाडा हे गाव समुद्रकिनाऱ्यावर आहे. या किनाऱ्यावरील संरक्षक बंधाऱ्यचे काम बरेच वर्षे न केल्यामुळे समुद्राचे पाणी गावात येते. विशेषत: भात शेतीमध्ये येते. त्यामुळे त्याठिकाणी मॅनग्रोव्ह वनस्पती वाढते आणि तेथील भात शेती नष्ट होते. म्हणून या भात शेतीत व गावात पाणी येणार नाही याची शासन तातडीने तजवीज करील काय?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्रमांक 50392

ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर : सभापती महोदय,त्या बंधाऱ्याचे संरक्षण जिल्हापरिषदेकडे आहे, खार जमीन विभागाकडे नाही. त्यामुळे त्याठिकाणचा बंधारा जिल्हा परिषदेने बांधलेला आहे आणि तो दुरुस्तही जिल्हा परिषदेनेच केलेला असून सदर बंधाऱ्यचे काम रोजगार हमी योजनेमधून करण्यात आलेले आहे. याबाबतीत ग्रामपंचायतीने पुढाकार घेतला आणि या संरक्षक बंधाऱ्याचे काम जिल्हा परिषदेने केलेले आहे.

श्री. नारायण राणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र.पाटील यांनी संरक्षक बंधाऱ्यासंबंधीचा प्रश्न विचारलेला आहे. त्याठिक्काणी यापूर्वी मातीचा बंधारा बांधण्यात आला होता तो रहात नव्हता त्यामुळे रोजागार हमी योजनेच्या माध्यमातून या बंधाऱ्याचे काम झालेले आहे. त्या ठिक्राणी कायमस्वरुपी संरक्षक बंधारा व्हावा अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. पुढच्या वर्षी खार भूमी विकास कार्यक्रमात सामील करुन तो बंधारा केला जाईल.

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ MAP/ MMP/ KGS/ SBT/

राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयातील रिक्त पदे भरल्याबाबत

(८) * ५१८८३ श्री. प्रकाश शेंडगे , श्री. पांडुरंग फुंडकर , श्री. नितीन गडकरी , श्री. संजय केळकर , श्री. भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्याकडून दिनांक १६ डिसेंबर, २००८ रोजी माहितीच्या अधिकारात मागविलेल्या माहितीनुसार राज्यातील तंत्रनिकेतन महाविद्यालयात ८१६ पदे रिक्त असल्याचे, निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रिक्त पदे तातडीने भरण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,

(३) अद्याप कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (१) होय.

(२) व (३) शासकीय तंत्रनिकेतनातील रिक्त शिक्षकीय पदे महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. ८१६ रिक्त शिक्षकीय पदांबाबत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून कार्यवाही सुरु असून एप्रिल, २००९ मध्ये प्रमुख वृत्तप्रत्रामध्ये जाहिरात देण्यात आली आहे.

श्री. प्रकाश शेंडगे : महाराष्ट्र सरकारच्या शासकीय तंत्र निकेतन महाविद्यालयातील सावळागोंधळ या प्रश्नाच्या माध्यमातून पुढे आलेला आहे. सभापती महोदय, पॉलिटेक्निक आणि इंजिनियरिंग कॉलेज्समधील तबल 816 पदे ती देखील प्राचार्य, विभाग प्रमुख आणि अधिव्याख्याता अशी महत्वाची पदे शासनाने भरलेली नाहीत.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशा परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी शिक्षणाचा काय गोंधळ असेल याची कल्पना केलेली बरी. ही 816 पदे किती वर्षापासून रिक्त आहेत ? ही पदे भरण्यासाठी आता कार्यवाही सुरु आहे असे म्हटले आहे. ही कार्यवाही किती दिवसात पूर्ण करणार ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, एकूण मंजूर पदे 2031 आहेत. त्यापैकी 814 पदे रिक्त दाखविलेली आहेत. परंतु ही पदे यासाठी रिक्त दाखविलेली आहेत की, त्या ठिकाणी काही जी पदे भरलेली आहेत ती तात्पुरत्या स्वरुपात भरलेली आहेत. ॲडव्हॉक किंवा कंत्राटी किंवा हंगामी अशा दोन तीन प्रकारे नेमणुका केलेल्या आहेत. त्यामुळे शिक्षणाच्या संदर्भात त्या ठिकाणी जे शिकविण्याचे काम आहे त्यामध्ये खंड पडलेला नाही. फक्त विषय एवढाच आहे की, एमपीएसचीचे भरतीचे काम मागच्या चारपाच वर्षामध्ये वेगवेगळ्या कारणाने बंद होते. अपंगांची भरती अगोदर करा, त्याशिवाय इतर भरती करु नये अशा प्रकारचा हायकोर्टाचा, सुप्रीम कोर्टाचा निर्णय तसेच वेगवेगळ्या कारणाने मागच्या काळात भरती झालेली नव्हती. त्या काळामध्ये ही पदे कंत्राटी पध्दतीवर भरण्याचे काम झालेले आहे. त्यामुळे शिकविण्याचे काम चालू आहे हे मी स्पष्ट करु इच्छितो. या 814 पदांची जाहिरात एप्रिल महिन्यामध्ये आलेली आहे. पुढच्या आठवड्यामध्ये या सगळ्या पदांच्या संदर्भात मुलाखती घेण्याची प्रक्रिया करण्यात येणार आहे. येत्या चार ते सहा महिन्यांमध्ये सगळी 814 पदे पूर्णपणे भरली जातील आणि राज्याच्या तांत्रिक शिक्षण विभागाच्या हद्दीपर्यंत कोणतेही पद रिक्त राहणार नाही हे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, मालवण तालुक्यातील पॉलिटेक्निक कॉलेजच्या संदर्भात वर्ग 1 ची 41 पदे मंजूर आहेत आणि फक्त 16 पदे भरलेली आहेत. प्राध्यापकापासून अनेक पदे रिक्त आहेत. वर्ग 2 मध्ये 47 पदे मंजूर आहेत आणि 25 पदे भरलेली आहेत. वर्ग 3 मध्ये 31 पदांपैकी फक्त 17 पदे भरलेली आहेत. म्हणून मालवणच्या ग्रामीण भागामध्ये ही पदे कधी भरणार ? माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी सांगितले परंतु गेल्या वेळी अशा प्रकारे वर्तमानपत्रात जाहिरात देऊनही आमच्याकडे दोन वर्षापासून पदे भरली गेली नाहीत. आय.टी.आय.च्या संदर्भात त्या ठिकाणी पर्यटन हा ट्रेड आहे परंतु त्या ठिकाणी असलेले बरेच ट्रेड शिक्षक नसल्यामुळे चालू झालेले नाहीत. त्या ठिकाणची ही पदे सुध्दा भरली जातील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 51883 .....

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मी अतिशय जबाबदारीने सांगितले की, तांत्रिक शिक्षण विभाग आणि आमचा प्रशिक्षण विभाग या दोन्ही ठिकाणची सगळी पदे भरण्याच्या संदर्भात एमपीएससीच्या पर्व्ह्यूमध्ये जी पदे येतात त्याबाबतीत त्यांना कळविले असून मुलाखती चालू आहेत आणि कोणत्याही परिस्थितीमध्ये सहा महिन्यांच्या आत ही सगळे पदे भरली जातील

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, राज्यामध्ये जेवढी शासकीय तंत्रनिकेतने आहेत त्यामध्ये रिक्त असलेली 816 पदे बऱ्याच वर्षापासून रिक्त आहेत असा उल्लेख सन्माननीय सदस्यांनी केला. त्याबाबत उत्तर देत असताना माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, ही पदे रिक्त नसून कंत्राटी पध्दतीवर, ॲडव्हॉक पध्दतीवर अधिव्याख्याते नेमलेले आहेत आणि त्यांच्याकडून काम करुन घेतलेले आहे. त्यांच्या बाबतीत शासन भविष्यामध्ये काय निर्णय घेणार आहे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न विचारलेला आहे. मी सांगू इच्छितो की, हे जे कंत्राटी पध्दतीवर लेक्चरर्स, अधिव्याख्याते नेमलेले आहेत त्या सगळ्यांना नियमित करुन घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे आणि त्यादृष्टीकोनातून कॅबिनेटमध्ये लवकरच प्रस्ताव आणत आहोत.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी सांगितले की, शिक्षक नाही म्हणून शिकविणे थांबले आहे असे झालेले नाही. मुंबईत आय.टी. व कॉम्प्युटर सायन्स या दोन्ही कोर्सेससाठी मुंबई तंत्रनिकेतन महाविद्यालयात शिक्षण देणे थांबलेले आहे. शिक्षक नाही म्हणून इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचा कोर्स सुरु करु करता आलेला नाही. सहाव्या वेतन आयोगाचे ओझे वाढले म्हणून ही पदे भरण्यासाठी टाळाटाळ केली जात आहे. या तंत्रनिकेतन महाविद्यालयामध्ये सहा महिन्यांकरिता पदे भरली जाणार म्हणजे अर्धे वर्ष त्यात वाया जाणार आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सगळया प्रश्नांची पुनरावृत्ती होत आहे. मुंबईतील तंत्रनिकेतनातील जेवढी पदे रिक्त आहेत ती भरण्यासाठी एमपीएससीला कळविलेले आहे. त्यांच्यामार्फत ही पदे भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. या सर्व पदांवर ताबडतोब नेमणुका केल्या जातील. त्याठिकाणी आयटी किंवा कॉम्प्युटर सायन्स हे विषय शिकविण्यासाठी शिक्षक नाहीत असे सन्माननीय सदस्यांनी म्हटले आहे. मुंबई तंत्रनिकेतन महाविद्यालयातील जी रिक्त पदे आहेत त्याबाबत विषयनिहाय रिक्त पदांची माहिती एमपीएससीला कळविलेली आहे आणि त्याअनुषंगाने ती पदे भरली जातील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मंत्रिमहोदय जरी म्हणत असतील की, पदे रिक्त असली तरी त्याचा शिक्षणावर परिणाम झालेला नाही. मंत्रिमहोदयांचे वक्तव्य रेकॉर्डवर आलेले आहे. मंत्रिमहोदयांचे असे म्हणणे असले तरी शिक्षक नसल्यामुळे त्याचा 100 टक्के विपरित परिणाम झालेला आहे हे खरे आहे. तंत्रनिकेतन महाविद्यालयांमध्ये जी पदे रिक्त आहेत त्या पदांवर काम करणारे कंत्राटी पध्दतीवर किंवा मानधनावर जे शिक्षक काम करतात त्यांना अतिशय कमी पगार मिळतो. त्यामुळे त्या पदावर काम करण्यासाठी उमेदवार मिळत नाहीत, उमेदवार मिळाले तर ते टिकत नाहीत. यावर उपाय म्हणून या पदांवर नियमित वेतनश्रेणी लागू केली जाईल काय ? असा माझा पहिला प्रश्न आहे. या तंत्रनिकेतनामध्ये काम करणारे अंशकालीन कर्मचारी आहेत किंवा घडयाळी तास तत्वावर काम करणारे कर्मचारी आहेत त्यांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय घेतलेला असताना पेणच्या तंत्रनिकेतनातील अशाप्रकारे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना त्याचा लाभ दिला जात नाही. हा लाभ त्यांना देण्यासाठी शासन कार्यवाही करणार आहे काय ?

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे : कंत्राटी पध्दतीच्या अधिव्याख्यात्यांना नियमित करण्याचा अर्थच असा आहे की, त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करावयाची आहे. सन्माननीय सदस्य श्री.मोते यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे की, त्यांना नियमित वेतनश्रेणी लागू करणार आहे काय, त्याला 'होय' असे उत्तर आहे. त्यांना सहावा वेतन आयोग लागू करण्यासंबंधी शासनाने तत्वत: मान्य करण्याचा निर्णय घेतलेला आहे. पेण येथील तंत्रनिकेतन महाविद्यालयातील कर्मचारी घडयाळी तास तत्वावर काम करतात त्यांना नियमित केले जाणार काय, असा प्रश्न उपस्थित केला आहे. घडयाळी तास तत्वावर काम करणारा वर्ग आहे, त्याबाबत माहिती घ्यावी लागेल. परंतु सध्या तरी शासनाने कंत्राटी व हंगामी स्वरुपात कर्मचाऱ्यांची नेमणूक केलेली आहे. त्याठिकाणी घडयाळी तास तत्वावर तेथे कर्मचारी काम करीत असतील तर त्याचा जरुर विचार करु.

अशुध्दीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

नागपूर विद्यापीठांतर्गत महाविद्यालयामध्ये कायम स्वरुपी प्राचार्य नेमण्याबाबत

(९) * ५०४३७ श्री. व्ही.यू. डायगव्हाणे : तारांकित प्रश्न क्रमांक ४६११३ ला दिनांक १६ डिसेंबर,२००८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर विद्यापीठाशी संलग्न १५९ महाविद्यालयातील कार्यकारी प्राचार्य व १६६ महाविद्यालयांमध्ये एकही मान्यता प्राप्त शिक्षक नसल्यामुळे रिक्त असलेल्या जागी नियमित प्राचार्यांची पदे मा.मुंबई उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांनी रिट पिटिशन क्र-२२१६/०६ मध्ये दिलेल्या निदेशानुसार केलेल्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय आहे.

(२) पदे भरले असल्यास किती पदे भरली आहेत व ती केव्हा भरण्यात आली आहेत,

(३) अद्याप, कार्यवाही झाली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (१) मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खडपीठाने दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ रोजी दिलेले निर्देश विचारात घेऊन विद्यापीठाने संबंधीत महाविद्यालयांना दिनांक ११ नोव्हेंबर, २००८ रोजीच्या पत्रान्वये प्राचार्यांची रिक्त पदे दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंत भरण्याबाबत कळविले आहे. कार्यवाहीची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

विद्यापीठाने मा.उच्च न्यायालयाच्या याचिका क्रमांक २२१६ मध्ये शपथपत्र दाखल करतांना प्राचार्यांची रिक्त पदे न भरणाऱ्या महाविद्यालयांविरुध्द पुढील कारवाई करण्याची हमी दिली आहे.

१) मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २२१६/०६ वरील दिनांक १५ ओक्टोंबर, २००८ रोजी दिलेले निर्देश विचारात घेऊन विद्यापीठाने प्राचार्यांची रिक्त पदे ३१ मार्च २००९ पर्यंत भरण्याची कार्यवाही करण्याचे कळविले आहे.

२) मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने २२१६/०६ वरील दिनांक ३ डिसेंबर, २००८ रोजी दिलेल्या निर्देशानुसार विद्यापीठाने प्राचार्य पदावर नियुक्तीसाठी संबंधित महाविद्यालयांना दिनांक ७ जानेवारी, २००९ नुसार कळविले आहे.

तसेच मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे पात्रउ असलेल्या शिक्षकांची यादी तयार करुन पुढील कार्यवाहीस्तव महाविद्यालयांना पाठविण्यात आली आहे.

३) महाविद्यालयाचे व्यवस्थापनांना स्मरणपत्र पाठवून ज्या महाविद्यालयांनी विद्यापीठाने निर्देश देवूनही कार्यवाही केली नाही तर संलग्निकरण काढून घेण्याची कार्यवाही नियमांतर्गत करण्यात येईल असे विद्यापीठाने कळविले आहे.

ज्या महाविद्यालयाचे प्राचार्य नियुक्तीबाबत ३१ मार्च, २००९ पर्यंत काहीच कार्यवाही केली नाही अशा महाविद्यालयांना विद्यापीठाने नोटीस देणे सुरु केले आहे.

२) मा.उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिनांक १५ ऑक्टोबर, २००८ व ३ डिसेंबर, २००८ नंतर दिलेल्या निर्देशाप्रमाणे नागपूर विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने प्राचार्यांची नियुक्ती प्रक्रिया सुरु केली असून त्यानंतर दि. ३१ मार्च, २००९ पर्यंत एकूण २३ प्राचार्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

३) विद्यापीठाकडून कार्यवाही होण्यास विलंब झालेला नाही. मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे कार्यवाही सुरु आहे.

४..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ MMP/

ता.प्र.क्र.50437....

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : सभापती महोदय, नागपूर विद्यापीठांतर्गत असलेल्या वरिष्ठ महाविद्यालयातील प्राचार्यांची शेकडो पदे रिक्त असल्याबाबतचा हा प्रश्न आहे. माननीय हायकोर्टाने निर्देश देताना स्पष्टपणे सांगितले होते की, तुम्हाला दिलेल्या मुदतीमध्ये प्राचार्यांची सर्व रिक्त पदे भरावीत. त्यानुसार विद्यापीठाने महाविद्यालयांना 2-3 वेळा पत्राने सुध्दा कळविले आहे. परंतु त्याचा काही परिणाम झाला नाही. दिनांक 31.3.2009 पर्यंत पदे भरण्यासाठी मुदत दिली होती. शेकडो रिक्त पदांपैकी केवळ 23 पदे भरली आहेत. ही पदे भरण्यासाठी विलंब झालेला नाही असे लेखी उत्तरात म्हटले आहे. शासनाने विलंब झाल्याचे मान्य करावे. दिनांक 31.3.2009 नंतर आजपर्यंत किती पदे भरली आहेत, उर्वरित पदे भरण्याच्या संदर्भात काय नियोजन केलेले आहे त्याची माहिती द्यावी. या पदाचा दर्जा वाढवावयाचा आहे असे शासन म्हणत आहे, पण प्राचार्यच नसतील तर त्या पदाचा दर्जा खरोखर वाढणार आहे काय याचा विचार करुन येत्या दोन महिन्यात ही सर्व रिक्त पदे भरली जातील काय ?

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे : एकूण किती पदे रिक्त आहेत असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारलेला आहे. एकूण अनुदानित महाविद्यालयातील प्राचार्यांची 222 पदे रिक्त आहेत. कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील 352 पदे रिक्त आहेत. प्राचार्यांची पदे भरण्याच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका सुस्पष्ट आहे. हायकोर्टाने दिलेल्या आदेशानुसार शासनाने सर्व विद्यापीठांना व महाविद्यालयांना कळविलेले आहे की त्यांनी ताबडतोबीने ही प्रक्रिया सुरु करावी. ती प्रक्रिया चालू आहे. मार्च पासून आतापर्यन्त किती पदे भरली या संबंधीची आकडेवारी माझ्याकडे आहे. परंतु त्या सर्वांची मी बेरीज केलेली नाही. म्हणून ती माहिती मी पटलावर ठेवीन. ही रिक्त पदे भरली जावीत अशी शासनाची इच्छा आहे. ही पदे भरण्यासंबधाने एक हर्डल आहे. ज्या नवीन नेमणुका झाल्या त्या नेमणुकांना नवीन पेन्शन स्कीम लागू राहील असे वित्त विभागाचे एक सर्क्युलर निघालेले आहे. त्यांच्या सर्व्हिसेस सेक्युअर करण्याच्यादृटीने वित्त विभागाच्या सर्क्युलरमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे.

श्री. व्ही.यू.डायगव्हाणे : हा बदल किती दिवसात करणार ?

श्री. राजेश टोपे : ही पदे भरली पाहिजेत अशी शासनाची भूमिका आहे. सन्माननीय सदस्यांची देखील ही पदे लवकर भरली जावीत अशी अपेक्षा आहे. हायकोर्टाने देखील 31 मार्च पर्यन्त सर्व पदे भरावीत असे आदेश दिलेले आहेत. परंतु हायकोर्टाने दिलेल्या आदेशांना सुप्रीम कोर्टाने स्टे दिलेला आहे. आता आपण जूनमध्ये आहोत. त्यामुळे हायकोर्टाच्या निर्णयाला जर स्टे दिलेला असेल तर ही पदे भरण्याची प्रक्रिया थाबेल. ही प्रकिया चालू ठेवून लवकरात लवकर ही पदे भरावीत अशी सक्त ताकीद विद्यापीठांना आणि महाविद्यालयांना आम्ही देऊ.

डॉ. वसंत पवार : माननीय मंत्री महोदयांनी प्राचार्यांची पदे भरण्याच्या संदर्भातील अडचणी या ठिकाणी सांगितल्या. मी व्यवस्थापनाच्या वतीने या ठिकाणी बोलणार आहे. मी देखील सर्व ठिकाणी प्राचार्य असलेच पाहिजे या मताचा आहे. प्राचार्य पदासाठी 10 वर्षाचा शिकविण्याचा अनुभव आणि पीएच.डी. असा क्रायटेरिया आहे. प्रोफेशनल कॉलेजेस, आर्किटेक्ट कॉलेजेस, एमबीए कॉलेजेस अशा सर्व कॉलेजेससाठी हा क्रायटेरिया आहे. पीएच.डी. झालेल्या माणसांची कमतरता आहे. 31मे पर्यन्त प्राचार्यांची पदे भरली गेली नाहीत तर त्यांनी ॲडमिशन करावयाचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नाही अशा हायकोर्टाने दिलेल्या निर्णयास सुप्रीम कोर्टाने स्टे दिलेला आहे. शासनाने पेन्शनच्या संदर्भातील जी.आर. परत घ्यावा. 5 वर्षाचा शिकविण्याचा अनुभव असलेल्या व्यक्तीस प्राचार्य पदी नियुक्ती करण्यास मान्यता द्यावी व तसे आदेश विद्यापीठांना द्यावेत. पीएच.डी. झालेली व्यक्ती नसेल तर ते पद तात्पुरत्या स्वरुपात भरण्यास परवानगी द्यावी. असे केले नाही तर प्रवेश प्रक्रिया अडचणीमध्ये येईल. तेव्हा प्रायार्य पदांच्या नियुक्तीमध्ये रिलॅक्झेशन देणार काय ? पेन्शनसंबंधीचा जी.आर मागे घेणार काय ? ॲडमिशनसाठी टाईम लिमिट वाढवून देणार काय ?

श्री. राजेश टोपे : नव्या पेन्शन स्कीमचे सर्क्युलर हे वित्त विभागाने काढलेले आहे.

...नंतर श्री. गिते...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50437.... श्री. राजेश टोपे...

त्यामुळे सुध्दा जे अधिव्याख्याता म्हणून बरीच वर्षे काम करीत आहेत, नंतर ते प्राचार्य झाले की त्यांची नवीन नेमणूक होते आणि म्हणून त्यांची मागची सर्व्हीस काऊंट केली जात नाही अशा पध्दतीचा जो काही विषय होता म्हणून प्राचार्य होण्यासाठी ते उत्सुक नाहीत. यासंदर्भात वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे, त्या परिपत्रकाच्या बाबतीत आमच्या स्तरावर चर्चा झाली आहे आणि ते परिपत्रक विड्रॉ करण्याच्या दृष्टकोनातून विचार करण्यात आलेला आहे. या संदर्भात जी काही उचित दुरुस्ती आहे, ती करण्याच्या दृष्टीने म्हणजे त्यांची सर्व्हीस प्रोटेक्ट करण्याच्या दृष्टीकोनातून निर्णय घेतले जात आहेत. याबाबतचा निश्चितपणे निर्णय घेतला जाईल असे सन्माननीय सदस्यांच्या पहिल्या प्रश्नाचे उत्तर आहे. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, रिक्रुटमेंटचे नियम आहेत. 10 वर्षाची सर्व्हीस पाहिजे तसेच पी.एच.डी.पर्यंतचे शिक्षण पाहिजे. यासंबंधीची शिथिलता शासन देऊ शकत नाही. यासंदर्भात यु.जी.सी.चे सगळे नियम आहेत. शैक्षणिक अर्हता ही यु.जी.सी.ठरविते. हा जो काही अडचणीचा विषय आहे तो आम्ही यु.जी.सी.च्या लक्षात आणून देऊ.

प्रा.बी.टी.देशमुख : 10 आणि 15 वर्षाचा अनुभव असला पाहिजे हा नियम अनेक वर्षापासूनचा आहे. दोन दोनशे, तीन तीनशे, पाच पाचशे ठिकाणी प्राचार्य नाहीत ही गोष्ट चांगली नाही. सदर पदे भरण्यासंदर्भात उच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे. परंतु त्या निर्णयाची मात्र अंमलबजावणी करण्यात येत नाही. शासनाने काढलेल्या एका निगेटिव्ह सर्क्यूलरचा माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी उल्लेख केला त्याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. ही पदे भरा म्हणून उच्च न्यायालयाने निर्णय दिला असताना दिनांक 24 फेब्रुवारी, 2009 रोजी ही पदे अजिबात भरता येणार नाहीत अशा प्रकारचा शासनाकडून जी.आर.काढण्यात आला आहे. उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर शासनाने हा जी.आर.काढलेला आहे. सदर जी.आर.असा म्हणतो की, तुम्ही प्राचार्य पदावर गेलात तर इतक्या वर्षाची सर्व्हीस असली तरी तुमची पेन्शनेबल सर्व्हीस जाईल. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने नवी पेन्शन स्कीम 2004 मध्ये सुरु केली. आपण 2005 मध्ये सुरु केली. 2005 नंतर जे सेवेत लागतील त्यांना नवी स्कीम लागेल आणि अगोदरच्या लोकांना जुनी स्कीम लागेल. गव्हर्नमेंट ऑफ इंडियाने दिनांक 30 एप्रिल, 2004 रोजी असे सर्क्यूलर काढलेले आहे आणि

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.50437....

प्रा.बी.टी.देशमुख...

त्यानंतर दिनांक 26 जुलै,2005 रोजी पुन्हा यासबंधी सर्क्यूलर काढलेले आहे. जुन्या पेन्शनेबल आस्थापनेवर असलेला मनुष्य नव्या पेन्शनेबल आस्थापनेवर डायरेक्ट सिलेक्षणने गेला असेल तर त्याला जुनीच व्यवस्था लागू राहील. या ठिकाणी शासनाने एक सर्क्यूलर काढलेले आहे. त्यातही मोठी गंमत आहे. ज्याने अगोदर अर्ज केला तर त्याला जुनीच व्यवस्था लागू राहील. अमूक तारखे नंतर अर्ज केला तर नवी व्यवस्था लागू राहील. माननीय मंत्री महोदयांनी या ठिकाणी हे सर्क्यूलर चुकीचे आहे असे सहज सांगितले. परंतु ते सर्क्यूलर खरोखरच चुकीचे आहे असे माझे स्पष्ट मत आहे. ते सर्क्यूलर मागे घेण्याचे देखील माननीय मंत्री महोदयांनी मान्य केले आहे. याबाबतीत माझे स्पष्ट म्हणणे असे आहे की, गव्हर्नमेंट ऑफ इंडियाच्या 20 एप्रिल, 2004 आणि 26 जुलै, 2005 च्या सर्क्यूलरच्या ते विरुध्द आहे. नवीन स्कीम नव्या लोकांना लागेल. सभापती महोदय, मी आपल्या माहितीसाठी सांगतो की, नायब तहसीलदार पदोन्नतीने तहसीलदार होतो, तहसीलदार हा पदोन्नतीने उप जिल्हाधिकारी होतो आणि उप जिल्हाधिकारी हा पदोन्नतीने जिल्हाधिकारी होतो. प्रमोशन पध्दती आहे, त्या कर्मचा-यांना पेन्शन स्कीम चालू राहते. आता परिणाम असा झाला आहे की, विना अनुदानातील फिजिकल एज्युकेशन टीचर्स अनेक ठिकाणी प्राचार्य म्हणून सिलेक्ट झाले. या ठिकाणी महत्वाची अडचण अशी आहे की, शासनाने जो चुकीचा जी.आर.काढलेला तो आठ दिवसात परत घेण्यात येईल काय ?

श्री.राजेश टोपे : मी स्वत: या संदर्भात सांगितले की, हा जी.आर.चुकीचा आहे. या जी.आर.च्या संदर्भात वित्त विभाग, नियोजन विभाग व संबंधित विभागांशी चर्चा केलेली आहे. या जी.आर.चा काय परिणाम होणार आहे यासंबंधी अभ्यास करण्यात आलेला आहे. त्यामुळे तो जी.आर.मागे घेण्याचा निर्णय आम्ही घेणार आहोत. सदर जी.आर.किती दिवसात परत घेण्यात येईल यासंबंधीचा निश्चित कालावधी मी लागलीच सांगू शकणार नाही. सदरचा जी.आर.हा चुकीचा आहे आणि तो दुरुस्त करण्यासंदर्भात लवकरात लवकर पावले उचलण्यात येतील.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, हा अतिशय महत्वाचा विषय आहे. त्यामुळे या विषयाच्या बाबतीत आपण आपल्या दालनात बैठक संबंधितांना निमंत्रित करुन बैठक आयोजित करावी अशी माझी विनंती आहे.

यानंतर श्री. भोगले....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखाची नाही

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, शिक्षकांचे प्रश्न असतील तर शिक्षक प्रतिनिधी सभागृहात तो प्रश्न लावून धरतात. परंतु राज्यातील इतर कोणत्याही प्रश्नाबाबत एकही शिक्षक प्रतिनिधी सभागृहात हजर असत नाहीत.

(गोंधळ)

सभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया शांतता राखावी व जागेवर बसावे. सदनामध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला आपापले प्रश्न अत्यंत परिणामकारकपणे विचारण्याचा प्रयत्न सन्माननीय सदस्य करीत असतात, तो त्यांचा हक्क आहे. माझे एवढेच मत आहे की, अनेक क्षेत्रातील अनुभवी लोकप्रतिनिधी याठिकाणी आहेत, कोणी कशा पध्दतीने प्रश्न विचारावा यावर आपण किमान भाष्य करणे योग्य होईल. एखाद्या प्रश्नाच्या अनुषंगाने त्या प्रश्नाला न्याय मिळावा असा प्रयत्न साहजिकच होत असता. सन्माननीय सदस्य ॲड.गुरुनाथ कुळकर्णी जसे एखाद्या प्रश्नाच्या निमित्ताने पोटतिडकीने पाठपुरावा करतात तसाच पाठपुरावा याठिकाणी अन्य सन्माननीय सदस्य करीत असतात.

ॲड.गुरुनाथ कुळकर्णी : सभापती महोदय, यादीतील 13 व्या क्रमांकाचा प्रश्न हा माझ्या जिल्हयाशी निगडित व अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे.

सभापती : प्रश्न डेव्हलप करण्याची लागलेली सवय कमी करण्याचा प्रयत्न केला तर 13 व्या प्रश्नापर्यंत सहज जाता येईल अशी वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांना मी विनंती करतो की, जसा आपला प्रश्न एखाद्या सदस्याला अत्यंत महत्वाचा वाटतो, तसा अन्य सदस्यांना त्यांचे यादीत आलेले प्रश्न मांडता यावेत अशी त्यांची भावना असणे साहजिकच आहे. म्हणून या प्रश्नाच्या अनुषंगाने सन्माननीय मंत्री महोदयांना मी माझ्या दालनात बोलावतो, याबाबत चर्चा करुन ज्यांना या चर्चेमध्ये संधी देणे शक्य झाले नाही असे सन्माननीय सदस्य आहेत, ज्यामध्ये श्रीमती अलका देसाई, श्री.मधुकर चव्हाण, डॉ.वसंतराव पवार या सगळ्यांना मी माझ्या दालनात बोलावून या प्रश्नाच्या अनुषंगाने मार्ग काढला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मौजे घाटनांद्रा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) येथील सरकारी, रुग्णालयात डॉक्टरांची नेमणूक करणेबाबत

(१०) * ५०६११ श्री. सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , प्रा. फौजीया खान , श्री. जितेंद्र आव्हाड : सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे घाटनांद्रा (ता.सिल्लोड, जि.औरंगाबाद) ह्या सर्वात मोठ्या म्हणजे १५ हजार लोकवस्तीच्या गावामध्ये सरकारी दवाखान्यात गेल्या चार वर्षापासून वैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्याची बाब उघडकीस आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाकडून डॉक्टर आपल्या दारी, कुपोषण निर्मूलना सारख्या योजना राबविल्या जात आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गरीब जनतेला उपचाराअभावी हाल अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, घाटनांद्रा सरकारी रुग्णालयात त्वरीत वैद्यकीय अधिकाऱ्याची नेमणूक करण्याविषयी शासनाने निर्णय घेतला आहे काय वा घेण्यात येणार आहे काय ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : १) हे खरे नाही.

२) शासनाकडून आरोग्य विषयक योजना राबविल्या जात आहेत.

३) हे खरे नाही.

४) आयुर्वेदिक दवाखाना, घाटनांद्रा येथे वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहे.

श्री.सतीश चव्हाण : सभापती महोदय, उत्तरामध्ये चुकीची माहिती दिली आहे असे माझे मत आहे. मी स्वत: आताच दूरध्वनीवरुन माहिती घेतली असता दीड वर्षापासून घाटनांद्रा येथील रुग्णालयात डॉक्टर नाहीत अशी माहिती मला मिळाली. डॉक्टरांना फक्त नेमणुकीचे पत्र दिले गेले, फिजिकली डॉक्टर हजर झालेले नाहीत.

....2ए.1....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 50611.....

डॉ. राजेंद्र शिंगणे : घाटनांद्रा येथे जो आयुर्वेदिक दवाखाना आहे त्या ठिकाणी डॉ. रुपाली ठाकरे या दि. 19 जानेवारी, 2009 पासून कार्यरत आहेत. त्या दिनांक 1 मे, 2009 पासून प्रसूती रजेवर गेल्यामुळे त्यांच्या जागेवर डॉ. येरावार, प्राथमिक आरोग्य केंद्र आमठाणा यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार दिलेला आहे. म्हणून सन्माननीय सदस्यांनी सांगितली ती वस्तुस्थिती खरी नाही.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपलेला आहे.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे

डॉ. सुनील देशमुख (वित्त व नियोजन राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, 1994 च्या अनुच्छेद 7 अंतर्गत महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल यांनी वार्षिक योजना सन 2009-2010 करिता पाटबंधारे विकास क्षेत्र तसेच पाटबंधारे वगळून इतर विकास क्षेत्रातील अनुशेष दूर करण्याकरिता नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय वाटपाबाबत दिलेले दिनांक 7 मे 2009 रोजीचे निदेश" सभागृहासमोर ठेवतो.

सभापती : नियतव्ययाच्या प्रदेशनिहाय वाटपाबाबतचे निदेश सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा
अहवाल सादर करणे व संमत करणे

श्री. अरविंद सावंत (समिती सदस्य) : महोदय, मी आपल्या अनुमतीने अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला सादर करतो.

शुक्रवार, दिनांक 5 जून, 2009 रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात येणाऱ्या अशासकीय ठराव पुर:स्थापनार्थ असलेली दोन विधेयके यास द्यावयाचा वेळ ठरविण्याकरिता गुरुवार, दिनांक 4 जून, 2009 रोजी समितीची बैठक झाली. अशासकीय कामकाजासाठी एकूण 150 मिनिटांचा वेळ उपलब्ध आहे. डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे एक, श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचे एक अशी एकूण दोन अशासकीय विधेयके पुर:स्थापनार्थ आहेत. यांना प्रत्येकी 5 मिनिटे वेळ देण्यात यावा व उर्वरित 140 मिनिटांचा वेळ अशासकीय ठरावांना खालीलप्रमाणे देण्यात यावा, अशी शिफारस समितीने केली आहे.

<u>अशासकीय विधेयके</u> :-

सन 2009 चे वि.प.वि.क्र.2 - डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. 5 मिनिटापेक्षा जास्त नाही.

सन 2009 चे वि.प.वि.क्र. 4 श्री. रामनाथ मोते, वि.प.स. 5 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

<u>बॅलटद्वारा ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार अशासकीय ठराव</u>

1. ठराव क्र. 34 - डॉ. नीलम गोऱ्हे, वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
2. ठराव क्र. 77 इ श्री. विक्रम काळे, वि.प.स. 40 मिनिटांपेक्षा जास्त नाही.
3. ठराव क्र. 86 इ श्री. अरुण गुजराथी,वि.प.स. 50 मिनिटांपेक्षा जास्त नाही.

यापैकी कोणत्याही ठरावांचा वेळ वाचल्यास तो त्यापुढील क्रमांकाच्या ठरावास देण्यात यावा अशीही शिफारस समितीने केली आहे.

सभापती : अशासकीय विधेयके व ठराव समितीचा अहवाल सभागृहास सादर झाला आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, अशासकीय विधेयके आणि ठराव समितीचा अहवाल सभागृहाला संमत आहे, असा मी आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ KGS/ MMP/

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "नवी मुंबई महानगरपालिकेने अतिक्रमण उठविण्यासाठी कोट्यवधी रुपयांचे काम एका खाजगी ठेकेदारास देऊन अतिक्रमण विरोधी पथकातील अधिकाऱ्यांनी ठेकेदारांशी हातमिळवणी करुन दहा ते बारा कोटी रुपयांचा गैरव्यवहार करणे" या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यांनी "राज्यातील शेकडो गटसचिवांना शासकीय सेवेत सामावून घेण्यासाठी तसेच त्यांच्या विविध मागण्याप्रित्यर्थ शासनाचे लक्ष वेधण्यासाठी सदर कर्मचारी दि. 25.5.2009 पासून संपावर असण्याबाबत" या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.गोपीकिसन बाजोरिया यांनी "संत ज्ञानेश्वर महाराज यांची जन्मभूमी सिध्दबेट या तीर्थक्षेत्राच्या विकासाकरिता राज्य शासनाने सुमारे 25 कोटी मंजूर करुनही अद्यापही विकास कामांना सुरुवात न होणे " या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

श्री. दिवाकर रावते : महोदय, प्रत्येक वेळेस हाच विषय सन्माननीय सदस्य श्री. गोपीकिसन बाजोरिया हे सभागृहात उपस्थित करीत असतात. परंतु अद्यापही यासंबंधीची कार्यवाही होत नाही.

सभापती : संबंधित मंत्री महोदयांकडून यासंबंधीची माहिती मी घेतो.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात गोवा व कर्नाटकातून हत्ती आले असून त्यांनी तेथील बागायतीचे नुकसान केल्याने सदर हत्तींना आवर घालण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत " या विषयाबाबत नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

हा विषय देखील वर्षातून दोन वेळा तरी सभागृहात येतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गो-हे यांनी "नागपूर जिल्हयातील कामठी शहरातील काही समाज कंटकांनी शहरातील खलाशी लाईन चौकातील तथागत गौतम बुध्दाची मूर्ती फोडून सदर मूर्तीची दि. 3.6.2009 वा त्या सुमारास विटंबना होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, भगवानराव साळुंखे यांनी "जिल्हास्तरावरील मुल्यांकन समितीने प्राथमिक शाळांमधील विनाअनुदानित तुकडयांना अनुदान देण्याबाबत शासनाकडे शिफारस करणे, तथापि शासनाने आपल्या मर्जीतील निवडक शाळांचे अनुदान दिल्याने पात्र शाळा अनुदानापासून वंचित असणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री प्रकाश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी यांनी "राज्यशासनाने राज्यातील गरीब व कष्टकरी माथाडी कामगारांचे वेतन हे माथाडी मंडळाच्या माध्यमातून होत असून सदर मंडळ कामगारांची भविष्य निर्वाहनिधी व ग्रॅच्युईटीची रक्कम कापून घेऊन सदर रक्कम बँकामध्ये गुंतविणे या रकमेचा सन 1992 मध्ये काही अधिका-यांनी अपहार करणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र. पाटील, कपिल पाटील यांनी "पेण येथील रहिवाशी व मयत कविता जोशी हिच्या वडिलांनी कविताने दि. 16 मे, 2009 रोजी आत्महत्या केली नसून तिचा खून करण्यात आल्याची तक्रार पोलिसांकडे केली असून सदर खूनाची चौकशी सीआयडी मार्फत करण्याची केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, नितीन गडकरी, मधुकर चव्हाण, चंद्रकात पाटील, संजय केळकर यांनी "अंधेरी परिसरातील मुंबई विमानतळ प्राधिकरणाच्या जागेवर राहणा-या सुमारे 80 हजार झोपडपट्टी धारकांचे पुनर्वसन विरार येथे करण्यात येत असून सदर झोपडपट्टी धारकांनी विमानतळ परिसरातच पुनर्वसन करण्याबाबत केलेली मागणी " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री मधुकर चव्हाण, विनोद तावडे, रामनाथ मोते यांनी "केंद्र शासनाने आदिवासी भागात मोफत धान्य वाटण्यासाठी धान्य खरेदीसाठी राज्यशासनाला कोटयावधी रुपयांचा निधी देण्यात येणे, सदर धान्य खरेदी घोटाळयात व्यापा-यांच्या मदतीने एनएससीएफ ने कोटयावधी रुपयांचा केलेला घोटाळा" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. व्ही.यू.डायगव्हाणे यांनी "सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफाशी जशाच्या तशा लागू कराव्यात यासाठी 25 व 26 मार्च, 2009 रोजी शासकीय कर्मचा-यांनी लेखणीबंद आंदोलन केले असून सदर शिफाशी केंद्राने ज्याप्रमाणे लागू केल्या त्याच प्रमाणे राज्यशासनाने लागू कराव्या, तसेच राज्यशासनाने लागू केलेल्या वेतन आयोगातील विविध पदांतील त्रुटी दूर करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ नीलम गो-हे यांनी "एस.डी.आय.एल. च्या सहकार्याने मुंबई विकास महानगर प्राधिकरणाने आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या वर्गासाठी सुमारे 43 हजार घरे विरार येथे बांधली असून सदर घरे दरमहा 800 ते 15000 रुपयांच्या भाडयाने महाराष्ट्रातील 15 वर्षे वास्तव्य असलेल्या लोकांना भाडयाने देण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती ....

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "राज्यात पॅरामेडीकल कोर्सचा अभ्यासक्रम शिकविण्यासाठी वैद्यकीय कौन्सिल नसणे, सदर अभ्यासक्रम बनावट शिक्षण संस्थाकडून शिकविला जाणे, सदर अभ्यासक्रमाची सुमारे 400 पदे मंजूर असून सदर पदांवर पात्र नसलेल्या उमेदवारांची निवड होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी माझ्या दालनातच अनुमती नाकारलेली आहे. नियम 93 ची काही निवेदन आलेली आहेत परंतु ही निवेदने आज न घेता ती उद्या घेण्यात येतील.

आता लक्षवेधी सूचना क्रमांक एक घेण्यात येईल.

श्री. अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचना पाच ही प्रथम घेण्यात यावी अशी विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. आता लक्षवेधी सूचना क्रमांक 5 प्रथम घेण्यात येईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : खुरीया घाटी आणि नावथा या प्रकल्पांच्या कामास अद्याप सुरुवात न होणे.

मु. शी. : खुरीया घाटी आणि नावथा या प्रकल्पांच्या कामास अद्याप सुरुवात न होणे यासंबंधी सर्वश्री अरुण गुजराथी, हेमंत टकले, प्रा. फौजीया खान, श्री. जितेंद्र आव्हाड, श्रीमती मधु जैन,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. अरुण गुजराथी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"जळगाव जिल्ह्यातील हतनुर प्रकल्पाचे काम २५ वर्षापूर्वी पूर्ण होऊनही हतनुर प्रकल्पासोबतच खुरीया घाटी आणि नावथा ह्या प्रकल्पांना मंजूरी मिळणे, उक्त प्रकल्पांना मंजूरी मिळूनही प्रकल्पाच्या कामास अद्याप सुरुवात न होणे, हतनुर प्रकल्पाची क्षमता प्रत्यक्षात ३८८ दक्ष लक्ष घन मीटर एवढी असून त्यांच्यात मावणारे पाणी फक्त २१४ दक्ष लक्ष घन मीटर एवढेच पाणी असणे, सदर धरणात गाळ मोठ्या प्रमाणावर झाल्याने पाणी साठवण्याची क्षमता कमी असणे त्यामुळे जळगाव जिल्ह्यातील विशेषत: यावल आणि चोपडा तालुक्यातील शेतकऱ्यांना पाण्याचा कमी पुरवठा होणे, आर्वतने देखील कमी मिळत असून चाऱ्यांमधून पाणी कमी दबाव असल्याने पुढे जात नसणे व त्यामुळे पाणी कमी मिळणे, परिणामी रब्बी व उन्हाळी हंगामातील पिकांना कमी प्रमाणात पाणी मिळून शेतमालाचे उत्पादन घटल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची भावना यासंदर्भात शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व उपाययोजना. "

श्री.अजित पवार (जलसंपदा मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, जळगाव जिल्हयातील हतनूर प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणावर गाळ साठल्यामुळे हा गाळ काढण्यात आला पाहिजे. जर हा गाळ काढण्यात आला तर या प्रकल्पातील पाणी अधिक क्षेत्राला मिळू शकेल. लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की, या प्रकल्पाचे सिचन क्षेत्र 37 हजार 838 हेक्टर्स आहे परंतु प्रत्यक्षात भिजणारे क्षेत्र 7 हजार 769 हेक्टर्स आहे. त्या भागातील शेती ज्या प्रमाणात भिजावयास पाहिजे होती त्या प्रमाणात भिजत नसल्यामुळे शेतक-यांमध्ये मोठया प्रमाणावर असंतोष निर्माण झाला आहे. त्या प्रकल्पातील गाळ तातडीने काढण्याची गरज आहे. तेव्हा ही कार्यवाही शासन त्वरित करणार आहे काय ? खारिया गुटीघाट प्रकल्पाच्या संदर्भात मला असे सांगावयाचे आहे की , गेल्या 25 वर्षापासून हा प्रकल्प होत नाही. निवेदनामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, "या प्रकल्पासाठी महाराष्ट्राचा हिस्सा 74 कोटी रुपये ,मध्य प्रदेशचा हिस्सा 65 कोटी आहे परंतु मेळघाट व्याघ्र अभयारण्यातील 244 हेक्टर्स क्षेत्र बाधित होत असल्यामुळे हा प्रकल्प होऊ शकत नाही." या प्रकल्पाला मंजुरी मिळून आता 25 वर्षे झालेली आहेत परंतु अजूनही हा प्रकल्प सुरु होत नाही तेव्हा हा प्रकल्प सुरु करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

श्री.अजित पवार : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला होता त्या प्रश्नाचे मी प्रथम उत्तर देतो. खारिया गुटीघाट प्रकल्पामध्ये आदिवासी शेतक-यांच्या जमिनी मोठया प्रमाणावर जात असल्यामुळे त्यांचासुध्दा या प्रकल्पाला विरोध होत आहे. त्याचबरोबर या प्रकल्पामुळे मेळघाट व्याघ्र अभयारण्यातील 244 हेक्टर्स क्षेत्र बाधित होणार आहे .सुप्रीम कोर्टाने या संदर्भात अत्यंत कडक शब्दात सागितलेले आहे. हा प्रकल्प व्हावा या दृष्टीने आमचा सातत्याने प्रयत्न सुरु आहे परंतु या प्रकल्पामध्ये मोठया प्रमाणावर वन जमीन बाधित होणार असून एकूण 57 गावे व 17 हजार 216 हेक्टर्स जमिनी पैकी 6071 हेक्टर्स वन जमीन जाणार आहे . त्यामुळे कितीही प्रयत्न केला तरी हा प्रकल्प होणे अत्यंत अडचणीचे आणि कठीण आहे. आता केन्द्रामध्ये स्थिर सरकार आलेले असल्यामुळे हा प्रकल्प होण्याकरता आम्ही पुन्हा प्रयत्न करु सन्माननीय सदस्य श्री. अरुण गुजराथी यांचीसुध्दा याकरता मदत घेऊ. परंतु तरीसुध्दा सन्माननीय सदस्यांना मला अत्यंत स्पष्टपणे सांगावयाचे आहे की, खरिया गुटीघाट हा महाराष्ट्र आणि मध्यप्रदेश या दोन राज्याचा आंतर राज्य प्रकल्प असून तो मंजूर होऊन 25 वर्षे झालेली आहेत. वन जमिनीच्या संदर्भात किंवा व्याघ्र अभयारण्याच्या संदर्भात सुरुवातीच्या काळात कायदे फारसे कडक नव्हते परंतु

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ...

नंतरच्या काळात कायदे कडक होत गेले त्यामुळे एखाद्या प्रकल्पामुळे अभयारण्याचे क्षेत्र बाधित होत असेल तर प्रकल्प होणे जवळपास दुरापास्त झालेले आहे. तो प्रकल्प होणे कठीण होऊन बसलेले आहे तरी सुध्दा हा प्रकल्प होणारच नाही असे म्हटल्यानंतर त्या भागातील लोकांच्या भावना दुखावल्या जातील म्हणून या प्रकल्पासाठी प्रयत्न चालू ठेवू असे शासनाला उत्तर द्यावे लागते . हतनूर प्रकल्पामध्ये गाळ खूप साठलेला आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले आहे. या प्रकल्पामध्ये गाळ साठलेला आहे ही वस्तुस्थिती खरी आहे. महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थेला जानेवारी 2007मध्ये या प्रकल्पातील गाळाचे सर्वेक्षण करण्यास सांगितले असून त्यांनी या सदर्भातील अहवाल दिला आहे . त्या भागातील वाढती लोकसंख्या आणि औद्योगिकरणामुळे या प्रकल्पातील पाण्याचे आरक्षण बिगर सिंचनाकरिता करावे लागते. त्यासाठी जवळजवळ 40 टक्के जलसाठा आरक्षित करण्यात आलेला आहे .शेतीच्या सिंचनाकरता राज्यामध्ये सगळीकडे मोठ मोठे प्रकल्प तयार केलेले असले तरी सुध्दा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ज्यावेळी निर्माण होतो त्यावेळी कोणीही राज्यकर्ते असले तरी त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी प्राधान्य द्यावे लागते. औद्योगिकरणामुळे तसेच वाढत्या लोकसंख्येमुळे तशाच प्रकारची स्थिती हतनूर प्रकल्पाच्या संदभात घडलेली आहे. यातून आम्ही असा मार्ग काढत आहोत की, भविष्य काळात दीपनगर औष्णिक विद्युत केन्द्राला हतनूर प्रकल्पातील पाणी देण्या ऐवजी वरणगाव - तळवेल उपसासिंचन योजना, ओझरखेडा या धरणातून पाणी देण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. तशा प्रकारे जर करण्यात आले तर तेवढी पाण्याची बचत होईल व ते पाणी सिंचनाकरिता शेतक-यांना उपलब्ध करुन देता येईल. त्याचबरोबर हतनूर धरणाच्या खालच्या बाजूला सव्वाचार टीएमसी क्षमतेचा शेळगाव प्रकल्प आणि साडे चौदा टीएमसीचा निम्न तापी प्रकल्प पूर्ण करण्यासंबंधी विभागाचे नियोजन आहे.

(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)

नंतर श्री.सुंबरे

अशुद्धीत प्रत / शुद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

वेगवेगळे साठे आणि उपसासिंचन प्रकल्पांमुळेदेखील हतनूर प्रकल्पावरील बिगर सिंचनाचा वापर कमी करण्याचा प्रयत्न आहे. त्यात आमच्यापुढे पाच उपसा सिंचन योजना आहेत. हतनूर प्रकल्पास पूर आणि गाळ यासाठी अतिरिक्त आम्ही 8 अतिरिक्त दरवाजे प्रस्तावित केलेले आहेत. हतनूर प्रकल्पाची उंची वाढविण्याच्या दृष्टीने देखील आम्ही प्रयत्न केला पण त्याच्या बुडित क्षेत्रात अतिशय चांगल्या प्रकारची अशी सुपीक जमीन मोठ्या प्रमाणत जात आहे आणि काठावर अगोदरच विस्थापित मोठी गावे आहेत. माझ्या माहितीप्रमाणे मुक्ताई नगरचा भाग देखील त्यात येतो. त्यामुळे या धरणाची उंची वाढविण्यास खूप मोठा विरोध होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आम्हाला हतनूर धरणाची उंची काही आम्हाला वाढविता येत नाही, येणार नाही. परंतु मी मघाशी सांगितल्या त्या तीन चार भविष्यकालीन अशा योजना आमच्या आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गुजराथी यांनी विचारले की, तुम्ही तो गाळ काढणार का ? पण आज कोठल्याही ठिकाणी गाळ काढण्याचे काम हे इतके खर्चिक होते की ते काम करणे अशक्य होऊन बसते. आम्ही मधल्या काळात महात्मा फुले जलभूमी अभियानाच्या निमित्ताने काही गाळ शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतीसाठी किंवा वीटभटट्यांसाठी म्हणून रॉयल्टी न देता घेऊन जाण्यास परवानगी दिली होती. पण हे धरण मोठे आहे आणि त्यातील गाळ काढणे मोठे अवघड काम आहे त्यामुळे हा गाळ काढता येणार नाही म्हणूनच आपण तेथे आता आठ अतिरिक्त दरवाजे प्रस्तावित केले आहेत. हे दरवाजे बसविण्यात आल्यानंतर जेव्हा पावसाळ्यास सुरूवात होते त्यावेळी गढूळ पाणी होते तेव्हा ते दरवाजे वर घ्यायचे आणि तो गाळ खाली न्यायचा अशी आमची योजना आहे. कारण हा जो हतनूर प्रकल्प आहे तेथे भौगोलिकदृष्ट्या त्याच्या वरच्या बाजूला मागील काळात बरेच वर्षे एकही धरण नव्हते. आता मात्र वरच्या भागामध्ये बुलढाणा जिल्ह्यात जीगाव धरण आमचे प्रस्तावित आहे. त्या धरणामुळे देखील काही प्रमाणात आता हतनूर धरणात गाळ कमी येण्याची शक्यता आहे. तसेच तापी डायव्हर्शनर प्रकल्प देखील आम्ही वरच्या भागात करीत आहोत. तो झाल्यानंतर देखील, आता ज्याप्रमाणे वर कोठलेच प्रकल्प नसल्याने परिसरातील सगळा गाळ हातनूर धरणामध्ये यायचा. पण आता वरच्या बाजूला मी आताच सांगितल्याप्रमाणे इतर छोटे मोठे प्रकल्प होत असल्याने तशी परिस्थिती राहणार नाही. मात्र पहिला आलेला जो गाळ या धरणामध्ये तो मृतसाठ्यामध्ये 81 टक्के गाळ आहे आणि जीवंत साठ्यात जवळपास 37 टक्के गाळ आहे. तो दूर करण्यासाठी

..... डीडी 2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार ....

भविष्यकालीन ज्या आमच्या योजना आहेत त्या मी आताच सभागृहाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, नामदार मंत्र्यांनी येथे अगदी विस्तृत असे उत्तर दिले आहे. गाळ काढणे हा विषय निश्चितपणे खर्चिक असा आहे हे मलाही मान्य आहे. पण केव्हा तरी तुम्हाला ही उपाय योजना करावीच लागणार आहे. वरच्या बाजूला बुलढाणा जिल्ह्यात आपण एक धरण बांधणार आहोत म्हणून तेथून येणार गाळ थांबेल असे म्हटले तरी देखील येथील जो कॅचमेंट एरिया आहे त्याचा गाळ येतच राहणार आहे, तो गाळ या हतनूर धरणात साठणार आहे. म्हणूनच या बाबत आपल्याला काही वेगळा असा विचार आज नाही उद्या केव्हा तरी केलाच पाहिजे. आता आपण तेथे आणखीन 4-5 दरवाजे काढत आहात. पण त्या दरवाजातून जे पाणी येईल ते काही खालचा गाळ उचलणार नाही. त्यात किती जोराचा प्रवाह असेल त्यावर ते सारे अवलंबून राहील. त्या दरम्यान गाळ काढण्याच्या बाबतीत शास्त्रीयदृष्ट्या काही करता येईल काय जेणे करून मुळात कॅचमेंट एरियातून आलेल्या पावसाचे जोरदार पाणी आणि ते खालच्या बाजूला उसळले आणि त्याचवेळी आपण गेटस् ओपन केली तर कदाचित तो गाळ वाहून जाईल. अन्यथा धरणातील गाळ कमी करणे यावर खरोखरी काही तरी संशोधन, विचार होणे गरजेचे आहे. अनेक मोठ्या धरणाच्या बाबतीत हा प्रश्न मोठ्या प्रमाणात भेडसावतो आहे. आता याही धरणात या गाळामुळे मृतसाठा वाढला, तो कमी झाला असे आपण म्हटले तरी तेथे गाळ वाढल्याने प्रश्न आणखी वाढणारच आहे. म्हणून या संदर्भात केव्हा तरी एकदा, मला वाटते की, याबाबत परदेशात देखील विचार होतो आहे. तेव्हा आपण देखील याबाबतीत एखादी समिती नेमून, केवळ या हतनूर धरणाच्या बाबतीतच नव्हे तर राज्यातील सगळ्याच धरणांतील गाळ वाढतो आहे. आपल्या जायकवाडी, उजनी धरणांच्या बाबतीत देखील हेच घडते आहे. म्हणून यासाठी आपण एखादी तज्ज्ञांची समिती नेमून हा गाळ कमी खर्चामध्ये तेथून कसा काढता येईल यासाठी प्रयत्न कराल का?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, गाळ काढणे आवश्यक असले तरी सद्य:स्थितीत गाळ काढणे ही गोष्ट अजिबात व्यवहार्य नाही. त्याबद्दल खूपदा आमची चर्चा एकत्रितपणे झालेली आहे. मधल्या काळात अतिवृष्टी झाली किंवा डॅम सेफ्टीच्या संदर्भात देखील विचार झाले. याबाबत

..... डीडी 3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार ...

'मेरी'ला देखील आपण अभ्यास करण्यास सांगितले होते. पण त्यांच्याकडून जे काही पुढे आले त्यावरून ही गोष्ट व्यवहार्य नाही हेच दिसून आले. परंतु सन्माननीय सदस्यांना मी सांगू इच्छितो की, हा प्रश्न बाकीच्या इतर राज्यांमध्येच नव्हे तर परदेशामध्ये देखील मोठा आहे आणि तेथे देखील याबाबत विचार चालू आहे. तेव्हा जे प्रगत देश आहेत तेथे जी मोठी धरणे आहेत त्या ठिकाणी त्यातील गाळ काढण्यासाठी ते लोक काय पद्धत अवलंबितात ....

(यानंतर श्री. सरफरे ..... इइ 1 ..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार...

त्याठिकाणी मोठया प्रमाणात गाळ साचल्यानंतर तो काढण्याबाबत नवीन तंत्रज्ञान विकसित झाले आहे, काय याचा पुन्हा एकदा आढावा घेऊन अभ्यास करण्यात येईल. नवीन तंत्रज्ञानाचा वापर इ ाल्यामुळे आता गाळ काढणे अजिबात व्यवहार्य वाटत नसले तरी ते थोडेसे सुलभ होईल काय ? यादृष्टीने प्रयत्न केला जाईल.

श्री. दिलीपराव सोनावणे : सभापती महोदय, मंत्रिमहोदयांनी याठिकाणी विस्तृत असे उत्तर दिले. परिस्थिती अशी आहे की, यावल आणि चोपडा तालुक्यामध्ये पोटचाऱ्या असल्या तरी गाळ साचल्यामुळे व पाण्याचा साठा कमी झाल्यामुळे शेवटच्या भागामध्ये आणि पाटामध्ये अतिशय कमी दाबाने पाणी येत आहे. त्यामुळे निवेदनामध्ये आम्ही जलसिंचन प्रणालीची पुर्नस्थापन केली आहे असे सांगितले असले आणि त्यासाठी 200 कोटी रुपयांच्या खर्चाचे नियोजन जरी केले असले तरी पाणी येऊ शकत नसेल तर तो खर्च करुन उपयोग काय? सभापती महोदय, मी मंत्रिमहोदयांना सांगू इच्छितो की, प्रामुख्याने हा गाळ पूर्णा नदीमधून येत आहे. तो गाळ मोठया प्रमाणात साचल्यामुळे त्या धरणाची पाणी साठविण्याची क्षमता नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी कोणती तरी ठोस उपाय योजना करुन हा गाळ आपण काढला पाहिजे. नाहीतर एवढा खर्च करुन काहीही काम होणार नाही ही वस्तुस्थिती आहे. त्याठिकाणी जास्त पाणी कसे येईल आणि शेतकऱ्यांना जास्त दाबाने पाणी कसे मिळेल यासाठी तंत्रशुध्द पध्दतीने उपाय योजना करणार काय?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पूर्णा नदीमधून गाळ येत असला तरी पूर्णा नदीवर एक धरण आहे आणि खाली जिगाव धरण आहे. या जिगाव धरणाचे काम सुरु असून ते अंतिम टप्प्यामध्ये आले आहे. त्यामुळे तिथून येणारा गाळ या पुढील काळात कमी होईल. हा गाळ साचला जाऊ नये यासाठी माननीय सदस्य श्री. गुजराथी साहेबांनी जो प्रश्न उपस्थित केला त्याला उत्तर दिले आहे. सभापती महोदय, खूप चांगली सुपिक जमीन बुडत असल्यामुळे धरणाची उंची वाढविण्यासाठी शेतकऱ्यांचा मोठा विरोध आहे. त्याठिकाणी पाणी कमी असलेतरी सुध्दा चाऱ्या, पोटचाऱ्या दुरुस्त करुन उपलब्ध पाण्याचा काटकसरीने वापर शेतकऱ्यांना करता यावा म्हणून जल क्षेत्र सुधार कार्यक्रम हाती घेतला आहे. या कार्यक्रमाव्दारे चोपडा व यावल तालुक्यामध्ये कालवा वितरीका पुर्नस्थापनाच्या निविदा निश्चितीची कारवाई जवळपास पूर्ण झाली आहे. त्याठिकाणी आपण पाणी वापर संस्था स्थापन केल्या आहेत. ठिबक सिंचनच्या नवीन पध्दतीचा वापर करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MMP/

श्री. अजित पवार....

उपलब्ध असलेले पाणी काटकसरीने कसे वापरता येईल व त्यामधून जास्तीत जास्त क्षेत्र सिंचनाखाली कसे आणता येईल यासाठी प्रयत्न चालू आहे. दुसरी गोष्ट सांगितली पाहिजे की, ओझरखेडा धरणातून दिपनगर औष्णिक विद्युत केंद्राला पाणी देण्याचे नियोजन केले आहे. ते झाल्यानंतर हातनूरचे पाणी कमी होईल. अशाप्रकारची भविष्यकालीन उपाय योजना सभागृहात सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

श्री. अरुण गुजराथी : सभापती महोदय, खारिया गुटीघाट धरणाची उंची कमी करणे व्यवहार्य होऊ शकेल काय? नावथाचे बॅरेज आपण करु शकलो नाही. त्या माध्यमातून पाणी साठा वाढेल काय? मंत्रिमहोदयांनी सांगितले आहे की, जिगाव प्रकल्पाचे काम सुरु आहे. सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाल्यानंतर त्याचा लाभ किती प्रमाणात हातनूर धरणाला मिळेल? त्याव्दारे यावल आणि चोपडयाच्या शेतकऱ्यांसाठी किती जास्त पाणी साठा उपलब्ध होऊ शकेल?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, खारिया गुटीघाट या प्रकल्पाची उंची कमी करण्याच्या बाबतीत सांगावयाचे झाले तर हा मध्यप्रदेश व महाराष्ट्र या दोन राज्यांचा आंतरराज्य प्रकल्प आहे. त्यामुळे याबाबत एकटया महाराष्ट्राने कोणताही निर्णय घेऊन चालणार नाही. त्यासाठी आपल्याला मध्य प्रदेश राज्याबरोबर चर्चा करावी लागेल. त्या ठिकाणी किती पाणी उपलब्ध आहे हे तपासून पहावे लागेल. शेवटी कोणताही प्रकल्प घेत असतांना वन जमीन, व्याघ्र प्रकल्प आणि अभयारण्याचे सुध्दा प्रश्न उपस्थित होतात. सभापती महोदय, नावथा बंधारा आणि हातनूर बंधाऱ्याच्या पिक अप वेअरचे काम प्रस्तावित होते, त्यापैकी हातनूर प्रकल्पाचे काम आपण केले आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी नावथा बंधाऱ्याच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केला असून या संदर्भातील बाब पुन्हा तपासून घेण्यात येईल आणि त्यातून योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल, पण ते व्यवहार्य असेल तर.

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शेकडो पदे रिक्त असणे

मु. शी. : राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील शेकडो पदे रिक्त असणे यासंबंधी डॉ.दीपक सावंत सर्वश्री दिवाकर रावते,अरविंद सावंत,डॉ.नीलम गोऱ्हे, ॲड.अनिल परब,सर्वश्री.किरण पावसकर,परशुराम उपरकर,गोपीकिसन बाजोरिया,किशनचंद तनवाणी वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील वैद्यकीय प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, अध्यापक,अधिव्याख्याता,आदि शेकडो पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्यामुळे,शासकीय महाविद्यालयातील वैद्यकीय शिक्षणाचा दर्जा खालावणे,सदर पदे तातडीने भरण्याबाबत राज्य शासनाने दाखविलेली अक्षम्य दिरंगाई,शासकीय महाविद्यालयांमध्ये विशेष तज्ज्ञ प्राध्यापकांची पदे रिक्त असल्याने वैद्यकीय विषयांचे ज्ञान विद्यार्थ्यांना न मिळणे,लोकसेवा आयोगाच्या कक्षेतील अधिव्याख्यात्यांची,सहयोगी प्राध्यापकांची व प्राध्यापकांची व शासकीय दंत महाविद्यालयातील प्राध्यापक आदि पदे भरण्यासाठी आयोगाच्या कार्यपध्दतीमुळे विलंब होणे, रिक्त पदे भरली न गेल्याने शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांतील व शासकीय दंत महाविद्यालयातील शिक्षणाचा दर्जा खालावला असणे,याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी जनतेत पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची लाट, याप्रकरणी शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.राजेश टोपे (वैद्यकीय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

. . . .2 एफ-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना अतिशय महत्वाची आहे. राज्य शासनाने लक्षवेधी सूचनेच्या निवेदनामध्ये जे उत्तर दिलेले आहे,त्याबाबत सांगावयाचे तर येथे वैद्यकीय शिक्षण संचालनालयाने अतिशय गोल-गोल अशा प्रकारचे उत्तर दिलेले आहे.परंतु या ठिकाणी जे उत्तर दिलेले आहे,ते लक्षात घेतले तरी देखील आज प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापकांच्या, अधिव्याख्याता यांची पदे रिक्त आहेत. प्राध्यापकांच्या 55 जागा, सहयोगी प्राध्यापकांच्या 217 आणि अधिव्याख्याता यांच्या 273 यांच्या जागा रिक्त आहेत.तसेच अध्यापकांच्या 34 आणि सहयोगी प्राध्यापकांच्या 30 जागा पदोन्नतीने भरावयाच्या आहेत. परंतु त्या देखील रिक्त आहेत. कदाचित यांच्याकडे या जागा पदोन्नतीने भरण्यासाठी योग्य उमेदवार नसावेत. त्यामुळे एम.एस.आणि एम.डी.च्या म्हणजे पदव्युत्तर पदवीच्या सीटस् गेल्या वर्षी कमी झाल्या होत्या, या सर्वाचा यावर परिणाम झालेला आहे. पूर्वी याच सदनामध्ये या विषयासंबंधात फार मोठी चर्चा झाली होती आणि राज्य शासनाला एम.सी.आय.च्या नियमाप्रमाणे प्रोफेसरच्या सीट भरण्यासाठी, कारण यामध्ये 1:1 असे प्रमाण आहे.1 प्रोफेसर आणि 1 विद्यार्थी आणि त्यांच्यासाठी काय पाहिजे तर 1 प्रोफेसर, 1 सहयोगी प्रोफेसर आणि एक टयुटर पाहिजे. परंतु हे प्रमाण मेन्टेन करण्यामध्ये हे सरकार फेल झालेले आहे.त्यामुळे गेल्या वर्षी 242 जागा कमी झालेल्या आहेत. त्यामध्ये विशेष काही भर पडणार नाही असे या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात जे निवेदन दिलेले आहे, त्यावरुन दिसते. सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, आपण जे सेवा रुल्स् बनविले आहेत त्यानुसार आपण 50:50 टक्के पदे भरली जातात.महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे नामनिर्देशना- व्दारे आणि पदोन्नतीने ही पदे भरली जातात. तेव्हा अशा प्रकारे 50:50 टक्के पदे भरत असताना आपण सेवा रुल्स् मध्ये रिलॅक्सेशन का करीत नाही ? तसेच या सर्व जागा भरत असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परव्ह्यु मधून या जागा का काढून घेतल्या जात नाहीत. हा माझा पहिला प्रश्न आहे. यासंदर्भात पूर्वी आश्वासन देण्यात आले होते. आपण ही बाब कॅबिनेट समोर आणली होती. तेव्हा माझा पहिला प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परव्ह्यु मधून या जागा काढून घेणे अजूनपर्यंत आपल्याला का शक्य झालेले नाही ? कारण त्यांना याबाबतीत काही चिंता नाही. आपण मागणी पत्र पाठवित असतो आणि तसे ते पाठविले असल्याचे या निवेदनामध्ये देखील म्हटलेले आहे असे मला वाटते.

उपसभापती : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी प्रश्न विचारावा.

. . . .2 एफ-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पहिला प्रश्न असा आहे की, या सर्व जागा भरत असताना महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परव्ह्यू मधून या जागा का काढून घेतल्या जात नाहीत ? तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, मागणी पत्र कोणत्या तारखेला पाठविले आहे ? यामध्ये शासन दुसरे गिमीक करीत आहे की, 295 मानदसेवी अध्यापक नेमून हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु या सर्व गोष्टींनी आपला प्रश्न सुटणार आहे काय ? त्याचप्रमाणे गेल्या वर्षी रद्द झालेल्या किती जागा शिल्लक राहिलेल्या आहेत ? म्हणजेच तुम्हाला किती जागा रिस्टोअर करण्यामध्ये यश मिळालेले आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय,सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले की, 241 जागा कमी झालेल्या आहेत.परंतु अशा कोणत्याही जागा कमी झालेल्या नाहीत. ज्या जागा रिक्त आहेत, त्यामुळे पी.जी.च्या काही सीटस् कमी झालेल्या आहेत अशातला भाग नाही.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, पोस्ट ग्रॅज्युएशनच्या सीट बाबत बोलत आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी पोस्ट ग्रॅज्युएशनच्या सीट बाबतच बोलत आहे. एम.डी.,एम.एस.च्या सीटस् कमी झालेल्या नाहीत. हा प्रश्न गंभीर आहे.सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत . . . .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.मेडिकल कौन्सिल ऑफ इंडियाचा असा नियम आहे की, जोपर्यंत ठराविक विषयाचे शिक्षक, प्रोफेसर, असिस्टंट प्रोफेसर, ट्युटर जोपर्यंत तेथे नसतात, तोपर्यंत आपल्या एम.डी. आणि एम.एस.च्या सीटला एम.सी.आ मान्यता देत नाही. हा एक क्रायटेरिया आहे. दुसरा क्रायटेरिया हा तेथील उपकरणे, बाकीचा स्टाफ, स्पेस आणि निधी असे एम.सी.आय.चे चार-पाच क्रायटेरिया आहेत. तर हा क्रायटेरिया यामध्ये बसू शकत नाही काय ? माननीय मंत्री महोदय, मी आपल्याला आकडेवारी देऊ इच्छितो. त्यानुसार आपल्याकडे रेडिऑलॉजीच्या 43 जागा होत्या, त्या गेल्या वर्षी 16 झाल्या, गायनॅकच्या 86 जागा होत्या, त्या 55 झाल्या, पीडिॲट्रीक्स्च्या 57 जागा होत्या, त्या 30 झाल्या, मेडिसीनमध्ये 53 जागा होत्या, त्या 34 झाल्या. अशा प्रकारे या जागा कमी झाल्या. आपल्याकडे प्रोफेसर नाही, लेक्चरर नाही. असे असताना आपल्याकडे याचा परिणाम झाला नाही काय ? दुसरीकडे इतक्या जागा रिक्त आहेत.

यानंतर कु.थोरात . . . .

अशुद्धीत प्रत / परिपृच्छेसाठी नाही

श्री. राजेश टोपे :पोस्ट ग्रुज्युएशनची पदे दिली जातात किंवा पोस्ट ग्रॅज्युएशनच्या सीट्स दिल्या जातात, त्याबाबतीत सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांचे म्हणणे बरोबर आहे. पोस्ट ग्रुज्युएशन्सच्या सीट्स हया नंबर ऑफ पी. जी.टिचर्स आणि इक्विपमेन्ट्सच्या आधारावर देण्यात येतात. ज्या इन्स्टिटयुटला ज्या पी.जी.सीट्स ॲलॉट झालेल्या आहेत, त्या कमी झालेल्या नाहीत. किंबहुना(अडथळा) माझे उत्तर प्रथम ऐकून घ्यावे. सन्माननीय सदस्यांना माझा स्वभाव माहीत आहे. मी सकारात्मकच काम करतो. हा गंभीर प्रश्न आहे याची मला जाणीव आहे. हा प्रश्न शासन कशा प्रकारे सोडविण्याचा प्रयत्न करीत आहे यासंदर्भात मी सभागृहाला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी सांगितले की, पी.जी.च्या सीट्स कमी झालेल्या आहेत पण त्या सीट्स तशा कमी झालेल्या नाहीत. सर्वसधारणपणे आज जवळ जवळ 4400 डॉक्टर्स दरवर्षी बाहेर पडतात त्यापैकी पी.जी. किती करु शकतात? आज आपल्या राज्यातील प्रायव्हेट कॉलेज्स आणि शासकीय महाविद्यालयातील मिळून पी.जी.च्या 1600 सीट्स आहेत. उलट पी.जी. करण्याची इच्छा असताना सुध्दा पी.जी. करता येत नाही अशी परिस्थिती आहे. याचे एक कारण पूर्वी एका पी.जी.टिचरकडे दोन पी.जी. स्टुडंन्ट असे एक प्रमाण होते. ते 1:1 असे झाले. राज्य शासनाचा सुध्दा याबाबतीत आग्रह आहे की, याबाबतीत पूर्वी जे प्रमाण होते तेच कायम ठेवण्यात यावे जेणेकरुन 1600 पी.जी.स्टुडंन्ट ऐवजी 3200 पी.जी. स्टुडंन्ट बाहेर पडू शकतील. यासंदर्भात एम.सी.आय सुध्दा विचार करीत आहे. आणि मला पूर्ण आशा आहे की, 1:2, एक पी.जी. टिचर आणि दोन पी.जी. स्टुडंन्ट असे प्रमाण झाले तर निश्चित प्रकारे अनेक पी.जी. होण्याच्या संदर्भातील प्रश्न मार्ग लागेल. एम.पी.एस.सी.च्या पव्हर्यू मधून जागा काढून घेण्यात याव्यात किंवा एम.पी.एस.च्या पव्हर्यूमधून शासकीय महाविद्यालयातील जी अधियाख्याताची पदे भरली जातात किंवा असोशिएट प्रोफेसर्सची पदे भरली जातात, प्रोफेसर्सची पदे भरली जातात ती पव्हर्यू मधून काढून घेण्यात यावीत, अशा पध्दतीचा दुसरा प्रश्न सन्माननीय सदस्य डॉ. सावंत यांनी याठिकाणी उपस्थित केला आहे. तसेच रिक्त जागांच्या संदर्भातील मागणीपत्र देण्याची त्यांनी मागणी केली आहे. या संदर्भातील वेगवेगळया तारखांची मागणीपत्रे माझ्याकडे आहेत. मी याबाबतीत एवढेच सांगने की, याबाबतीतील लेटेस्ट माहिती अशी आहे की, प्राध्यापकांच्या 43 पदांचे मागणीपत्र दि. 6-2-2009 ला पाठविण्यात आलेले आहे. सहयोगी प्राध्यापकांची 104 पदे भरण्याच्या दृष्टीकोनातून

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KGS/ MMP/

श्री. राजेश टोपे....

सन 2009 ला म्हणजे याच वर्षी हे मागणीपत्र पाठविलेले आहे. अधिव्याख्यात्यांची 25 पदे भरण्यासंबंधीचे मागणीपत्र सन 2009 ला पाठविलेले आहे. त्यामुळे ज्या रिक्त जागा आहेत व ज्या एम.पी.एस.सी. च्या पव्हर्यूमध्ये आहेत. त्या जागा भरण्यासंबंधिचे मागणीपत्र शासनाने पाठविलेले आहे. मी माझ्या सचिवांना पाठवून आणि मी स्वत: व्यक्तिगत एम.पी.एस.सी.च्या अध्यक्षांना भेटून त्यांना विनंती केलेली आहे की, हा विषय आरोग्य आणि शिक्षण या दोन्हीशी संबंधित आहे. त्यामुळे याबाबत अगदी "फास्टट्रॅक्ट कोर्ट" जसे असते त्या पध्दतीने याला कुठल्याही परिस्थिती प्राधान्य देऊन या जागा भरण्यात याव्यात. त्यामुळे एम.पी.एस.सी.ने जाणीवपूर्वक वैद्यकीय शिक्षण किंवा या विभागातील जागा भरण्याच्या संदर्भात वेगवेगळे सेल तयार केलेले आहेत. या जागा भरण्याच्या संदर्भात एम.पी.एस.सी.ने जी खात्री दिलेली आहे त्या खात्री नुसार येणाऱ्या सहा महिन्याच्या आत या सर्व जागा भरल्या जाणार आहेत.

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, वैद्याकीय महाविद्यालय आणि दंतमहाविद्यालयामध्ये प्राध्यापक, असिस्टंट प्रध्यापक, लेक्चरर यांची कमतरता जरुर आहे. त्यावर मार्ग काढण्याच्या बाबतीत एम.सी.आय.ने निर्णय घेतला आहे. पूर्वी 1:2, 2:3 असे जे प्रमाण होते ते आता 1:1, 2:3 असे केलेले आहे. म्हणजे एक प्रोफेसर, एक असिस्टंट प्रोफेसर,दोन लेक्चरर आणि तीन टयुटर या प्रमाणात ही पदे त्या विभागात असयला पाहिजेत. पूर्वी दोन असिस्टंट प्रोफेसर कंम्पलसरी होते आता ते एक केलेले आहेत. त्याचबरोबर पोस्टग्रॅज्युएट स्टुडंन्टसाठी एम.सी.आय.ने जर प्रोफेसर पोस्टग्रॅज्युएट टिचर असेल तर त्याला दोन विर्थ्यांना गाईड करण्याची परवानगी दिलेली आहे. त्यासंबंधिचा जी.आर. निघायचे बाकी आहे. एम.सी.आय.ने हा ठराव मंजूर केलेला आहे.

यानंतर श्री. बरवड....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. वसंत पवार .....

माझा माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, खाजगी महाविद्यालयामध्ये जास्त आकर्षक वेतनश्रेणी असल्यामुळे आणि त्यांना काही बंधन नसल्यामुळे त्या ठिकाणी बरेचशे शासकीय प्राध्यापक व्हीआरएस घेऊन प्रायव्हेटमध्ये जात आहेत. म्हणून त्यांना रिटेन करण्यासाठी त्यांचे जे सिलेक्शन ग्रेड आहे किंवा जी वरची श्रेणी आहे ती त्यांना देऊन, त्यांना खास पाच इंक्रिमेंट्स दिले तर शासकीय अध्यापन करणारे प्राध्यापक हे शासनाच्या नोकरीमध्येच राहतील, अन्यथा काही दिवसांनी ते सर्वजण प्रायव्हेटमध्ये जातील. म्हणून हे शासन या सर्व असोसिएट प्राध्यापक, प्राध्यापक यांना अशी विशेष श्रेणी देण्याचा विचार करीत आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, वैद्यकीय महाविद्यालयांमधील जे शिक्षक किंवा असोसिएट प्रोफेसर्स, प्रोफेसर्स आणि अधिव्याख्याते आहेत त्यांना रिटेन करण्याच्या दृष्टीने किंवा त्यांना येथेच ठेवण्याच्या दृष्टीने निश्चितपणे काही महत्वाची पावले उचलणे आवश्यक आहे. मी सांगू इच्छितो की, अनेक वर्षापासून काही जे अधिव्याख्याते ॲडहॉक पध्दतीवर होते त्यांना नियमित केले जात नव्हते पण मला अभिमानाने सांगितले पाहिजे की, आघाडी सरकारने ही 327 पदे नियमित केलेली आहेत आणि त्यामुळे सुध्दा डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटी होऊन जे अधिव्याख्याते वर्षानुवर्षे अधिव्याख्यातेच होते ते आता त्याच्या सर्व्हिसेसच्या नियमाप्रमाणे काही असोसिएट प्रोफेसर झाले, काही प्रोफेसर झाले त्यामुळे त्यांना निश्चितपणे एक प्रकारचे समाधान आहे. त्याचप्रमाणे विशेष श्रेणी देण्याच्या संदर्भात कर्नाटक सरकारने कर्नाटक पॅटर्न लागू केलेला आहे. त्यांच्या काही विशेष इन्स्टिट्यूटमध्ये त्यांना रिटेन करण्याच्या दृष्टीकोनातून फार मोठी वेतनश्रेणी ठेवलेली आहे. म्हणून यासंदर्भात एक विशेष श्रेणी किंवा वेतनश्रेणी किंवा इन्क्रिमेंट वाढवून देण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी जी सूचना केलेली आहे ती निश्चितपणे स्वागतार्ह आहे. त्याबद्दल विचार करण्यात येईल्.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य डॉ. वसंत पवार यांचे मी स्वागत करतो की, त्यांनी माझ्या मनातील प्रश्न विचारला. अंदाज समितीच्या बैठकीतील चर्चेमध्ये असे सातत्याने लक्षात येते की, वेतनश्रेणी मिळत नाही म्हणून डॉक्टर्स येत नाहीत. अत्यंत कमी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत .....

पगार असल्यामुळे बरेच डॉक्टर्स शासकीय नोकरीमध्ये येण्यास तयार नाहीत. अनेक ग्रामीण रुग्णालयांमध्ये डॉक्टर्स नाहीत. आपण हे प्रश्न सातत्याने मांडत असतो. सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी या निमित्ताने त्यांचा प्रश्न उपस्थित केला. पी.जी.च्या जेवढ्या जागा होत्या तेवढ्या जागा आहेत असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. माझा प्रश्न असा आहे की, गेल्या वर्षी रेडिऑलॉजीमध्ये 43 जागा होत्या त्या 16 झाल्या. गायनॅकच्या 86 जागा होत्या त्या 55 झाल्या. त्याची कारणे काय आहेत ? ज्या जागा होत्या त्या कमी झालेल नाहीत असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले. मग गेल्यावर्षी रेडिऑलॉजी, गायनॅक, मेडिसिन, पेडियॉट्रिक, अनेस्थेटिस्ट यामध्ये 15, 55, 30, 34, 73 अशा प्रकारे जागा कमी का झाल्या ? आपण सांगितले की, जागा कमी झालेल्या नाहीत. मग रेडिऑलॉजीमध्ये पी.जी. च्या 43 जागा होत्या त्या 16 का झाल्या ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, जी वैद्यकीय महाविद्यालये आहेत त्या ठिकाणी पी.जी. च्या जेवढ्या जागा एम.सी.आय.ने मंजूर केलेल्या होत्या त्यामध्ये कोणत्याही विषयाची एकही जागा कमी झालेली नाही.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदय पुन्हा पुन्हा सांगत आहेत की, जागा कमी झालेल्या नाहीत. गेल्या वर्षी या सभागृहामध्ये या विषयावर अडीच तास चर्चा झाली. माननीय मंत्रिमहोदय प्रकरण ट्विस्ट करीत आहेत. आपण सांगितले की, एखादा मुलगा महाराष्ट्रामध्ये पास झालेला असेल तर तो महाराष्ट्रामध्ये प्रॅक्टीस करण्यासाठी लायक आहे आणि महाराष्ट्राबाहेर जाऊन प्रॅक्टीस करण्यासाठी लायक नाही. त्याला एमसीआयची परवानगी लागते. त्या मुलांना एमसीआयचे रजिस्ट्रेशन मिळत नाही. हे सांगण्याचा आमचा उद्देश आहे.....

डॉ. वसंत पवार : मागच्या वेळी तसे होते. आता शासनाने ते रेक्टीफाय केलेले आहे. आता इन्स्पेक्शन झाले आहे आणि एमसीआयने मान्यता दिलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सन्माननीय सदस्य डॉ.वसंतराव पवार हे एम.सी.आय.वर निवडून गेलेले आहेत हे मला माहीत आहे. परंतु सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलच्या अनुषंगाने माझा प्रश्न प्रश्न आहे. या निवेदनात असे म्हटले आहे की, "वैद्यकीय क्षेत्रातील अतिविशेषोपचार विषयातील पदे देखील पुरेशा प्रमाणात पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्याने रिक्त राहतात, तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियुक्ती होऊन व पदोन्नती समितीमार्फत पदोन्नती मिळून केवळ इच्छित स्थळी नियुक्ती न मिळाल्यामुळे देखील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अध्यापकांची पदे काही प्रमाणात रिक्त राहतात. अतिविशेषोपचार म्हणजे डी.एम.कार्डिऑलॉजी असेल, एम.सी.एच.असेल, हे कोर्सेस देखील बंद झालेले आहेत. यासंबंधी शासनाने काय उपाय योजले आहेत ? एम.सी.आय.चा नियम असा आहे की, जर तो डी.एम.कार्डिऑलॉजी असेल तर त्याला डी.एम.साठी प्रवेश मिळेल. अशाप्रकारे ब-याच महाविद्यालयांमध्ये हया जागा कमी झालेल्या आहेत, हे तरी शासन मान्य करणार आहे काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या निवेदनामध्ये पदे रिक्त राहण्याबाबत सविस्तरपणे उत्तर दिलेले आहे. यात प्रामुख्याने 2-3 गोष्टी आहेत. एक म्हणजे एस.टी.संवर्गाच्या ज्या काही जागा असतात, त्या विशिष्ट विषयाच्या जागांसाठी उमेदवार मिळाले नाही तर सा.प्र.विभागाच्या नियमानुसार त्या जागा रिक्त ठेवाव्या लागतात. त्यांच्या नियमानुसार सलग 5 वर्षे किंवा 3 वर्षे जाहिरात दिल्यानंतरही उमेदवार मिळाले नाही तर टप्प्याटप्प्याने खुल्या प्रवर्गात वर्ग करता येतात. दुसरे असे की, चॉईस पोस्टिंग हे एक कारण आहे. या लोकांना पाहिजे तेथे पोस्टिंग नाही मिळाली नाही तरी खाजगी ठिकाणी जाण्याचा त्यांच्यासमोर ऑप्शन ओपन आहे. त्यामुळे ते खाजगी वैद्यकीय महाविद्यायांमध्ये जातात. त्यांना त्याठिकाणी चांगला पगार मिळत असल्यामुळे तेथे ते आकर्षित होतात. सुपरस्पेशॅलिटीमध्ये न्यूरोसर्जरी, गॅस्ट्रोएन्ट्रोलॉजी, न्यूरोलॉजी, एन्डोक्रायनॉलॉजीचा समावेश आहे, या विषयाचे डी.एम. किंवा एम.सी.एच. ही पदे सर्जरी व मेडिसिनच्या दृष्टीकोनातून उपलब्ध होत नाहीत. त्यामुळे या विषयाच्या जागा रिक्त रहात आहेत. या विषयाचे लेक्चरर्स उपलब्ध होत

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे....

नसल्यामुळे या जागा रिक्त असल्याचे निवेदनतही मान्य केलेले आहे. या जागा भरण्याच्या संदर्भात सन्माननीय सदस्य डॉ.पवार यांनी सांगितल्याप्रमाणे त्यांना काही आकर्षित वेतनश्रेणी वा वेतनवाढी देण्याची आवश्यकता आहे. अशा काही गोष्टींसाठी एम.सी.आय.बरोबर किंवा महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल यांच्याबरोबर यांच्याशी चर्चा करुन या जागा कशाप्रकारे भरता येतील यादृष्टीने शासन निश्चितपणे उपाययोजना करण्यात येतील.

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

औचित्याच्या मुद्यासंबंधी

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी राष्ट्रीय महापुरुषांच्या नावाच्या बोर्डांच्या संदर्भात काल उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्यासंबंधी आपण निदेश दिले होते. मला वाटले होते की, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले हे यासंबंधी आज विचारणा करतील. मी थोडा वेळ वाट पाहिली. आज सकाळी 11 वाजेपर्यंत हे बोर्ड लावावयाचे होते....

उपसभापती : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. आपल्याला काय बोलावयाचे आहे ते मला समजले आहे. आज मी स्वत: छत्रपती शिवाजी टर्मिनस रेल्वे स्टेशनला 12 वाजून 10 मिनिटांनी गेलो होतो. त्याठिकाणचे पोलीस स्टेशन जे राज्य सरकारच्या अखत्यारित आहे. त्याठिकाणी अगोदर असलेला बोर्ड खाली उतरविलेला आहे, नवीन बोर्ड लावण्याचे काम तेथे चालू आहे. हे मी स्वत: पाहून आलो आहे. श्री.दिलीप माने, पोलीस निरीक्षक हे त्याठिकाणी उपस्थित होते. बाकीच्या ठिकाणी मी माझ्यावतीने काही माणसांना पाहणी करण्यासाठी पाठविलेले आहे. तेथे जाण्यासाठी माझ्याबरोबर कोणी तरी सन्माननीय सदस्य येतील यासाठी मी आज सकाळी 11.30 वाजेपर्यंत वाट पाहिली. परंतु कोणीही माझ्याबरोबर आले नाहीत, त्यामुळे मी स्वत: तेथे दुपारी 12.10 वाजता जाऊन आलो आहे. त्यांनी काम चालू केलेले आहे हे सभागृहाच्या माहितीसाठी मी सांगतो.

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : अंबरनाथ-उल्हासनगर हायवेलगत असलेल्या थॉमस बेकर केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत मशिनच्या झालेल्या स्फोटात दोन कामगार ठार होणे

मु. शी. : अंबरनाथ-उल्हासनगर हायवेलगत असलेल्या थॉमस बेकर केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीत मशिनच्या झालेल्या स्फोटात दोन कामगार ठार होणे यासंबंधी श्री.दिवाकर रावते,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"अंबरनाथ-उल्हासनगर हायवेलगत थॉमस बेकर केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या 15 वर्षे जुन्या असलेल्या कंपनीमध्ये दिनांक 12/5/2009 रोजी वा त्या सुमारास प्रॉडक्शन विभागात केमिकल पावडर कोरडी करण्याचे काम सुरु असतांना मशिनचा अचानक स्फोट होऊन त्यात दोन कामगार ठार होऊन अनेक कामगार गंभीररित्या जखमी होणे, जखमींना तातडीने उपचारार्थ मध्यवर्ती हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात येणे, अचानक झालेल्या स्फोटामागील कारणे अद्याप न कळणे, कंपनीत आग रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून कोणतीच यंत्रणा नसणे, त्यामुळे कामगारांना अशा घटनांना वारंवार सामोरे जावे लागणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांमध्ये पसरलेले घबराटीचे व तीव्र असंतोषाचे वातावरण, याकडे शासनाने तातडीने लक्ष देण्याची नितांत आवश्यकता, संबंधित मृत कामगारांच्या नातेवाईकांना व जखमींना आर्थिक मदत तातडीने देण्याची गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री.नितीन राऊत (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत / शीघ्रलेखा नाही

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवरील लक्षवेधी क्रमांक 2 आणि 3 मधील विषय सारखेच आहेत. अंबरनाथ- उल्हासनगर हायवेलगत असलेल्या थॉमस बेकर केमिकल्स प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमध्ये स्फोट होऊन दोन कामगार ठार आणि अनेक गंभीर जखमी झालेले आहेत तर ठाणे-बेलापूर मार्गावरील दर्शन केमिकल्स या रासायनिक कंपनीत बॉयलरचा स्फोट झाल्यामुळे 2 कामगार मृत आणि अनेक गंभीर जखमी झालेले आहेत. परंतु या दोन्ही कंपनीतील मृत कामगारांच्या नातेवाईकांना वेगवेगळी मदत दिली गेली आहे. एका कंपनीतील कामगाराला एक न्याय आणि दुस-या कंपनीतील कामगाराला दुसरा न्याय असे झालेले आहे. मे. दर्शन केमिकल्स कंपनीमध्ये स्फोटात मृत पावलेल्या कामगारांच्या वारसांना प्रत्येक 1 लाख रुपये आणि 9 जखमी कामगारांना प्रत्येक 50 हजार रु. मदत देण्यात आली आहे. तर मे. थॉमस बेकर केमिकल्स प्रा.लि. कंपनीमध्ये स्फोटात मृत पावलेल्या कामगारांच्या कुटुंबियांना फक्त 50 हजार रु. तातडीची मदत देण्याचे कारखान्याचे भोगवटादारांनी लेखी कळविलेले आहे. म्हणजे एका कंपनीतील कामगाराला एक न्याय आणि दुस-या कंपनीतील कामगाराला दुसरा न्याय दिला गेलेला आहे. थॉमस बेकर कमिकल्स प्रा.लि. या कंपनीमध्ये अधिका-याच्या हलगर्जीपणामुळे दोन कामगारांचा मृत्यू झालेला आहे आणि अनेक कामगार जखमी झाले आहेत. लक्षवेधीच्या परिच्छेद क्रमांक 3मध्ये असे म्हटलेले आहे की, सेंट्रीफ्युजमध्ये वॉश देवून काढलेला पोटॅशियम कार्बोनेट प्रयोग शाळेत तपासणीसाठी न पाठविता ट्रे डायरमध्ये गरम करण्यासाठी ठेवले गेले आणि त्यामुळे स्फोटा झाला. हे पोटॅशियम कार्बोनेट प्रयोग शाळेत तपासणीसाठी न पाठविता ट्रे डायरमध्ये ठेवणारी व्यक्ती या घटनेस जबाबदार आहे. हा जो कोणी अधिकारी असेल त्याला गडगंज पगारही असेल. त्याने आपल्या कामामध्ये हलगर्जीपणा केल्यामुळे दोन कामगारांचा मृत्यू झालेला आहे. या प्रकरणी भारतीय दंड विधानाच्या कलम 33, 337, 338 व 304 नुसार गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे. खरे हा अपघात नसून खून आहे. म्हणून 302 हे कलमही लावले गेले पाहिजे. तेव्हा या प्रकरणी जबाबदार असलेल्या अधिका-यावर कोणती कारवाई करण्यात येणार आहे ? अशा प्रकारे पोटॅशियम कार्बोनेट ठेवला गेला तर त्यामुळे स्फोट होऊन माणसे मरु शकतात असे त्या अधिका-याला माहीत असणार. त्यामुळे त्या अधिका-याने खुनाचा गुन्हा केलेला आहे. हा हलर्गीपणा करणारा अधिकारी कोण आहे ? त्याच्यावर कोणती कारवाई केली जाणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. दिवाकर रावते....)

संबंधित अधिका-यावर कोणते दोषारोप ठेवण्यात येणार आहेत ? तसेच एका कंपनीतील कामगाराला एक न्याय आणि दुस-या कंपनीतील कामगाराला दुसरा न्याय दिला जातो. यासंदर्भात शासनाचे म्हणणे काय आहे ?

श्री. नितीन राऊत : हा पोटॅशियम कार्बोनेट तयार करणारा कारखाना आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत...

आणि पेटेशियम कार्बोनेटमध्ये ज्या एम्प्युरीटीज् असतात, त्या एम्प्युरीटीज् काढून त्याचे प्रोसेस करुन त्याचे प्रॉडक्शन या ठिकाणी केले जाते. त्या दिवशी पाच बॅचेसमधील एकही बॅच प्रयोगशाळेत टेस्ट करण्यात आलेले नव्हते, त्यामुळे त्या एम्प्युरीटीज् तशाच राहिल्या आणि त्यामळे त्या दिवशी तेथे स्फोट झाला. ख-या अर्थाने ही जबाबदारी संपूर्णत: संबंधित व्यवस्थापनाची असते. त्या व्यवस्थापनाचा जो कन्सल्टंट आणि प्रॉडक्शन मॅनेजर होता, त्याचे नाव श्री.जिना भगतसिंग असे होते. तो देखील या स्फोटमध्ये मृत झाला आहे. त्याने या ठिकाणी कायदेशीररित्या प्रोसीजर फॉलो केले नाही म्हणून पोलिसांनी त्याच्यावर दोषारोपपत्र दाखल केलेले आहेत. त्या अनुषंगाने पुढील कार्यवाही शासनाकडून करण्यात येत आहे. शासनाच्या नियमांतर्गत भारतीय दंड विधानच्या कलम 336,337,338 व 304 नुसार पोलिसांनी व्यवस्थापन व कंपनीचे संबंधित अधिकारी यांचे विरुध्द गुन्हा दाखल केलेला आहे. या स्फोटात जे कामगार मृत्यूमुखी पडले आहेत, त्यांच्या कुटुंबियांना व्यवस्थापनाने 50 हजार रुपये देण्याचे मान्य केलेले आहे. श्री. जिना भगतसिंग यांनी पत्नी वयस्कर आहे. त्यांच्या पत्नीने सांगितले की, माझा मुलगा यु.एस.ला आहे. तिने ही मदत नाकारली आहे. दुसरा कामगार श्री. वाणी हा या घटनेत मृत्यूमुखी पडला आहे, त्यांच्या पत्नीला नोकरी देण्याचे व्यवस्थापनाने मान्य केले आहे. या कामगारांना नुकसान भरपाईची रक्कम दिलेली नसून ते सानुग्रह अनुदान दिलेले आहे. नुकसान भरपाईची रक्कम कायदेशीररित्या त्यांना देण्यात येईल.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, याच केमिकल फॅक्टरीमध्ये असे प्रकरण घडले असे नाही. अशा केमिकल फॅक्टरींमध्ये रेग्युलरली असे अपघात होत असतात. अनेक फॅक्टरीमध्ये स्फोट होतात, त्यात अनेक कामगार मृत होतात. फॅक्टरी इन्स्पेक्टर, लेबर इन्स्पेक्टर, पोल्यूशन कंट्रोल करणारे अधिकारी, इंडस्ट्रीयल सेप्टी ॲन्ड सिक्यूरेटी, अशा वेगवेगळया 14 विभागाचे अधिकारी अशा फॅक्टरींमध्ये व्हीजीट करीत असतात. तरी देखील अशा प्रकारचे अपघात होतात. अपघात झाल्यानंतर फॅक्टरी मालकांकडे मदत मागावयास जातो त्यावेळी मालक सांगतात की, सरकारी धोरणाप्रमाणे 50 हजार किंवा 1 लाख रुपये मृत कामगाराला दिले जात आहेत. अशा स्फोटात बरेच कामगार गंभीरपणे जखमी होतात. ते कामगार पुन्हा काम करण्यास लायक रहात नाहीत. काही वेळा कामगारांची बोटे तुटतात, काही वेळा कामगारांचे पाय तुटतात. काही वेळा

2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर.....

कामगाराचे हात तुटतात. अशा जखमी कामगारांना आपण वैद्यकीय मदत करतो. जो कामगार अंथरुणातच पडून असता अशा कामगाराच्या बाबतीत त्याची सर्व्हीस 58 किंवा 60 वर्षे ग्राहय धरुन त्यांना संपूर्ण पगार पेन्शन म्हणून देण्याचा नियम शासन करील काय ? सरकारी नियमानुसार अशा कामगारांना 50 हजार किंवा 1 लाख रुपये सानुग्रह अनुदान देण्यात येते. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, 50 हजार रुपयात भाजलेला रुग्ण बरा होऊ शकत नाही. हे नियम फार वर्षापूर्वीचे आहेत. त्यात बदल करण्यात येईल काय ? फॅक्टरी इन्स्पेक्टर, लेबर इन्स्पेक्टर, पोल्यूशन डिपार्टमेंट, इंडस्ट्रीयल सेप्टी ॲन्ड सिक्यूरेटी या विभागाच्या अधिका-यांवर या घटनेच्या अनुषंगाने काही कारवाई करण्यात येईल काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, यामध्ये इंडस्ट्रीयल सेप्टीचे ऑडीट करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे आणि तो लवकरच मान्य होईल अशी अपेक्षा आहे. दरवर्षी आमच्या औद्योगिक सुरक्षा विभागातर्फे फॅक्टरींची तपासणी करण्यात येते. तपासणीचा अहवाल सुध्दा वरिष्ठांना सादर केला जातो. सन्माननीय सदस्य श्री. पावसकर यांनी प्रश्न विचारला आहे त्या संदर्भात सांगू इच्दितो की, मृत कामगारांना सानुग्रह अनुदान हे व्यवस्थापनाने दिलेले आहे. राज्य शासनाकडून तसेच राज्य कामगार विमा योजनेमार्फत जी मदत देण्यात येते त्यासंबंधीची कार्यवाही सुरु आहे. जखमी कामगारांना पेन्शलन सुरु असते.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / शोधनीयाची नाही

पृ. शी. : ठाणे-बेलापूर मार्गावरील दर्शन केमिकल्स या कंपनीत बॉयलरचा स्फोट होऊन भीषण आग लागणे

मु. शी. : ठाणे-बेलापूर मार्गावरील दर्शन केमिकल्स या कंपनीत बॉयलरचा स्फोट होऊन भीषण आग लागणे यासंबंधी सर्वश्री जयप्रकाश छाजेड, उल्हास पवार, मोहन जोशी, सय्यद जामा, चरणसिंग सप्रा, जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, डॉ.वसंत पवार, सर्वश्री भास्कर जाधव, रमेश शेंडगे, संजय पाटील, प्रा.फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जयप्रकाश छाजेड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कामगार मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"ठाणे-बेलापूर मार्गावरील औद्योगिक वसाहतीतील पावणे येथील दर्शन केमिकल्स या रासायनिक कंपनीतील बॉयलरचा दिनांक २१ मे, २००९ रोजी स्फोट होऊन लागलेंल्या भीषण आगीत कंपनीचे नऊ कामगार होरपळून गंभीर जखमी होणे, होरपळलेल्या कामगारांची प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना अतिदक्षता विभागात दाखल करण्यात येणे, कामगार गंभीर जखमी झाल्याने त्यांच्या कुटुंबियात पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, रुग्णालयांतून कामगारांवर प्रभावी उपचार तसेच कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत उपलब्ध करुन देण्याची नितांत गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री.नितीन राऊत (कामगार राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, मागील अधिवेशनात रिलायन्स केमिकल्स कंपनीमध्ये स्फोट झाला म्हणून लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. अधिवेशन सुरु होण्यापूर्वी स्फोट होणे आणि नंतर लक्षवेधी सूचना मांडावी लागणे हे औद्योगिकदृष्टया आणि कामगारांच्या दृष्टीने योग्य नाही. ज्या पध्दतीने मुंबई आणि जवळपासच्या औद्योगिक वसाहतीमध्ये वारंवार स्फोट होत आहेत, कामगार मृत्युमुखी पडत आहेत, सरकारचा कामगार विभाग हा मृत कामगारांच्या वारसांना 1 लाख रुपये, जखमींना 50 हजार रुपये दिले, त्यांना दवाखान्यात भरती केली की त्यांचे काम संपले इतक्या सहजपणे उत्तरे देण्यात येत आहेत. मरणाऱ्या कामगारांच्या जिवाची किंमत ठरविण्याचा अधिकार सरकारच्या कामगार विभागाला नाही. या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने औद्योगिक सुरक्षा विभाग, कामगार आयुक्त, बॉयलर इन्स्पेक्शन विभाग यांनी ज्या कंपनीत स्फोट झाला म्हणून लक्षवेधी सूचना मांडली त्या कंपनीमध्ये केव्हा इन्स्पेक्शन केले होते? कारखाना सुरु करण्याची परवानगी देण्यापूर्वी कामगारांना प्रशिक्षण दिले आहे की नाही हे पाहण्याची या अधिकाऱ्यांची जबाबदारी होती की नाही? प्रशिक्षण न दिल्यामुळे स्फोट झाला असेल तर मालक आणि औद्योगिक सुरक्षा विभाग, बॉयलर इन्सपेक्टर हे या घटनेला जबाबदार असल्यामुळे त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार आहात की नाही? या अधिकाऱ्यांची ही जबाबदारी होती. बॉयलर इन्स्पेक्टरला हप्ता दिला की, कंपनीच्या मालकाचे काम मार्गी लागते. कडक नियमांची अंमलबजावणी करावी लागत नाही. कारण त्यासाठी जास्त पैसे द्यावे लागतात. म्हणून या केसमध्ये आणि भविष्यात असा प्रकार घडल्यास या सर्व अधिकाऱ्यांना सरकार जबाबदार धरणार आहे की नाही?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, हा जो अपघात घडला त्याठिकाणी डायमिथाईल सल्फॉक्ससाईड सॉलव्हंट बाहेरुन आणून त्याचे शुध्दीकरण केले जात होते. तत्पूर्वी त्यात काही आक्षेपार्ह पदार्थ आहेत का याची तपासणी प्रयोगशाळेत केली जाते. त्याठिकाणी अशा प्रकारची तपासणी केली नव्हती, त्यामुळे त्याठिकाणी स्फोट झाला होता. कामगारांना रासायनिक गुणधर्म व सुरक्षित हाताळणी याबाबतच्या सूचना व प्रशिक्षण देण्यात आले नव्हते म्हणून हा अपघात घडला. म्हणून पोलीस ठाणे, तुर्भे येथे भोगवटादार व त्याचा मुलगा यांच्याविरुध्द आय.पी.सी.च्या कलम

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

284, 336, 338, 427, 304 (अ) च्या भंगाबाबत एफ.आय.आर.172/09 दाखल करण्यात आला आहे. यासंबंधी कार्यवाही सुरु आहे. सानुग्रह अनुदान देण्यात येते त्याबाबत जो कायदा आहे त्यानुसार नुकसानभरपाई देण्यात येते. कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यानंतरच पेन्शन देण्याची तरतूद आहे. निवेदनात दिलेली रक्कम ही मदत म्हणून आहे. सानुग्रह अनुदान म्हणून आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, राज्यकर्ते म्हणून आपण संवेदनशील असले पाहिजे. ही लक्षवेधी सूचना व अगोदरची लक्षवेधी सूचना यामध्ये साम्य आहे. यापूर्वीच्या लक्षवेधी सूचनेबाबत सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितल्याप्रमाणे त्या घटनेत हलगर्जीपणा, निष्काळजीपणा, काळजी न घेणे व बॅचचा सॅम्पल प्रयोग शाळेत तपासणीस न पाठविता तसाच ट्रे ड्रायरमध्ये ठेवण्यात आला. या पदार्थात पोटॅशियन क्लोरेटचे प्रमाण जास्त असल्याने त्याच्या गुणधर्मानुसार ट्रे ड्रायरमध्ये गरम करीत असताना स्फोट झाला होता.

....2एम.1...

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर चव्हाण .....

त्यानंतर दुसऱ्या पानावर लिहिलेले आहे की, तपसणीसाठी पाठविले नव्हते. सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला त्या अनुषंगाने पहिल्या पानावर सांगितले आहे की, चौकशीत आढळून आले आहे की, सुरक्षित कार्यपध्दतीचा अवलंब केला नव्हता. याचा अर्थ इतके बेजबाबदारीने वागतात, माणसाची काहीच किंमत वाटत नाही. म्हणून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा संबंधितांवर दाखल करण्यात येणार आहे काय ? तसेच माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, संबंधित विभागाची काळजी घेणारे सरकारी, निमसरकारी खात्याचे जे पर्यवेक्षक असतात त्यांच्यावर गुन्हा दाखल करणार की नाही ? या प्रकरणात ज्यांची ज्यांची जबाबदारी असते त्या सर्वांनाच जबाबदार धरावे. कारण अशा प्रकारे एखादा माणूस मृत झाल्यानंतर त्यावर लक्षवेधी सूचना येते आणि ती 10 मिनिटात संपते पण ज्याच्या घरचा माणूस जातो ते संपूर्ण कुटुंबच उद्ध्वस्त होते. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी दोन तीन वेळा कायद्यातील तरतुदीसंबंधी उल्लेख केला. सहावा वेतन आयोग राज्याने लागू केला म्हणजेच बदललेल्या परिस्थितीनुसार पगारवाढ करुन दिली. तशाच प्रकारे अशा मदतीबाबत जी तरतूद आहे त्यातही बदल करणे गरजेचे वाटत नाही काय ? कारण त्यावेळी ठरविलेली रक्कम कालांतराने बदलणे आवश्यक असते. सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुळकर्णी यांनी बॉम्बे हॉस्पिटलमध्ये ट्रिटमेंट घेतली असता त्यांना 6.50 लाखाचे बिल देण्यात आले आणि ट्रिटमेंट देखील चुकीची केली. अशा प्रकारे मदत मिळण्यासंबंधीचा जो कायदा आहे त्यात बदल करणार काय ?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, प्रयोगशाळेत तपासणी करणे ही जबाबदारी संपूर्णपणे व्यवस्थापनाचीच असते. अशा प्रकारे सॅम्पल टेस्ट करण्यापासून शेवटी तपासणी केलेली नव्हती . हे या ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. या ठिकाणी दररोज येणाऱ्या कामगारांना प्रशिक्षण देण्यात येते व जे काही झालेले आहे त्यात व्यवस्थापनच संपूर्ण जबाबदार आहे म्हणून व्यवस्थापनावर कठोर कारवाई जी कायद्यात असेल ती करण्यात येईल. तसेच सानुग्रह अनुदानासंबंधी देखील प्रश्न उपस्थित करण्यात आला. त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, असे प्रकार घडत असतात परंतु सभागृहाच्या व कामगारांचा भावना लक्षात घेऊन निश्चितपणे त्याबाबत विचार करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती मंदा म्हात्रे : महोदय, आपल्याला माहीत आहे की, आपल्याच जिल्ह्यातील हा प्रश्न असून नवीन मुंबईतील एमआयडीसी ही आशिया खंडातील एक मोठा औद्योगिक पट्टा आहे. 14 वर्षामध्ये जवळपास 2000 कंपन्यांना कुठल्या ना कुठल्या कारणांनी आगी लागलेल्या आहेत. आणि केवळ हर्डिलिया केमिकल सारखी एक कंपनी सोडली तर कुठल्याही कंपनीने अग्निशमन दल उभारलेले नाही. नवी मुंबई परिसरात व शहरी भागात अग्निशमन दलाची केंद्रे आहेत पण कंपन्यांनी ही व्यवस्था न केल्यामुळे कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे. आजच्या कामकाज पत्रिकेवर दोन लक्षवेधी सूचना अशाच प्रकारच्या विषयावर आलेल्या आहेत. म्हणून या निमित्ताने शासन ठोस असा निर्णय घेणार काय ? तसेच बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, कारखान्यात पर्यवेक्षक म्हणून ज्या ज्या लोकांची जबाबदारी असते त्या त्या लोकांना मॅनेज केले जाते आणि सातत्याने शॉर्ट सर्किट होत असते व त्यात कामगार अनेक वेळा मृत्युमुखी पडतात. तसेच कारखान्यातील अकुशल कामगारांना कुठलेही प्रशिक्षण दिलेले नसते पण ज्यावेळी कंपनीमध्ये तपासणी होते त्यावेळेस हे अधिकारी काय तपासणी करतात व त्यात काही आढळून येते की नाही हे पाहून जर अधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन राऊत : या ठिकाणी सन्माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, अशा प्रकारे बेजबाबदार अधिकारी आढळून आल्यास त्यांच्यावर निश्चित प्रकारे कारवाई करण्यात येईल. या प्रकरणामध्ये एकंदर 8 कामगार जखमी झाले असून त्यातील 5 कामगांराची प्रकृती सुघारत आहेत. डीनच्या मदतीने सर्व कामगारांना चांगल्या सोयीसुविधा पुरविल्या जात असून या कामगारांना मुंबई येथील सायन हॉस्पीटलमध्ये भरती करुन त्यांच्यावर चांगल्या प्रकारचे उपचार केले जात आहेत व त्यांची काळजी घेतली जात आहे.

श्री सय्यद जामा : अभी माननीय मंत्री जी ने कहा कि कामगार एवम् उद्योग विभाग के किसी अधिकारी ने लापरवाही बरती होगी तो उस अधिकारी के खिलाफ कार्रवाई की जाएगी. ऐसे लापरवाह अधिकारी के खिलाफ कार्रवाई होनी ही चाहिए. मेरा प्रश्न यह है कि क्या वर्क्स मॅन काम्पेनसेशन एक्ट के तहत कामगारों को काम्पेनसेशन दिया गया है ? दूसरा प्रश्न यह है कि, जख्मी कामगारों को 50 हजार रुपये सानुग्रह अनुदान के रुप में जो दिए गए हैं और मृत व्यक्ति के वारिस को जो 1 लाख रुपये की सहायता राशि दी गई है, यह सहायता राशि बहुंत कम है इसलिए क्या यह सहायता राशि बढ़ाई नहीं जा सकती ? किसी पुलिस की मृत्यु हो जाने पर उसके वारिस को बहुत सहायता राशि मिलती है. उसी प्रकार से गरीब कामगारों को भी ज्यादा सहायता राशि मिलनी चाहिए.

श्री. नितीन राऊत : आमचे सन्माननीय मित्र श्री. सय्यद जामा यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी आपणास सांगू इच्छितो की, और जैसा कि मैंने पहले बताया है कि, कानून के तहत हर प्रकार की नुकसान भरपाई प्रभावित कामगारों को दी जाती है. दुसरे असे की, सन्माननीय सदस्य श्री. जामा साहेब तसेच सभागृहाच्या सर्व सन्माननीय सदस्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात आपल्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत. संवेदनशील अशा मोठ मोठया कारखान्यात अशा प्रकारचे अपघात होतात अशा प्रकारची भावना सर्व सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली आहे. अशा प्रकारचे जे संवेदनशील कारखाने आहेत त्या ठिकाणी आमच्या तर्फे या पुढे सेफ्टी ऑडीट केले जाईल आणि ते सेफ्टी ऑडीट बघून मगच त्या कारखान्यांचे लायसन्स रिन्यूवल केले जाईल व अपघाताचे प्रमाण कमी करण्याचा निश्चित प्रकारे प्रयत्न केला जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : आता आम्ही सेफ्टी ऑडीट करु असे माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितले आहे. त्यामुळे अशा प्रकारचे सेफ्टी ऑडीट अगोदर का करण्यात येत नव्हते?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, या अगोदर सेफ्टी ऑडीट होत नव्हते. केवळ निरीक्षण केले जात असे. सेफ्टी ऑडीटच्या संदर्भात याच अधिवेशनात या बिलाच्या संदर्भात सुधारणा करण्यात येईल. तसेच इएसआयच्या तत्त्वानुसार जी काही रक्कम आहे ती दिली जाईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या लक्षेवधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. जयप्रकाश छाजेड यांनी तसेच इतरही सन्माननीय सदस्यांनी सेफ्टी ऑफिसरवर कारवाई केली जाणार काय? असा प्रश्न उपस्थित केलेला होता. परंतु त्या प्रश्नाचे सन्माननीय मंत्रीमहोदयांनी उत्तर दिलेले नाही. या केमिकल फॅक्टरीमध्ये सेफ्टी ऑफिसरने किती वेळा भेटी दिल्या होत्या? तसेच कायद्यानुसार या अधिका-याने किती भेटी देणे आवश्यक होते? व हा सेफ्टी ऑफिसर जर या केमिकल कंपनीत गेला नसेल तर त्या सेफ्टी अधिका-यावर शासन कारवाई करणार आहे काय ? जर सेफ्टी ऑफिसर या कंपनीत गेले असतील व त्या अधिका-याने खोटा रिपोर्ट सादर केला असेल तर त्या अधिका-यावर फौजदारी गुन्हा दाखल केला जाईल काय?

श्री. नितीन राऊत : सभापती महोदय, मी सभागृहाला ग्वाही देऊ इच्छितो की, सेफ्टी ऑडीट केल्यानंतर ते वर्षातून दोन वेळेस रिन्यूवल केले जाईल. जे अधिकारी सेफ्टी ऑडीट करणार नाही त्यांच्यावर योग्य ती कडक कारवाई केली जाईल.

श्री. रमेश शेंडगे: सभापती महोदय, उद्योगांची वाढ व्हावी व जनतेला रोजगार मिळावा यासाठी शासन औद्योगिकरणाला प्रोत्साहन देत असते. परंतु अशा प्रकारच्या कारखान्यामध्ये कायद्याची पायमल्ली सर्रास केली जाते. रोजंदारी उपलब्ध होण्याच्या ऐवजी जनावरांची जशी कत्तल खाण्यात कत्तल होते तशा प्रकारे या कामगारांना या कंपन्यांमध्ये सामोरे जावे लागते व त्यामुळे या कामगारांची कुटुंबे उद्ध्वस्त होत असतात.

यानंतर श्री. गायकवाड...

अशुद्धीत प्रत / अशुद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे.

कारखान्यात होणा-या अपघातात एखादा कामगार मृत्युमुखी पडल्यास त्याचे कुटुंब उद्वस्त होते. ठाणे बेलापूर रोडच्या एका बाजूला औद्योगिक वसाहत आहे आणि दुस-या बाजूला निवासी क्षेत्र आहे. तेव्हा विभागाच्या अधिका-यांनी कामात दुर्लक्ष केल्यानंतरसुध्दा जर त्यांच्या विरुध्द कारवाई केली नाहीतर भोपाळ मध्ये जशी गॅस दुर्घटना घडली होती तशी दुर्घटना येथे घडू शकेल. तेव्हा जे अधिकारी कायद्याची पायमल्ली करतात त्यांच्याविरुध्द कारवाई केली पाहिजे. त्याचबरोबर कायद्याची पायमल्ली करुन आणि कायदे मोडून ठाणे - बेलापूर परिसरात किती कारखाने सुरु आहेत आणि त्यांच्या बाबतीत कोणती कारवाई करण्यात येणार आहे, त्याचबरोबर किती दिवसात ही कारवाई करण्यात येणार आहे ? सेफटी ऑडिट येथून पुढे करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी सागितलेले आहे. इंडिस्ट्रीयअल सेफटी ॲक्ट अस्तित्वात असतांना तो कायदा मोडणा-या अधिका-याविरुध्द तसेच अशा कारखान्याच्या विरुध्द कोणती कारवाई करण्यात येणार आहे आणि किती दिवसात ही कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : या प्रकरणी सबंधित अधिका-यांना जबाबदार धरावयास पाहिजे. त्याच्यावर कारवाई केली पाहिजे.

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, आजच्या कामकाजपत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या दोन्हीही लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात एक बाब माझ्या निदर्शनास आली आहे की, अधिकारी नियमितपणे भेटी देऊन निरीक्षण करीत नाही. यासंदर्भात नियम काय आहेत हे मी विभागाच्या अधिका-यांना विचारले असता त्यांनी मला असे सागितले की, यासबंधी नियम नाही. तेव्हा हा नियम तत्काळ तयार करुन वर्षातून दोन वेळा तरी कारखान्याच्या सेफटी मेझर्सची पुर्न तपासणी केल्यानंतर सबंधित कारखान्याला परवानगी द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी वारवंार प्रश्न विचारल्यानंतर सुध्दा माननीय मंत्री महोदयांकडून उत्तर दिले जात नाही. माननीय मंत्री महोदय अधिका-यांना पाठीशी घालत आहेत. पोलीस विभागात काम करणारा कर्मचारी वा अधिकारी मृत झाले तर ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

शहीद झाले असे आपण म्हणतो . परंतु कारखान्यामध्ये अपघात होऊन अनेक कामगार मृत्युमुखी पडतात हा प्रकार केवळ या दोनच कारखान्यामध्ये घडलेला नाही. निवेदनामध्ये असे सांगण्यात आलेले आहे की, एका कारखान्यात मृत्युमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना एक लाख रुपये दिलेले आहेत आणि दुस-या कारखान्यात मृत्यूमुखी पडलेल्या कामगारांच्या वारसांना मात्र 50 हजार रुपये दिलेले आहेत. दोन्ही कारखान्यांना राज्य शासनाने परवानगी दिलेली आहे तेव्हा मदत देण्याच्या बाबतीत एकच नियम का लागू केला जात नाही ? त्याचबरोबर यापुढे कारखान्यामध्ये अपघात होऊन कोणताही कामगार मृत वा जखमी होणार नाही या दृष्टीने कोणती कडक उपाययोजना करण्यात येणार आहे ? त्या संदर्भात केवळ अधिका-यांच्या विरुध्दच नव्हे तर कारखान्याच्या व्यवस्थ्ांपनाविरुध्द कोण्ंती कडक कारवाई केली जाणार आहे काय ?

श्री.नितीन राऊत : सभापती महोदय, सानुग्रह अनुदान देण्याच्या बाबतीत जी तरतूद करण्यात आलेली आहे ती ऐच्छिक आहे . सानुग्रह अनुदानाची रक्कम संबंधित कारखान्याच्या व्यवस्थ्ांपनाकडून दिली जाते. त्यामुळे या दोन्ही रक्कमेमध्ये तफावत दिसून येत आहे. सानुग्रह अनुदान देण्याच्या बाबतीत कायद्यात कोणतीही तरतूद नाही. जास्तीत जास्त रक्कम देण्याच्या दृष्टीने राज्य सरकारकडून निश्चितपणे काळजी घेण्यात येईल त्याचबरोबर अपघात होऊ नये यासाठी उपायोजना करण्यात येईल आणि यामध्ये जे कोणी अधिकारी दोषी आढळून येतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्यात येईल.

<u>लक्षवेधी सूचना पुढे ढकलण्याबाबत</u>

उपसभापती : चौथी लक्षवेधी पुढे ढकलण्यात येत असल्यामुळे आता पाचवी लक्षवेधी सूचना घेण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कारजालाड (जि. वाशिम) येथील कृषी उत्पन्न बाजार क्षेत्रातील हमाल व मापा-यांनी 1 एप्रिल 2009 पासून पुकारलेला संप

मु. शी. : कारजालाड (जि. वाशिम) येथील कृषी उत्पन्न बाजार क्षेत्रातील हमाल व मापा-यांनी 1 एप्रिल 2009 पासून पुकारलेला संप यासंबंधी सर्वश्री एस.क्यु. जामा, चरणसिंग सप्रा.वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. एस.क्यु. जामा (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पणन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" कारंजालाड (जि.वाशिम) या कृषी उत्पन्न बाजार क्षेत्रांत माथाडी कायद्याच्या अंमलबजावणी बाबतचा व्यापारी, हमाल, मापारी व बाजार समिती यांच्यातील पेच सुटलेला नसणे परिणामी सदर कृषि उत्पन्न बाजार समिती अंतर्गत अनुक्रमे कारंजा परिसर, किन्ही पानझिरा, पसराणी,धामणी व मोरा येथील शेतक-यांनी विक्रीसाठी आणलेला सुमारे 600 क्विटल शेतमाल व्यवहारा अभावी पडून राहिल्याचे दिनांक 7 मे 2009 रोजी वा त्या सुमारास उधडकीस येणे, माथाडी कामगार कायद्याने माथाडींना मिळणा-या हमाली, मापारी भविष्यनिर्वाह निधी उपदान, बोनस ,अपघात विमा, नुकसान भरपाई , वैद्यकीय सेवा याबाबतीत कोणतीही तडजोड न होणे, दिनांक 24 जानेवारी 2009 रोजी राष्ट्रीय कष्टकरी पंचायतीच्या समवेत उक्त कारंजालाड कृषि उत्पन्न बाजार समितीच्या पदाधिका-यांनी एकमुखी ठराव पारित करुनही सदर मार्केट यार्डावर हमाल व मापा-यांनी दिनांक 1 एप्रिल 2009 रोजी पासून पुकारलेला संप, बाजार समित्यांनी हमालाची नोदणी, माथाडी कामगार कायद्या अंतर्गत करण्याची वरिष्ठांकडे वेळोवेळी केलेली मागणी परंतु व्यापा-यांनी माथाडी कामगारांची कोणतीही नोंद न करणे, त्यामुळे माथाडी कामगारांची होणारी आर्थिक विवंचना परिणामी त्यांच्यात पसरलेले अनिश्चिततेचे व घबराटीचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही वा उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया "

4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयप्रकाश दांडेगावकर (सहकार राज्य मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

नतर श्री.सुंबरे

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सुचनेवरील मा.पणन राज्यमंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

श्री. सय्यद जामा :सभापति महोदय, कारंजालाड, जिला वाशिम की कृषि उत्पन्न बाजार समिति क्षेत्र में माथाड़ी कानून लागू करने की मांग की गई है. इस आशय का प्रस्ताव कृषि उत्पन्न बाजार समिति की सर्वसाधारण बैठक में पास हुआ है लेकिन व्यापारी, हमाल, व बाजार समिति के बीच मतभेद के चलते माथाडी कानून लागू नहीं हो सका है. निवेदन में यह लिखा है कि हमाल प्रतिनिधियों ने माथाड़ी कानून स्थगित रखने के बारे में निवेदन दिया है इसलिए उक्त कानून लागू करने में अड़चन आ गई है. मैं इस संबंध में यह कहना चाहता हूं कि माथाड़ी कानून लागू करना हो तो यह किसी की मर्जी की बात नहीं है. चूंकि माथाड़ी कानून लागू करने का प्रस्ताव सर्वसाधारण सभा में मान्य किया गया है इसलिए इस कानून को लागू करने के लिए सरकार क्या करेगी और यह कानून कब तक लागू हो जाएगा ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, हा प्रश्न केवळ या कृषी उत्पन्न बाजार समितीपुरताच मर्यादित नसून इतरही कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये अधून मधून हा प्रश्न निर्माण होतो आणि सध्याच्या त्यांच्या नियमानुसार केवळ हमाल-मापाडींना परवाने देणे एवढीच त्यांची अधिकारमर्यादा आहे. तसेच त्यांची नोंदणी ही कामगार आयुक्तांकडे करावयाची असते व त्यांना मान्यता देण्यापुरतेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे काम असते. यामध्ये कामगार तसेच पणन या दोन्ही खात्यांचे अधिकारी तसेच कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे अधिकारी, पदाधिकारी यांच्याबरोबर यापूर्वी एक बैठक आपण नागपूरला घेतली आहे पण त्यातून पूर्ण मार्ग निघू शकला नाही. त्यामुळे पुन्हा एकदा या संदर्भात या सर्वांची एक बैठक घेऊन कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील हमाल, मापारी यांना ज्या अडचणी आहेत, त्यांना न्याय देण्याचा जो प्रश्न आहे त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, आपण या वर्षी राज्य स्थापनेचा सुवर्णमहोत्सव साजरा करीत आहोत आणि राज्य स्थापनेला 50 वर्षे झाल्यानंतरही आपण कामगारांना त्यांचे मुलभूत हक्क, न्याय्य हक्क दऊ शकत नसू तर त्याचा गांभीर्याने विचार होणे गरजेचे आहे. इतर सर्व क्षेत्रातील कामगारांना आपण त्यांचे न्याय्य हक्क देतो आहोत, त्यांचे प्रॉव्हिडंड फंड वगैरे सोयी सवलती देतो आहोत मग या कृषी उत्पन्न बाजार समित्यांमधील कामगारांना ते का देत नाही आणि

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे...

आता आपण सांगता आहात की, या संबंधात संबंधित विभागातील अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन प्रश्न सोडविला जाईल तर किती दिवसात आपण या कामगारांना न्याय मिळवून देणार आहात ते तरी सांगावे ?

श्री. जयप्रकाश दांडेगावकर : सभापती महोदय, या कामगारांना त्यांचे न्याय्य अधिकार नाकारण्याचा कोठेही प्रश्न नाही आणि तो विषयही नाही. केवळ दोन खात्यातील नियमांमध्ये ज्या त्रुटी आहेत, कामगार कायदा आणि कृषी उत्पन्न बाजार समितीचा कायदा यामध्ये ज्या त्रुटी आहेत त्याबाबत दोन्ही विभागातील अधिकाऱ्यांबरोबर एक बैठक या पूर्वी नागपूरला घेतली होती. पण त्यातून पूर्ण मार्ग निघू शकला नाही. परंतु आता महिन्याभरामध्ये आपण पुन्हा एक बैठक सर्व संबंधितांची घेऊन मार्ग काढला जाईल.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये विज्ञान महाविद्यालय नसणे.

मु.शी. : विदर्भातील अनेक तालुक्यांमध्ये विज्ञान महाविद्यालय नसणे. यासंबंधी प्रा.बी.टी.देशमुख,सर्वश्री वसंतराव खोटरे, दिलीपराव सोनवणे,वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

प्रा.बी.टी.देशमुख (अमरावती विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

" विदर्भातील अनेक तालुक्याच्या ठिकाणी शासनाच्या धोरणात्मक निर्णयात तरतूद असूनसुद्धा माहे जून-जुलै 2009 पूर्वी निर्णय न झाल्यास विद्यार्थी विज्ञानाच्या महाविद्यालयीन शिक्षणापासून वंचित राहण्याची निर्माण झालेली शक्यता., ज्या तालुक्यांच्या ठिकाणी काही विद्याशाखांचे पदवी वर्ग अस्तित्वात नाहीत त्या विद्याशाखा शंभर टक्के अनुदानावर सुरू करण्यास परवानगी देण्याचा व त्या तालुक्याचया ठिकाणी एक किंवा दोन विद्याशाखा अनुदान तत्त्वावर आहेत तेथेच नवी दुसरी अथवा तिसरी विद्याशाखा देण्यास प्राधान्य देण्याचा धोरणात्मक निर्णय दिनांक 4 फेब्रुवारी 2008 च्या शासन निर्णयान्वये घेतला जाणे, धोरणात्मक निर्णयाशी पूर्णपणे सुसंगत अशा चार तालुक्याच्या ठिकाणी विज्ञान विद्याशाखा सुरू करण्याबाबत शासनाने मान्यता न दिल्यामुळे संस्थेला भेदभावपूर्ण वागणूक देण्यात आली आहे. अशी तक्रार असणारे एक निवेदन सचिव, श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती यांनी दिनांक 24 मार्च 2009 रोजी किंवा त्या दरम्यान सचिव, उच्च शिक्षण यांना सादर करणे., संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी दिनांक 28 डिसेंबर 2008 रोजी किंवा त्या दरम्यान एक प्रस्ताव सचिव, उच्च शिक्षण यांना पाठवून या चारही प्रस्तावाबाबत अनुकूल अभिप्राय कळविणे, तसे करताना दिनांक 4 फेब्रुवारी 2008 रोजीच्या शासन निर्णयामध्ये विदर्भातील अनेक तालुक्याच्या ठिकाणी विज्ञान महाविद्यालये नसल्याची बाब दिनांक 4 फेब्रुवारी 2008 च्या शासन निर्णयातील तालुक्यांच्या यादीमध्ये नमूद नाही हे विद्यापीठाने शासनाच्या लक्षात आणून देणे, जून, 2009 पर्यंत याबाबत निर्णय होण्याची शक्यता दिसत नसल्याने या भेदभावपूर्ण वागणुकीमुळे जनमानसात निर्माण झालेला तीव्र असंतोष व संतापाची लाट लक्षात घेता याबाबत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

.... पीपी 4 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेश टोपे (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

<u>निवेदन</u>

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..... पीपी 5 ...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(लक्षवेधी सूचनेवरील मा.उच्च शिक्षण मंत्र्यांच्या निवेदनानंतर ...)

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, एखाद्या संस्थेला महाविद्यालय काढण्यासाठी, शाळा काढण्यासाठी परवानगी देणे हा संपूर्णत: शासनाच्या एकंदर धोरणाचा भाग असतो. त्यामुळेच आम्ही सभागृहामध्ये याबाबत केव्हाही त्याबाबतचा प्रश्न उपस्थित केलेला नाही, करीत नाही. गेल्या तीस वर्षामध्ये मी प्रथमच हा विषय येथे उपस्थित करीत आहे. कारण यामध्ये एक अतिशय दुर्दैवी असे कारण अंतभूर्त आहे. अत्यंत विषारी अशी प्रादेशिक असमतोलाची वागणूक त्या जी.आर.मध्ये अंतर्भूत आहे. जेव्हा मला त्या संस्थेच्या लोकांकडून याबाबत माहिती मिळाली, एकूण प्रकरण समजले तेव्हा माझा त्यावर विश्वास बसला नाही. सभापती महोदय, 'कायम' शब्द काढण्यासाठी आम्ही वर्षानुवर्षे भांडतो आहोत, विनाअनुदानासाठी वर्षानुवर्षे भांडत आहोत. पुणे जिल्ह्यातील एका तालुक्यात विज्ञान महाविद्यालय नाही म्हणून एक जी.आर. काढला गेला. ती एक चांगली गोष्ट झाली. पुणे जिल्ह्यातील एका तालुक्यासाठी जरी आपण हा निर्णय घेतला असला तरी तो एक धोरणात्मक निर्णय घेतला असेच होते. कोणत्याही निमित्ताने चूक लक्षात आली की ती सुधारली गेली पाहिजे. एका तालुक्यात विज्ञान महाविद्यालय नाही म्हणून आपण जी.आर. काढला आणि त्यासाठी दिलेली तारीख उलटून गेल्यानंतरही अर्ज करून घेतला आणि केले होते. आता उद्या दुसऱ्या कोणाचा अर्ज आला तरी 100 टक्के अनुदानावर हे देण्यात येईल. आता या बाबतीत धोरणात्मक निर्णय घेतला. तालुक्यांची यादी दिली की, या या ठिकाणी ही सोय नाही. पण त्यावेळी विदर्भातील काही तालुक्यांची त्यांना आठवण राहिली नाही. त्या तालुक्यांमध्येही विज्ञान शिक्षणाची सोय नाही याची आठवण झाली नाही. त्या संबंधात यांनी निवेदन दिले. आम्ही लक्षवेधी सूचना दिली. पण हे एका प्रादेशिक असमतोलाच्या विषारी वृक्षाला आलेले फळ आहे असेच मी म्हणेन. एका पंगतीला दिलेला लाभ दुसऱ्या, तिसऱ्या पंगतीला देखील मिळाला पाहिजे. पण प्रत्येक पंगतीमध्ये आपण वेगवेगळे पदार्थ देऊन भेदाभेद करू लागलो तर ते योग्य होणार नाही. भाटघर येथे हैड्रोप्रोजेक्ट घेतला गेला. त्यानंतर आम्ही अमरावतीला देखील तसा प्रोजेक्ट करण्याबाबत विचारणा केली तर आम्हाला उत्तर देण्यात आले की, भाटघर येथे काय अनुभव येतो ते पाहून नंतर इतरत्र तसे करता येईल किंवा काय हे ठरविले जाईल. म्हणजे एका पंगतीला जिलेबीचा लाभ दिल्यानंतर दुसऱ्या पंगतीला जिलेबी दिली नाही म्हणून त्याबाबत विचारले असता सांगायचे की, त्या पंगतीत जेवणाऱ्यांच्या तब्येतीवर त्याचा काय परिणाम झाला हे पाहून नंतर इतर पंगतींना जिलेबीचा लाभ द्यायचा की नाही याचा विचार करण्यात येईल. ... PP 6 ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती : जिलेबी येईपर्यंत मट्ठा घ्या. ....

(यानंतर श्री. सरफरे .... क्यूक्यू 1 ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये आम्ही हा मुद्दा घेत आहोत. आपल्या जी.आर. च्या यादीमध्ये हे दोन तालुके नाहीत हे विद्यापीठाने लक्षात आणून दिले. निवेदनाच्या शेवटच्या परिच्छेदातील वाक्यानुसार नांदूरा आणि मोताळा या दोन तालुक्यांचा समावेश करण्यासाठी जी.आर. मध्ये दुरुस्त करण्याची कार्यवाही सुरु आहे. तुमचा बाबू चुकला असेल तर त्याची चूक दुरुस्त करण्यासाठी हे सभागृह आहे काय? तुमच्या बाबूची चूक दुरुस्त करण्यासाठी ही लक्षवेधी सूचना दिली आहे काय? याठिकाणी उत्तर असे यावयास हवे होते की, "विदर्भातील नांदूरा आणि मोताळा या दोन तालुक्यांमध्ये विज्ञान शाखा नाही, हे आम्हाला माहीत नव्हते, त्यामुळे ते जी.आर. मध्ये आले नाहीत, त्यामुळे आमची मान लाजेने खाली जात आहे. धोरणात्मक निर्णयानुसार ज्या तालुक्याच्या ठिकाणी विज्ञान महाविद्यालय आहे त्याठिकाणी 100 टक्के अनुदानावर महाविद्यालय देण्यात येत आहे" अशाप्रकारचे उत्तर आले नाही. आपल्या बाबूने दिलेले उत्तर, टास्क फोर्सने दिलेले उत्तर बरोबर नाही. या सभागृहामध्ये आम्ही टास्क फोर्सला विचारु शकत नाही. दोन-चार अधिकाऱ्यांचा टास्क फोर्स नेमला आहे त्याचे या ठिकाणी कौतुक केले आहे. आपण याठिकाणी शासन म्हणून आहात. निवेदनाच्या शेवटच्या वाक्यामध्ये मोताळा आणि नांदूरा या दोन तालुक्यांचा समावेश जी.आर.मध्ये नाही त्यासाठी तुम्ही तो जी.आर. दुरुस्त करा. तुमचे बाबू मरेपर्यंत करेक्शन करीत राहतील. आपण याठिकाणी ठामपणे सांगावे की, धोरणात्मक निर्णयाप्रमाणे विज्ञान शाखा दिली जाईल. ती देण्यामध्ये तुम्हाला अडचण काय आहे?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी या लक्षवेधी सूचनेच्या निमित्ताने आपले विचार या ठिकाणी व्यक्त केले आहेत. निवेदनातील शेवटच्या वाक्यात म्हटल्याप्रमाणे जी.आर. मध्ये चूक झालेली आहे. हा जी.आर. संपूर्ण राज्यासाठी आहे. त्या जी.आर.बरोबर प्रपत्र "अ" आणि "ब" जोडलेले असते. त्यापैकी प्रपत्र "अ" मध्ये "ज्या तालुक्यात कला/वाणिज्य/विज्ञान या विद्याशाखांपैकी कोणतीही विद्याशाखा अनुदानित नसेल तर तिला अनुदान दिले जाईल" त्याचप्रमाणे प्रपत्र "ब" मध्ये "यादीमध्ये कोणतीही विद्याशाखा नसली तरी त्या विद्याशाखेला 100 टक्के अनुदान दिले जाईल" अशाप्रकारचा 4 फेब्रुवारी 2008 रोजी जी.आर. काढण्यात आला. सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे प्रपत्र "ब" नुसार मोताळा आणि नांदूरा या दोन तालुक्यात विज्ञान शाखा नाही, व त्या यादीमध्ये हे दोन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ MAP/ SBT/

श्री. राजेश टोपे...

तालुके आलेले नाहीत ही वस्तुस्थिती आहे. ही चूक निश्चितपणे अधिकाऱ्यांच्या स्तरावर झालेली आहे. ज्या अधिकाऱ्यांकडून ही चूक झाली असेल त्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली जाईल असे मी सभागृहाला आश्वासन देतो. सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, 4 फेब्रुवारी 2008 चा स्वतंत्र जी.आर. होता. त्या अनुषंगाने दोन वेगवेगळया जाहिराती दिल्या होत्या. त्यामध्ये पहिली जाहिरात "कायम विना अनुदानित तत्वावर ज्या संस्थांचे नियमितपणे प्रस्ताव येतात त्यांच्या बाबतीत शासन स्तरावर गुणवत्तेच्या आधारावर निर्णय घेतला जातो". आणि दुसरी जाहिरात "4 फेब्रुवारी 2008 च्या जी.आर. च्या अनुषंगाने ज्या संस्थांनी अर्ज केले असतील त्यांच्या बाबतीत निर्णय घेण्यासाठी टास्क फोर्स आहे". सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांच्या म्हणण्यानुसार जर या संस्थांनी अर्ज केला असेल तर त्यांना 4 फेब्रुवारी 2008 चा शासन निर्णय लागू करावा, तो याठिकाणी लागू झालेला नाही. आपले म्हणणे असे आहे की, अनुदानित विज्ञान शाखा देणार आहोत अशाप्रकारची जाहिरात करण्यात आली असती तर या यादीमध्ये आणखी नावे समाविष्ट झाली असती. कदाचित काही संस्थांकडून जास्तीचे अर्ज येऊ शकले असते. माझे याबाबतीत एवढेच म्हणणे आहे की, यामध्ये काही लिटिगेशन होऊ शकते काय?

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे . . . .

माझे म्हणणे एवढेच आहे की, यामध्ये एखाद्या वेळेस काही लेटिगेशन होऊ शकतात काय ? सभापती महोदय, मला सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख आणि सन्माननीय सभागृहाने लिबर्टी द्यावी. माझे असे म्हणणे आहे की, याबद्दल काही लेटिगेशन होऊ नये याची खात्री करुन मग सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी जे सांगितले, ते करण्यासही माझी काही हरकत नाही. परंतु हे "bad in law" होऊ नये. मी याठिकाणी . . . .

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, "bad in law" हे पहिल्या परिच्छेदामध्ये झालेले आहे.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यामध्ये चूक झाली. परंतु ती दुरुस्त करीत असताना आम्ही या संस्थेला अनुदानित विद्याशाखा देऊ अशा प्रकारचे उत्तर जर मी आज दिले तर ते "bad in law" होऊ नये याची फक्त खात्री करुन घेतल्यानंतर, मग मला यासंदर्भात उत्तर देता येईल. म्हणून सभापती महोदय, मला एवढेच वाटते की, आपण उद्या किंवा परवा आपल्या दालनामध्ये कधीही या विषयाच्या संदर्भात एक बैठक घ्यावी, त्या बैठकीसाठी मी स्वत: उपस्थित राहीन किंवा मी स्वत:देखील सन्माननीय सदस्यांबरोबर बैठक घेईन. परंतु मला फक्त एवढीच बाब लक्षात आणून द्यावयाची आहे की, या बैठकीसाठी लॉ ॲण्ड ज्युडिशिअरी विभागाचे सचिव, आमच्या विभागाचे सचिव देखील उपस्थित रहातील. जेणेकरुन याबाबतीत कायदेशीर अडचणी येऊ नयेत. समजा सन्माननीय सदस्य जी मागणी करीत आहेत, त्याला मी "होय" असे उत्तर दिले आणि आपण या संस्थेला अनुदानित दिले, तर अशा वेळी दुसऱ्या संस्था किंवा दुसरे लोक कोर्टामध्ये गेले तर शासनाची ही ऑर्डर रद्द होऊ शकते. म्हणून माझे म्हणणे एवढेच आहे की, माझा निर्णय सबजेक्ट टू, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी सांगितले किंवा विनंती केली आहे की, दि.4 फेब्रुवारी 2008 च्या निर्णयानुसार, जी.आर.नुसार या संस्थेला आपण डायरेक्टली अनुदानावर घ्यावे, या संस्थेला देखील न्याय द्यावा अशी मागणी आहे, त्याबाबतीत मी "होय" असे म्हटले आणि कायद्याच्या दृष्टीने काही कॉम्प्लिकेशन्स् निर्माण झाली तर सगळेच अडचणीमध्ये येऊ शकतात आणि ती संस्था देखील अडचणीमध्ये येऊ शकते. म्हणून सभापती महोदय, माझी आपल्या माध्यमातून सभागृहाला एवढीच विनंती आहे की, मी याबाबतीत एक बैठक घेईन. परंतु जर ते "Subject to bad in law" होणार नसेल तर सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाच्या बाबतीत माझे....

. . . .2 आर-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उत्तर "होय" असे राहील. पण ते जर "Subject to bad in law"असे होणार असेल तर मला असे वाटते की, आपण बैठक घेऊन त्याबाबत उचित निर्णय घेऊ या.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, ही दुर्दैवाची गोष्ट आहे, हे लाजीरवाणे काम आहे. त्या विद्यापीठाने सर्व अर्जांचे प्रोसेसिंग करुन ते आपल्याकडे पाठविले आहेत. पण ते विना अनुदानासाठी पाठविले अशी आपल्या कारकूनांनी शब्दरचना वापरलेली आहे. पण विद्यापीठ असे काम करीत नाही. माझ्याकडे विद्यापीठाचे पूर्ण पत्र आहे. त्यामध्ये असे कुठेही म्हटलेले नाही की, हा अर्ज विना अनुदानासाठी पाठविला आहे. मात्र अनुदान कोणाला द्यावयाचे आणि कोणाला द्यावयाचे नाही हे ठरविण्याचे तुमचे काम आहे. विद्यापीठाविषयी यामध्ये जो उल्लेख केलेला आहे, तो बरोबर नाही. त्यामुळे माझे असे म्हणणे आहे की, हे काम त्या कारकुनांच्या हातामध्ये देऊ नका. ते खराब धंदे करतात, अत्यंत घाणेरडे धंदे करतात. याबाबतीत जास्त तपशिलामध्ये बोलणे मला शोभत नाही म्हणून मी बोलत नाही. एकेकाला बोलावून निर्णय करु नका. तुम्ही जी. आर. काढलेला आहे. सभापती महोदय, मी अशा प्रकारचे प्रश्न कधीही सभागृहामध्ये आणलेले नाहीत. हे धोरणाचे प्रश्न आहेत.पण याबाबतीत अत्यंत विषारी अशी प्रादेशिक असमतोलाची वागणूक दिली जात आहे.आमच्या भागामध्ये चार तालुक्यामध्ये विज्ञानाचे शिक्षण मिळत नाही हे या कारकूनांना माहिती नाही हे आमचे दुर्दैव आहे.अशा प्रकारच्या तक्रारी डलहौसीच्या काळामध्ये करण्यात येत असत.कारण त्यांना भारताची माहितीच नव्हती. पण आज आम्ही महाराष्ट्रामध्ये आहोत हे आम्हाला सांगावयास लाज वाटेल अशा प्रकारची उत्तरे माननीय मंत्री महोदय येथे येता कामा नयेत. तुम्ही सुध्दा मागासलेल्या भागातील प्रतिनिधी आहात. जर याबाबतीत कोणाला ऑब्जेक्शन घ्यावयाचे असते तर ते जी.आर.मधील पहिल्या परिच्छेदाबाबत घेतले असते.आता तारीख निघून गेलेली आहे. मी त्याबद्दल बोलत नाही. मी पहिल्या परिच्छेदाबाबत बोलत नाही.

उपसभापती : प्लीज, सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रश्न विचारावा.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माझे स्पष्ट म्हणणे आहे की, विद्यापीठाने शिफारस केलेली आहे. या संस्थेने वेळेच्या आत अर्ज केलेला आहे. एखाद्या संस्थेला विद्यापीठाने अनुदानित किंवा विना अनुदानित तत्वावर मान्यता द्यावयाची की नाही हे ठरविण्याचे त्यांचे अधिक्षेत्र नाही, त्यांचे ते कार्य नाही. त्यांनी तुमच्याकडे शिफारस करुन पाठविले आहे.तुमच्या जी.आर.प्रमाणे ते....

. . . .2 आर-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि फक्त तेच क्वॉलिफाईड आहेत. सभापती महोदय माझे हे दुर्दैव आहे की, भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षण संस्थेने नियमानुसार केलेल्या चार अर्जांविषयी त्यांना मिळणाऱ्या भेदभावपूर्ण वागणुकीविषयी, तसेच लज्जास्पद वर्तनाचा तीव्र निषेध करण्यासाठी मला महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षामध्ये इतके बोलावे लागते.याची मला स्वत:ला लाज वाटते, यापेक्षा काय बोलू.

यानंतर कु.थोरात . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. बी. टी. देशमुख....

विद्यापीठाने ज्याबाबत शिफारस केलेली आहे त्यासंदर्भात कॅबिनेटचा निर्णय झालेला आहे. धोरणात्मक जी.आर. निघालेला आहे. त्यामुळे या चारही बाबतीत आजच्या आज आदेश निर्गमित केले जातील... (अडथळा) कारकुनांचे सल्ले नंतर घ्यावेत. येथे सभागृहात आल्यानंतर धोरणात्मक निर्णय घेण्यात यावेत. विद्यापीठाने शिफारस केलेली असल्यामुळे त्यांना आजच्या आज आदेश दिले जतील असे या ठिकाणी जाहीर करण्यात येईल काय?

(उत्तर आले नाही)

डॉ. वसंत पवार : सभापती महोदय, पुणे विद्यापीठातील परिसरात दिंडोरी आणि चांदवड या दोन ठिकाणी विद्यान महाविद्यालये नसल्यामुळे दि.4-2-2008 च्या जी.आर.प्रमाणे माझ्या संस्थेचे अर्ज विद्यापीठाने शिफारस करुन पाठविलेले आहेत,तेव्हा त्यांना सुध्दा शासन परवानगी देईल काय?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. पवार यांच्या प्रश्नाचे उत्तर याठिकाणी मिळाले पाहिजे पण त्या आधी माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले पाहिजे.सभापती महोदय, माझा प्रश्न असा होता की, शासन निर्णयाप्रमाणे हे चारही तालुके क्वालिफाईड आहेत.

उपसभापती :माननीय मंत्रीमहोदयांनी आपला प्रश्न ऐकलेला असल्यामुळे माननीय मंत्रिमहोदयांचे उत्तर आपण ऐकावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, प्रा.बी.टी.देशमुख हे ज्येष्ठ सदस्य आहेत. माझे उत्तर फार सुस्पष्ट आहे. मी 'नाही' म्हटलेले नाही. मी एवढेच म्हटले की, शासनाचा एक जी.आर. ज्याला लिगल एन्टीटी आहे. शासनाने एक वेगळे धोरण केलेले आहे. ज्या तालुक्यामध्ये एखादी विद्याशाखाच नसेल तर त्या ठिकाणी थेट अनुदानित विद्याशाखा सुरु करावी असे एक स्वतंत्र धोरण जी.आर.च्या माध्यमातून शासनाने जाहीर केले. त्या जी.आर.च्या अनुषंगाने वेगळे अर्ज मागितले. राज्यभरामध्ये एकूण प्रपत्र (अ) मध्ये साधारणपणे 83 तालुके आहेत.

प्रा. बी. टी. देशमुख : या चार ठिकाणी किती अर्ज आले?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला संरक्षण देण्यात यावे. सभापती महोदय, मी देखील मागासलेल्या भागातील कार्यकर्ता आहे. सभापती महोदय,आपणही त्याचा उल्लेख केलेला आहे. त्यामुळे प्रादेशिक भेदभाव करण्याचा विषय किमान मी मंत्री असतांना तरी होणार नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेश टोपे. . . .

त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी विश्वास ठेवावा. सभापती महोदय, मी या ठिकाणी एवढेच सांगितले की,एक विशिष्ट जी.आर. काढण्यात आलेला आहे. त्या जी.आर.च्या अनुषंगाने जाहिरात देऊन अर्ज मागविलेले आहेत.

प्रा. बी. टी. देशमुख : त्या चार ठिकाणी किती अर्ज आले ते सांगावे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, त्या चार ठिकाणी किती अर्ज आले यासंदर्भातील माहिती मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

प्रा. बी.टी. देशमुख : सभापती महोदय, किती अर्ज आले हे माननीय मंत्रिमहोदयांना माहीत नसल्यामुळे ही लक्षवेधी सूचना राखून ठेवण्यात यावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, किती अर्ज आले हे कसे सांगता येईल.

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी शासनाचा निषेध करुन सभात्याग करणार होतो...

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, मला उत्तर देऊ देणार की नाही?

प्रा. बी.टी. देशमुख : या चार ठिकाणी किती अर्ज आले हे माहीत नाही असे माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितलेले आहे.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, या प्रश्नाला न्याय कसा देता येईल याबाबतीत मी सभागृहाला सांगू इच्छितो. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य आहे. शासनाच्या जी.आर.मध्ये प्रपत्र (अ) आणि (ब) करण्यात आलेले आहेत. त्यामध्ये जी यादी तयार करण्यात आलेली आहे त्यामध्ये चूका झालेल्या आहेत, त्याबाबतीत शासन कारवाई करीलच. पण त्यामुळे या संस्थेला डिनाय करता येईल असे मी म्हणणार नाही. या संस्थेला डिनाय करण्याचा शासनाचा सुध्दा हेतू नाही. (अडथळा) सभापती महोदय, मला संरक्षण देण्यात यावे. मला उत्तर देण्याचा अधिकार जर सभागृहात नसेल तर ते चुकीचे होईल.

अशुद्धीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

श्री. राजेश टोपे ....

सभापती महोदय, माझे उत्तर सन्माननीय सदस्यांनी शांतपणे ऐकले पाहिजे. मी अतिशय सुस्पष्ट शब्दात सांगितले की, शासनाच्या जी.आर.मध्ये किंवा यादीमध्ये दोन तालुके कदाचित त्या ठिकाणी विज्ञान शाखा नसताना सुध्दा त्या आहेत अशा पध्दतीने ते राहून गेलेले आहेत. त्यामुळे कदाचित या लोकांना तशा पध्दतीचा अर्ज करता आला नसेल. त्यांनी जो अर्ज विद्यापीठाकडे केला आणि विद्यापीठाने ती शिफारस करुन पाठवली तो अर्ज सुध्दा आपल्याला ग्राह्य धरता येतो का हे फक्त मी कायदेशीर दृष्टीकोनातून तपासतो आणि जर तो कायद्यात बसत असेल तर माझे असे म्हणणे आहे की, यांना प्रपत्र ब मध्ये जे काही ग्रॅंट एड देण्याबाबत म्हटले आहे ते गॅंट एड दिले जातील. मला त्यात काहीही अडचण नाही. फक्त मला कायदेशीरदृष्ट्या ते तपासणे आवश्यक आहे. सभापती महोदय, आपल्या दालनात उद्याच्या उद्या आपल्याला याबाबतीतला निर्णय घेता येईल. त्यामुळे मला असे म्हणावयाचे आहे की, हा विषय राखून ठेवण्याचे काही कारण नाही.

प्रा. बी. टी. देशमुख : माननीय सभापतींना विनंती करण्याचा आम्हाला अधिकार आहे.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, आपण लक्षवेधी सूचना व्यवस्थित वाचली तर ती सुस्पष्ट आहे. जी. आर. असे म्हणतो की, अनुदान सुरु करण्यास परवानगी देण्याचा व ज्या तालुक्याच्या ठिकाणी एक किंवा दोन विद्याशाखा अनुदान तत्वावर आहेत तेथे नवी दुसरी अथवा तिसरी विद्याशाखा देण्यास प्राधान्य देण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला. पुढे सन्माननीय सदस्यांनी अमरावतीच्या संस्थेचे स्पेसिफिक उदाहरण दिले आहे. आपण त्या संस्थेबद्दल काहीही सांगत नाही. विद्यापीठाने शिफारस केली हे आपल्याला माहीत आहे. अमरावतीतून किती अर्ज आले हे माननीय मंत्रिमहोदय सांगत नाहीत. जर धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे तर मग यांना डावलण्याचे कारण काय हे सांगत नाहीत. बाकी सगळी माहिती देत आहेत. ज्या चार तालुक्यांबद्दल स्पेसिफिक माहिती विचारली त्या चार तालुक्यांच्या बाबतीत किती अर्ज आले हे माननीय मंत्रिमहोदयांना माहीत नसेल तर ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी आणि त्यानंतर याचे उत्तर द्यावे.

उपसभापती : मी याबाबत निर्णय देतो. पहिली गोष्ट अशी की, आदरणीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी या लक्षवेधी सूचनेव्दारे ज्या चार तालुक्यांचा उल्लेख केला त्यासंदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी एक गोष्ट कबूल केली की, मी उद्या सकाळी 11.00 च्या आत त्यांनी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

उपसभापती ....

म्हटल्याप्रमाणे माझ्या दालनामध्ये किंवा त्यांच्या दालनामध्ये यासंदर्भातील निर्णय ते निश्चितपणे घेतील. तो निर्णय जर आपल्याला अयोग्य वाटला तर मी आपल्याला या ठिकाणी खात्री देतो की, यासंदर्भात मी आपल्याला पुन्हा चर्चेला वाव देईन.

प्रा. बी. टी. देशमुख : तोपर्यंत आपण ही लक्षवेधी सूचना राखून ठेवावी. लक्षवेधी सूचना तोपर्यंत राखून ठेवल्याने आभाळ कोसळून पडत नाही. शासनाने जर उद्या न्याय दिला तर आपण पुढे हा निर्णय रद्द करावा

उपसभापती : मी देखील स्पष्टपणे सांगितले. माननीय मंत्रिमहोदयांनी यांसदर्भात सांगितले की, मी आपली मागणी कोठेही अमान्य केलेली नाही. फक्त वस्तुतः त्यांना तपासून पहावयाचे आहे आणि तेवढे तपासून पाहण्याची संधी आपण त्यांना जरुर दिली पाहिजे असे मला वाटते.

प्रा. बी. टी. देशमुख : तोपर्यंत लक्षवेधी सूचना राखून ठेवावी.

उपसभापती : आपला माझ्यावर विश्वास आहे ना ?

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, विश्वासाबरोबरच प्रोसीजरचा प्रश्न आहे. आपण लक्षवेधी सूचना राखून ठेवतो म्हटल्यानंतर निदान आम्हाला हे विष या ठिकाणी ओकता तरी येईल नाही तर आज त्याला कुलूप लागून जाईल. ही अत्यंत विषारी वागणूक आहे.

उपसभापती : माझे बोलणे पूर्ण होऊ द्यावे. माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी एक गोष्ट प्रांजळपणे सांगितली की, त्यांना देण्यास कोणत्याही प्रकारची हरकत नाही, फक्त त्यांना ते तपासून पहावयाचे आहे.

प्रा. बी. टी. देशमुख : त्यांना तपासून पाहू द्या.

उपसभापती : मी या ठिकाणी आपल्याला स्पष्टपणे सांगतो की, उद्या त्यांनी घेतलेल्या निर्णयाच्या बाबतीत जर आपले समाधान झाले नाही तर ही लक्षवेधी किंवा या लक्षवेधीची चर्चा मी उद्या पुढे चालू ठेवीन, तोपर्यंत आपण त्यांना ती संधी द्यावी.

sयानंतर विशेष उल्लेख घेण्यात येतील.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>विशेष उल्लेख</u>

पृ. शी. : राजे धर्मराव हायस्कूल, मुलचेरा, जिल्हा गडचिरोली येथील इयत्ता 9 वी व 10 वी ची दुसरी तुकडी सुरु करणे व आदिवासी उपयोजनेंतर्गत विनाअनुदानित तुकडयांना 100 टक्के अनुदान मंजूर करणे

मु. शी. : राजे धर्मराव हायस्कूल, मुलचेरा, जिल्हा गडचिरोली येथील इयत्ता 9 वी व 10 वी ची दुसरी तुकडी सुरु करणे व आदिवासी उपयोजनेंतर्गत विनाअनुदानित तुकडयांना 100 टक्के अनुदान मंजूर करणे याबाबत श्री.व्ही.यू.डायगव्हाणे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□य सदस्य श्री.व्ही.यू.डायगव्हाणे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"राजे धर्मराव हायस्कूल, मुलचेरा, जि.गडचिरोली येथील इयत्ता 9 वी व 10 वी ची दुसरी तुकडी सन 1999-2000 पासून सुरु आहे. सन 2005-2006 मध्ये शासनाने आदिवासी क्षेत्रातील अनुदानित माध्यमिक शाळांना जोडलेल्या विना अनुदानित तुकडयांना 100 टक्के अनुदान मंजूर केले आहे. वरील शाळा आदिवासी उपयोजना अंतर्गत येत असल्यामुळे 100 टक्के अनुदानावर यावयास पाहिजे होती. परंतु मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.,गडचिरोली यांच्या चुकीमुळे या शाळेला बिगर आदिवासी क्षेत्रात दाखविल्यामुळे 100 टक्के अनुदानावर येऊ शकली नाही. मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी दिनांक 17 जुलै, 2006 च्या पत्राद्वारे मा.शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना मुलचेरा हे गाव आदिवासी क्षेत्रात येत असल्याने व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी सादर केलेल्या माहितीस अनुसरुन राजे धर्मराव हायस्कूल, मुलचेरा येथील इयत्ता 9 वी व 10 वी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यु.डायगव्हाणे....

ची दुसरी तुकडी आदिवासी क्षेत्रात समाविष्ट करुन अनुदान मंजूर करण्याबाबत अहवाल सादर करण्यात येत आहे, असे कळविले असणे, अद्यापही या शाळेला अनुदान मंजूर न झाल्यामुळे, या गंभीर प्रकरणाबाबत शासनाने त्वरित न्याय द्यावा यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना उपस्थित करीत आहे."

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : ठाणे जिल्हयातील पालघर, डहाणू व जव्हार तालुक्यातील जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली येणा-या सूर्या प्रकल्पाचे पाणी मूळ योजनेनुसार वसई-विरार या भागाला तात्पुरत्या स्वरुपात देणे

मु. शी. : ठाणे जिल्हयातील पालघर, डहाणू व जव्हार तालुक्यातील जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली येणा-या सूर्या प्रकल्पाचे पाणी मूळ योजनेनुसार वसई-विरार या भागाला तात्पुरत्या स्वरुपात देणे याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे,वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

उपसभापती : मा□□□य सदस्य डॉ.नीलम गोऱ्हे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

"ठाणे जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रामधील पालघर, डहाणू व जव्हार तालुक्यातील सुमारे 12 हजार 696 हेक्टर इतक्या जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली येण्यास सूर्या प्रकल्प 1978 मध्ये मंजूर झाला. अनुसूचित क्षेत्रातील संसाधनांवर आधारित आणि अनुसूचित क्षेत्रातील पूर्ण लाभक्षेत्र असलेला असा हा प्रकल्प आदिवासी उपयोजनेतून एकूण प्रकल्प खर्चाच्या 89 टक्के इतका खर्च करण्यात येणे, असे असताना तिन्ही तालुक्यातील आदिवासींवर अन्याय करत राजकीय सत्तेचा उपयोग करुन या प्रकल्पाचे पाणी वसई-विरार भागाला देण्याचे करण्यात आलेले कारस्थान, सूर्या प्रकल्पाचे काम पूर्ण न झाल्याने शिल्लक पाण्यातून केवळ 1980 पर्यंत वसई-विरार भागाला 100 द.ल.घ.मी.प्रतिदिन इतके पाणी तात्पुरत्या स्वरुपात देण्यास मान्यता दिली होती. परंतु त्यानंतरही याप्रकरणी न्यायालयात याचिका दाखल केली असता महाराष्ट्र शासनाने मूळ योजनेनुसार स्थानिक लोकांचे अधिकार मान्य करुन वसई-विरार भागाला 2007 पर्यंतच 100 द.ल.घ.मी.पाणी तात्पुरत्या स्वरुपात देण्यात येईल आणि या भागासाठी स्वतंत्र पर्यायी जलस्त्रोत निर्माण करण्यात येईल अशी

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे....

हमी उच्च न्यायालयात दिली. शासनाने स्वत:च न्यायालयात दिलेल्या हमीची पूर्तता न करता आणखी 200 द.ल.घ.मी.पाणी मंजूर करुन नियमबाहय पाणीपुरवठा चालूच असणे, याचाच अर्थ राज्य शासनाने न्यायालयाचा केलेला अवमान, तसेच आदिवासी जनतेवर केलेला अन्याय, याबाबत शासनाने आपली भूमिका स्पष्ट करावी."

सभापती महोदय, ठाणे जिल्हयातील अनुसूचित क्षेत्रातील पालघर, डहाणू व जव्हार तालुक्यातील सुमारे 14,696 हेक्टर इतक्या जमिनीचे क्षेत्र सिंचनाखाली येणारा सूर्य प्रकल्प 1978 मध्ये मंजूर झाला. या प्रकल्पाचा लाभ आदिवासींना देण्याबाबत शासनाने ठोस भूमिका घ्यावी. सूर्या प्रकल्पाची अपूर्ण कामे निश्चित कालावधीत पूर्ण करण्यासाठी तसेच संकल्पित लाभक्षेत्राला पाणीपुरवठा करण्याच्या कामासाठी आवश्यक त्या निधीची तरतूद करणे गरजेचे आहे. आदिवासी विकास विभागातर्फे आतापर्यंत एकूण प्रकल्पापैकी 89 टक्के इतका खर्च करण्यात आला आहे. नंतर मात्र या प्रकल्पाचा खर्च मुंबई महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणाने 96 कोटी 23 लाख रुपये खर्च केल्याचे निमित्त वापरुन मूळ आदिवासी भूमिपुत्रांना त्यांच्या मानवी अधिकारांना डावलल्याचे निमित्त होऊ नये, पाणी हा सर्वांचा अधिकार असल्यामुळे सम्यक धोरण राबविण्यात येऊन सूर्या प्रकल्पाचा फायदा ठाणे जिल्हयातील पालघर, डहाणू व जव्हार येथील आदिवासींना मिळावा यादृष्टीने शासनाने पावले उचलावीत यासाठी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्रीमती अलका देसाई)

5....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : आणिक वडाळा येथे 120 फूट डि.पी.रस्त्याच्या कामावर 30 ते 40 कोटी रुपये खर्च केल्यानंतर याच रस्त्यावर मोनोरेलचे सुरु केलेले काम

मु. शी. : आणिक वडाळा येथे 120 फूट डी.पी.रस्त्याच्या कामावर 30 ते 40 कोटी रुपये खर्च केल्यानंतर याच रस्त्यावर मोनोरेलचे सुरु केलेले काम याबाबत श्री.मधुकर चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती : मा□□य सदस्य श्री.मधुकर चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.मधुकर चव्हाण (मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

"आणिक वडाळा येथे 120 फूट डि.पी.रोडचे कॉंक्रिटीकरणाचे काम पूर्ण होऊन सदर रस्ता अंदाजे 3 ते 4 कि.मी.चा असून सर्व बांधकामाकरिता सुमारे 30 ते 40 कोटी रुपये खर्च आला आहे. याच 120 फूट डि.पी.रस्त्यावर 2 महिन्यापासून मोनोरेल या प्रकल्पाचे काम सुरु आहे. मोनोरेल सारख्या महत्वाकांक्षी वाहतूक प्रकल्पाचे काम सुरु झाल्यामुळे 30 ते 40 कोटी रुपये खर्च करुन पूर्ण केलेला 120 फूटी रस्ता बांधण्याकरिता करण्यात आलेला खर्च वाया जाऊन करदात्या जनतेच्या पैशाचा अपव्यय आहे. जर मोनोरेलचे काम पुढे सुरु करणार आहोत असे माहीत होते तर मग 30 ते 40 कोटी रुपये खर्च करुन या रस्त्याचे कॉंक्रिटीकरण का करण्यात आले आणि कोणाच्या फायद्याकरिता करण्यात आले, झालेला हा खर्च वाया गेला नाही काय ? असे महत्वाकांक्षी प्रकल्प नेहमी नियोजनपूर्ण पध्दतीने करण्यात येतात त्यामुळे मोनोरेल सारखा वाहतूक प्रकल्प अनेक वर्ष अगोदर नियोजन करुनच सुरु करण्यात आला असल्यास हा रस्ता बांधण्याकरिता झालेला खर्च वाया जाणे योग्य नाही. सदर विषय अत्यंत महत्वाचा असल्याने शासनाने याची गंभीर नोंद घेऊन योग्य ती कार्यवाही करावी ही विनंती. आपण मला परवानगी दिल्याबद्दल धन्यवाद.

यानंतर श्री.शिगम....

अशुद्धीत प्रत/ग्रंथालयासाठी नाही

पृ.शी. : रायगड जिल्ह्यात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी तालुका व गावपातळीवर यंत्रणा निर्माण करणे

मु.शी. : रायगड जिल्ह्यात मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी तालुका व गावपातळीवर यंत्रणा निर्माण करणे याबाबत श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. जयंत प्र. पाटील (महाराष्ट्र विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"रायगड जिल्ह्याला 240 कि.मी. लांबीचा समुद्रकिनारा असून या जिल्ह्यातील गांवे प्रामुख्याने नदीकाठी, समुद्र किनारी, स्थानिक जलाशय किंवा तळयाकाठी वसलेली आहेत. या जिल्ह्यात उरण, पनवेल, कर्जत, खालापूर, अलिबाग, पेण, मुरुड, महाड, श्रीवर्धन, पोलादपूर, म्हसळा, माणगांव, तळा, रोहा आणि सुधागड अशा एकूण 15 तालुक्यांचा समावेश होतो.

रायगड जिल्ह्यातील भूजल मत्स्य संवर्धनात प्रामुख्याने मच्छिमार सहकारी संस्था अग्रेसर आहेत. जिल्ह्यातील विविध जलाशयामुळे मत्स्य संवर्धनासाठी प्रामुख्याने भारतीय प्रमुख कार्प म्हणजे कटला, रोहू, मृगल या माशांचे संवर्धन करणे शक्य आहे. या शिवाय गोड्या पाण्यातील मिश्र मत्स्यशेती संवर्धन, जिताडा माशाचे संवर्धन व कोळंबी संवर्धन करणे सहज शक्य आहे.

मत्स्यव्यवसायास चालना देण्यासाठी आणि मत्स्यव्यवसाय विषयीच्या विविध योजना राबविण्यासाठी सद्या जिल्ह्यात जिल्हास्तरावर केवळ जिल्हा मत्स्यव्यवसाय अधिका-यांचे एकच कार्यालय अस्तित्वात आहे.

मत्स्यशेतक-यांना मत्स्य विभागाशी संबंधित योजनांची माहिती तालुका पातळीवर व गांव पातळीवर मिळत नाही. त्यामुळे मत्स्यव्यवसायास प्रचंड वाव असून सुध्दा मत्स्यव्यवसाय विकासाला खीळ बसलेली आहे. या पार्श्वभूमीवर कृषि विभागाच्या धर्तीवर तालुका पातळीवर किमान वर्ग 2 दर्जाचा मत्स्य विकास अधिकारी आणि गांव पातळीवर मत्स्यव्यवसाय सहाय्यक यांची नेमणूक करावी यासाठी शासनाचे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे."

-- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : कोल्हापूर नगरीतील केशवराव भोसले नाट्यगृहाच्या नूतनीकरणात अनेक त्रुटी निदर्शनास आल्याने दोषीवर कारवाई होण्याची आवश्यकता

मु.शी. : कोल्हापूर नगरीतील केशवराव भोसले नाट्यगृहाच्या नूतनीकरणात अनेक त्रुटी निदर्शनास आल्याने दोषीवर कारवाई होण्याची आवश्यकता याबाबत श्री. चंद्रकात पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. चंद्रकांत पाटील यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"मराठी चित्रपट सृष्टीचे व नाटकांचे माहेरघर असणा-या कोल्हापूर नगरीतील केशवराव भोसले नाट्यगृहाचे एक कोटी सहा लाख रुपये खर्चून नूतनीकरण करण्यात येणे, परंतु नूतनीकरण करताना अनेक त्रुटी असल्याचे दिनांक 25 एप्रिल 2009 रोजी उघडकीस येणे, नाट्यगृह पुन्हा सुरु होण्याअगोदरच चित्तरंजन कोल्हटकर यांच्यासह महाराश्ट्रातील ज्येष्ठ कलाकार, विविध नाटयसंस्था, रसिक आणि नाटयवितरक संस्थांकडून नाट्यगृहातील असुविधांबाबत सुरु असलेल्या मागण्यांकडे अद्यापही महापालिका प्रशासनाने लक्ष न देणे, याबाबत शासनाने लक्ष घालण्याची गरज व दोषींवर तातडीने कारवाई करण्याची आावश्यकता, सदर विषय अत्यंत महत्वाचा असून कोल्हापूरच्या कलाप्रेमींच्या स्वाभिमानाचा व सार्वजनिक हिताचा असल्याने मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : लोकोत्तर महापुरुष साने गुरुजी व सी.डी. देशमुख यांचे स्मारक त्यांच्या गावी उभारण्याची शासनाने केलेली घोषणा

मु.शी. : लोकोत्तर महापुरुष साने गुरुजी व सी.डी. देशमुख यांचे स्मारक त्यांच्या गावी उभारण्याची शासनाने केलेली घोषणा याबाबत श्रीमती मंदा म्हात्रे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्या श्रीमती मंदा म्हात्रे यांनी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्रीमती मंदा म्हात्रे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडते.

"लोकोत्तर महापुरुष साने गुरुजी आणि सी.डी. देशमुख, जे या देशाचे अर्थमंत्री होते, त्यांचे स्मारक त्यांच्या गांवी उभारण्याची शासनाकडून घोषणा होणे, त्यानुसार सन 2002 साली तत्कालीन वित्त मंत्री श्री. जयंत पाटील यांनी अर्थसंकल्पामध्ये स्मारकासाठी प्रत्येकी दोन कोटी रुपयाची तरतूद करणे, परंतु अद्यापही शासनाकडून सदरहू स्मारकांसाठी निधी उपलब्ध न होणे, स्मारक समितीच्या पदाधिका-यांना संबंधित अधिका-यांकडून उर्मट व असमाधानकारक उत्तरे मिळणे, महापुरुषांच्या स्मारकांबाबत शासन यंत्रणेत असलेल्या अनास्थेमुळे जनमानसात चिड निर्माण झालेली असणे, तसेच रायगड जिल्ह्यामध्ये ग.दि. माडगुळकर, अहिल्याबाई होळकर, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, क्रांतीवीर वासुदेव बळवंत फडके, क्रांतीसिंह नाना पाटील आदींची स्मारके उभारण्याच्या घोषणा झाल्या असून नेमकी कोणती स्मारके उभी राहिली हा एक संशोधनाचा विषय असणे, शासनाने केलेल्या घोषणांची अंमलबजावणी होत नसल्यामुळे राज्यातील जनतेत चीड आणि असंतोष निर्माण होणे, तेव्हा शासनाने केलेल्या घोषणांची तातडीने अंमलबजावणी करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

--

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : गोंदिया जिल्हयातील व्यापा-यांनी आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीत शेतक-यांकडील धान खरेदी करणे

मु.शी. : गोंदिया जिल्हयातील व्यापा-यांनी आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीत शेतक-यांकडील धान खरेदी करणे याबाबत श्री. केशवराव मानकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री.केशवराव मानकर यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. केशवराव मानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"गोंदिया जिल्ह्यातील व्यापा-यांनी आधारभूत किंमतीपेक्षा कमी किंमतीत शेतक-यांकडील धान खरेदी करणे, शेतक-यांकडून व्यापा-यांनी शेतक-यांकडील धान फक्त 700 रु. प्रति क्विंटल भावाने खरेदी करणे, गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात परप्रांतातून कमी किंमतीत खरेदी केलेले धान बाजारपेठेत आल्यामुळे हमी भावापेक्षा कमी किंमतीत धान खरेदी केले जाणे, त्यामुळे व्यापा-यांची ओढ आंध्रप्रदेश, कर्नाटक, पंजाब आदी धान उत्पादक राज्यांकडे असणे,परंप्रांतातून आयात केलेल्या धानापासून तांदूळ तयार करुन लेव्हीचा तांदूळ एफ.सी.आय.ला देणे, त्यामुळे व्यापा-यांचा जास्त नफा होत असून शेतक-यांची मोठ्या प्रमाणात पिळवणूक आणि फसवणूक होणे, म्हणून बोंदिया आणि भंडारा जिल्ह्यात आधारभूत धान खरेदी केंद्र तातडीने सुरु करण्याची गरज असणे, परप्रांतातून आलेल्या धानापासून तांदूळ तयार करुन शासन लेव्हीच्या स्वरुपात तो तांदूळ खरेदी करते. तेव्हा अशा प्रकारच्या खरेदीवर बंदी आणण्यासाठी आवश्यकती उपाययोजना करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे."

...5..

पृ.शी. : जालना जिल्हयातील मंठा आणि परतूर येथील ग्रामीण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणुका करणे

मु.शी. : जालना जिल्हयातील मंठा आणि परतूर येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिका-यांच्या नेमणुका करणे याबाबत श्री. सुरेश जेथलिया, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती : माननीय सदस्य श्री. सुरेश जेथलिया यानी विशेष उल्लेखासंबंधीची सूचना दिली आहे. त्यांनी ती मांडावी.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखासबंधीची सूचना मांडतो.

"मराठवाड्यातील परतूर व मंठा (जिल्हा जालना) शहरात असलेल्या ग्रामीण रुग्णालयात एकही वैद्यकीय अधिकारी नसणे, शहराच्या आजूबाजूच्या परिसरातून नियमितपणे या दवाखान्यात दररोज कमीत कमी 125 ते 150 रुग्ण येत असून डॉक्टर नसल्याने त्यांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. सध्या राज्यात मेलेरिया, हिवतापाच्या साथी पसरल्या असून रुग्णांना वेळेवर उपचार मिळत नाहीत. तसेच पावसाळयात विविध रोगाच्या साथी पसरत असतात. अशा वेळी साथीच्या रोगांना आळा घालण्याकरिता आरोग्य यंत्रणा अपुरी पडते. तसेच रुग्णांना खाजगी दवाखान्यात महागडे उपचार घ्यावे लागतात. याकरिता तेथील लोकप्रतिनिधींनी वारंवार मागणी करुनही अद्यापपर्यन्त एकही वैद्यकीय अधिका-यांची नियुक्ती केलेली नाही. रुग्णालयामध्ये आवश्यक डॉक्टर व कर्मचारी नसल्यामुळे रुग्णांची मोठया प्रमाणावर गैरसोय होत असून ती दूर करण्यासाठी मंठा व परतूर येथील ग्रामीण रुग्णालयामध्ये तातडीने वैद्यकीय अधिकारी व कर्मचा-यांची नियुक्ती करण्यासाठी मी ही विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

...नंतर श्री. गिते....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखी नोंदी

पृ. शी. : मौलाना आझाद महामंडळास पुरेसे भांडवल न मिळणे.

मु. शी. : मोलाना आझाद महामंडळास पुरेसे भांडवल न मिळणे याबाबत ॲड.उषा दराडे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□□य सदस्य ॲड.उषा दराडे यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

ॲड.उषा दराडे (विधानसभा सदस्याव्दारा निर्वाचित) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडते.

सभापती महोदया, मौलाना आझाद अल्पसंख्यांक आर्थिक विकास महामंडळास वर्षाला फक्त 90 कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला जातो. तो निधी अतिशय तोकडा असल्यामुळे गरजू लाभार्थी लाभापासून वंचित रहात आहेत. शासनाने राज्यातील मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, नवबौध्द, पारशी आदि अल्पसंख्यांक समाजातील लोकांना उद्योग व्यवसायासाठी 7 टक्के दराने कर्ज देण्याची तरतूद केलेली आहे. या कर्जाची परतफेड शिक्षण पूर्ण होऊन रोजगार उपलब्ध झाल्यानंतर सहा महिन्यांनी करण्याची व्यवस्था आहे. महिलांसाठी महिला समृध्द योजना देखील शासनाने सुरु केलेली आहे. अन्य लोकांना थेट मुदत बंद कर्ज, शैक्षणिक कर्ज, सुक्षमार्थ सहाय्य, बीज भांडवल देण्याची व्यवस्था या महामंडळातर्फे केलेली आहे. कर्ज प्रकरणातील अटी शिथील करण्यास सरकार व महामंडळ तयार असले तरी जास्तीत जास्त गरजुना कर्ज देण्याबाबत मात्र आकृष्ट करण्यामध्ये शासन अपयशी ठरलेले आहे. या महामंडळाचे प्रत्येक जिल्हयात कार्यालय नसल्याने त्यांनी मिटकॉनकडे सदर काम दिलेले आहे. मिटकॉनला अल्पसंख्याकांच्या प्रश्नाशी आणि त्यांच्या विकासा बाबत काही देणे घेणे नाही. त्यामुळे मोठया प्रमाणात अडचणी वाढलेल्या आहेत. या महामंडळाची स्थापना 2000 मध्ये झाली. त्या महामंडळात पुरेसे कर्मचारी नाहीत. तसेच या महामंडळास खूपच अपुरा निधी शासनाकडून उपलब्ध करुन दिला जातो. त्यामुळे सदर महामंडळ अकार्यक्षम झालेले आहे असे चित्र दिसते. या महामंडळाचे प्रत्येक जिल्हयात कार्यालये असावीत.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे....

तसेच कर्मचारीवर्ग वाढवावा. शासनाने निधी देण्यात भरीव वाढ करावी अशी मागणी या समाजातून होत आहे. अल्पसंख्यांक समाजामध्ये मोठया प्रमाणात वाढलेला असंतोष व त्यावर शासनाने करावयाची उपाययोजना याबाबतीत मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाचे लक्ष वेधत आहे. याबाबतीत शासनाने गांभीर्याने लक्ष घालावे अशी मी विनंती करते.

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : "ऑटीझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर" हा आजार मुलांमध्ये मोठया प्रमाणात आढळून येणे

मु. शी. : "ऑटीझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर" हा आजार मुलांमध्ये मोठया प्रमाणात आढळून येणे याबाबत डॉ.दीपक सावंत, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□य सदस्य डॉ.दीपक सावंत यां□ विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदया, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

सभापती महोदया, "ऑटीझम" हा विषय कदाचित आपल्यापैकी अनेकांना माहिती नसेल. " ऑटीझम स्पेक्ट्रम डिसऑर्डर" हा आजार आज अनेक लहान मुलांमध्ये प्रामुख्याने आढळून येत आहे. या आजारामुळे अनेक पालक त्रस्त आहेत. बिहेविअरल डिसऑर्डर फार मोठया प्रमाणात असतात. ती मुले आत्मकेंद्रित असतात, बाहय जगाशी संबंध नसल्या सारखी वागतात. उगाचच रडत बसणे, हसणे, गरगर फिरणे, पुन्हा पुन्हा तोच तोच प्रश्न विचारणे अशा प्रकारची त्या मुलांची वागणूक होते. त्या मुलांना सामाजीक जाणीव नसते, तसेच त्यांना नात्यासंबंधीचा भान नसतो. या आजाराचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. उर 150 मुलांपैकी प्रत्येकी एकाला "ऑटीझम स्पेक्ट्रम डिसऑडर"हा आजार असतो आणि या प्रत्येक चार मुलामागे एक मुलगी असे या आजाराचे प्रमाण आहे. या आजाराचे अजूनही कारण समजलेले नसले तरी हा आजार मेंदुच्या बिघाडामुळे होतो. पण दुर्देवाने आपल्या राज्य शासनाकडे अशा मुलांना शिकविण्यासाठी कोणत्याही प्रकारची यंत्रणा नाही. या आजारामुळे मुलांचे सार्वजनिक आयुष्य कसे असावे, यासाठी पाश्चिमात्य देशामध्ये वसतिगृहे आहेत. तशी वसतिगृहे या राज्यात नाहीत. अशा मुलांसाठी राज्यात एकही शाळा शासनाने काढलेली नाही. या मुलांना शिकविण्यासाठी खास असा अभ्यासक्रम देखील शासनाने तयार केलेला नाही. या मुलांच्या पालकांना सदैव चिंता असते की, आपल्या नंतर या मुलांचे पुनर्वसन कसे होणार ? सभापती महोदया, ज्या स्वयंसेवी संस्था ऑटीझममध्ये काम करीत

4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहेत, त्या संस्थांना शासनाने अनुदान उपलब्ध करुन द्यावे. अशा प्रकारचे काम करण्यासाठी त्या संस्थांना प्रवृत्त करावे किंवा शासनाने यासाठी एक विशेष सेल निर्माण करुन या मुलांचे पुनर्वसनाचे आणि शिक्षणाचे काम करावे अशी मी विशेष उल्लेखाव्दारे शासनाकडे मागणी करीत आहे.

श्री. रामनाथ मोते : सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी जो विषय विशेष उल्लेखाव्दारे सभागृहात मांडला आहे. तो विषय मी यापूर्वी सभागृहात मांडलेला होता. त्यासंदर्भात मी शासना बरोबर पत्रव्यवहार देखील केलेला आहे. शासनाने मला पत्र दिले आहे की, या मुलांच्या बाबतीत काय करु शकतो अशा प्रकारचा अहवाल शिक्षण संचालक यांच्याकडून मागितला आहे. हा विषय उपस्थित करुन एक वर्षाचा कालावधी होऊन गेलेला आहे. परंतु या संदर्भात शिक्षण संचालकांकडून कोणत्याही प्रकारचा अहवाल शासनास प्राप्त करुन देण्यात आलेला नाही. त्यामुळे सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना हा विषय पुन्हा सभागृहात उपस्थित करावा लागला. या विशेष उल्लेखाच्या अनुषंगाने मी आपणास विनंती करतो की, यासंबंधी शासनास आपण काही तरी निदेश द्यावेत.

श्री. रमेशचंद्र बंग : शासनातर्फे योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : शासनाने याबाबतीत दखल घ्यावी.

श्री. रमेशचंद्र बंग : ठीक आहे.

यानंतर श्री. भोगले...

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : इंदिरा आवास योजनेचा अखर्चित निधी मागासवर्गीयांच्या इतर योजनांवर खर्च करण्यास अनुमती मिळणे

मु. शी. : इंदिरा आवास योजनेचा अखर्चित निधी मागासवर्गीयांच्या इतर योजनांवर खर्च करण्यास अनुमती मिळणे याबाबत श्री.सुभाष चव्हाण,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : मा□□य सदस्य श्री.सुभाष चव्हाण यां□ विशेष उल्ले□संबंधीची सूच□ दिली आहे. त्यां□ ती मांडावी.

श्री.सुभाष चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□संबंधीची सूच□ मांडतो.

राज्यात केंद्र शासनाकडून राबविण्यात येत असलेल्या इंदिरा आवास योजनेसाठी लागणारे 60 टक्के मागासवर्गीय लाभार्थी सिंधुदुर्ग जिल्हयात मिळत नसल्यामुळे या योजनेचा लाभ सर्वसाधारण व्यक्तिना दिला जातो. त्यामुळे मागासवर्गीय लाभार्थी मिळत नसल्यामुळे इंदिरा आवास योजनेचा शिल्लक राहिलेला निधी मागासवर्गीयांचा विकास होण्याच्या दृष्टीने इतर विकास कामांकडे वर्ग करण्यात यावा अशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी विभागाकडे वारंवार मागणी करुनही अद्याप सदर निधी मागासवर्गीयांच्या इतर विकास कामासाठी वर्ग करण्यात आलेला नाही. मागासवर्गीयांचा अत्यंत जिव्हाळ्याच्या व महत्वाच्या अशा विषयावर मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: यशवंतराच चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, महाराष्ट्र विद्यापीठ व कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) (सुधारणा) विधेयक

L.C.BILL NO. III OF 2009.

(A BILL FURTHER TO AMEND THE YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN UNIVERSITY ACT,1989, THE DR.BABASAHEB AMBEDKAR TECHNOLOGICAL UNIVERSITY AT,1989, THE MAHARASHTRA UNIVERSITIES ACT,1994 AND THE KAVI KULAGURU KALIDAS SANSKRIT VISHVAVIDYALAYA (UNIVERSITIES) ACT,1997.)

श्री.रमेशचंद्र बंग (अन्न व नागरी पुरवठा मंत्री) : सभापती महोदय, सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक 3 यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, 1989; डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, 1989; महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 आणि कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय (विद्यापीठ) अधिनियम, 1997 यात आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

तालिका सभापती : अनुमती देण्यात आली आहे.

श्री. रमेशचंद्र बंग : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2009 चे वि. प. वि. क्रमांक-3 मांडतो.

तालिका सभापती : विधेयक मांडण्यात आले आहे.

2वाय 1.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्रीमती अलका देसाई) : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 4.00 वाजता पुन: भरेल.

(2.30 ते 4.00 मध्यंतर)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरानंतर)

(सभापतीस्थानी माननीय सभापती)

पृ.शी./मु.शी.:सन 2009-2010 चा अर्थसंकल्प सादर करणे.

डॉ. सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी सन 2009-2010 चा अर्थसंकल्प सभागृहाला सादर करीत आहे.

(प्रेस : येथे वित्त मंत्र्याचे भाषण छापण्यात यावे.)

यानंतर श्री. गायकवाड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री)

अर्थसंकल्पाचे भाषण

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अशुद्धीरित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्य मंत्र्यांनी अतिरिक्त अर्थसंकल्पाचे भाषण केले.)

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसकल्पीय भाषणाचे वाचन केले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.)

...नंतर श्री. गिते....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.)

यानंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माननीय वित्त राज्यमंत्र्यांनी अर्थसंकल्पीय भाषणाचे वाचन केले.....

...3के.1...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGJ/ MAP/ SBT/ KGS/ MMP/

17:00

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन 2009-2010 चा अर्थसंकल्प सभागृहास सादर करण्यात आला आहे.

अर्थसंकल्पीय प्रकाशने सुटकेससह सन्माननीय सदस्यांना देण्याची व्यवस्था वित्त विभागातर्फे तळमजल्यावरील वितरण केन्द्रावर करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांनी वितरण केंद्रावरुन सदर प्रकाशने घ्यावीत.

सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या शुक्रवार, दिनांक 5 जून 2009 रोजी सकाळी 10.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक सायंकाळी 5 वाजून 8 मिनिटांनी, शुक्रवार, दिनांक 6 जून 2009 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

++++++++++

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही